# पुणे महानगरपालिका

## सन २०१७-१८

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

माझे पुणे महानगरपालिका प्रशासकीय कारकिर्दितील तिसरे अंदाजपत्रक सादर करताना मला आनंद होत आहे.देशातील शहरे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे इंजिन आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे सन २०३० पर्यंत भारताच्या लोकसंख्येच्या ४०% लोकसंख्या देशातील विविध मोठया शहरामध्ये वास्तव्य करेल आणि जीडीपीच्या ७५% वाटा शहरी लोकसंख्येचा असण्याची शक्यता आहे. यासाठी भौतिक, संख्यात्मक, सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधांचा सर्वसमावेशक विकास होण्याची आवश्यकता आहे. यासर्व गोष्टीमुळे जीवनमान उंचाविण्यास आणि शहराकडे गुंतवणूक वाढविण्यासाठी उपयोग होणार आहे. लोकांना आकर्षित करण्यासाठी तसेच लोकांची प्रगती व विकासाचे चांगले गतीमान चक्र करण्यासाठीही हे महत्वाचे आहे.

भारतातील ऐतिहासिक पुणे शहराची ओळख पूर्वेकडील ऑक्सफर्ड अशी आहे. पुणे शहराला दैदिप्यमान इतिहास आहे, प्रगतशील वर्तमानकाळ आणि उज्ज्वल भविष्यकाळ आहे. पुणे शहराचे आगळेवेगळे वैशिष्टे म्हणजे जगात किंवा देशात जे-जे नाविण्यपूर्व व अद्ययावत निर्माण होते त्याचा अभ्यासपूर्वक व तत्पर स्विकार या शहराकडून केला जातो व त्यामुळेच पुणे शहर अधिक गतीने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. सन १९५० सालापासून पुणे महानगरपालिका शहरवासियांच्या सेवेत कार्यरत आहे. माहिती व तंत्रज्ञान माध्यमातून पुणे महानगरपालिका अद्ययावतरित्या ई-गव्हर्नन्सचा सर्वसमावेशक वापर करुन प्रशासकीय यंत्रणा पूर्णत: कार्यक्षम व पारदर्शी करुन लोकाभिमुख सेवासुविधा प्रदान करणे हे प्रमुख उद्दिष्ट साध्य करीत आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शहरवासियांना उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवासुविधा Online करणे, पुणे महानगगरपलिकेशी सर्व संबंधित आर्थिक व्यवहार Cashless होण्याच्या दृष्टीने नियोजन व व्यवस्थापन करणे, या सेवासुविधा भविष्यात आधारकार्डशी जोडणे आणि हे सर्व करीत असतानाच या सर्व सेवांची पातळी उंचाविणे हे ध्येय निश्चित करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचे नागरिकांना विविध स्वरुपाच्या सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी (महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५)निर्गमित केला आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने प्रशासनामध्ये उत्तरदायित्व व जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.

केंद्राच्या स्मार्ट सिटी स्पर्धे अंतर्गत पुणे शहराने दुसरा क्रमांक पटकविलेला होता.या स्पर्धेचे महत्वाचे उदिदष्ट खालीलप्रमाणे होते.

१. प्रत्येक शहराने जास्तीत जास्त नागरीकांशी संवाद साधुन, शहरात राहणा-या प्रत्येक सामाजिक व आर्थिक घटकांशी चर्चा करुन, सामान्य नागरिंकापासून तज्ञापर्यंत सर्वाचे मत विचारात घेवुन भविष्यातील शहराची रुपरेषा तयार करावयाची होती.

२. वरीलप्रमाणे भविष्यातील शहराची रुपरेषा तयार करत असताना फक्त आज रोजी असलेल्या शहराच्या समस्यांचा विचार न करता भविष्यात उद्‌भवणा-या नागरिकांच्या अपेक्षा, समस्या विचार करणे आवश्यक होते.

३. नागरिकांचा सहभाग व चर्चेतुन त्यांनी मांडलेल्या अपेक्षा व समस्यांचे निराकरण सर्वकष विचार करुन, आवश्यक ते धोरण तयार करुन त्यांची अंमलबजावणी करुन, पाहिजे तर कठोर निर्णय घेऊन जेणेकरुन शहराला योग्य दिशा मिळेल व आवश्यक ते प्रकल्प राबविणे आवश्यक आहे.

४. पुण्यात नागरिकांनी खाली दिलेल्या समस्यांना प्राधान्य दिले होते.

- शाश्वत वाहतूक व्यवस्था निर्माण करणे.
- सुनियोजित व समान पाणीपुरवठा व्यवस्थापन निर्माण करणे.
- घनकचरा व्यवस्थापन सुधारणे.
- सर्वांना घर उपलब्ध होतील यासाठी उपाययोजना करणे.
- पर्यावरण व शाश्वत विकास निर्माण करणे.
- सर्वांसाठी सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणे.

वरील उल्लेख केलेल्या नागरिकांनी प्राधान्य दिलेल्या सहा क्षेत्रामध्येच महानगरपालिकेने जास्तीत जास्त काम करणे व त्यामाध्यमातून लोकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा पुर्ण करणे अनिवार्य आहे. या अंदाजपत्रकामध्ये सुध्दा या क्षेत्रातील कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. या अंदाजपत्रकामध्ये मुख्यतः खालील कामांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.

**१. शाश्वत वाहतूक व्यवस्था निर्माण करणे.**

- औंध व सातारा रस्ता बीआरटी प्रकल्प.
- पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकरिता नविन बसेस खरेदी करणे.
- एचसीएमटीआर प्रकल्प राबविणेची सुरूवात करणे.
- पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. करिता डेपो व टर्मिनल विकसित करणे.
- पादचारीसुरक्षा धोरणांच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प.
- चौक सुधारणा प्रकल्प.
- अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन्सप्रमाणेनविन फुटपाथ/रस्ते विकसित करणे.
- शहरात ठिकठिकाणी सायकल इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करणे.
- पुणे शहरासाठी पब्लिक बायसिकल शेअरींग व्यवस्था निर्माण करणे.
- पुणे मेट्रो प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेचा आवश्यक आर्थिक सहभाग.

**२. सुनियोजित व समान पाणीपुरवठा व्यवस्थापन निर्माण करणे.**

- २४X७ पाणीपुरवठा प्रकल्पा अंतर्गत ८२ पाण्याच्या टाक्या बांधणे, १६०० किलोमीटर लांबीची वितरणव्यवस्था निर्माण करणे व संपुर्ण शहरामध्ये स्मार्ट मिटर बसविणे, या कामाचा २०१७-१८ मधील टप्पा पार पाडणे.
- पर्वती जलशुध्दीकरणे केंद्र, भामा आसखेड योजना, कॅन्टोनमेंट बंद पाईपलाईन योजना, वडगांव जलशुध्दीकरण केंद्र पुर्ण करण्याकरीता तरतूद.
- पावसाळी पाण्याचा निचरा करण्यासाठी वाहिन्या विकसित करणे.(Pune Storm Water Drainage Project Phase 2 अंतर्गत)

**३. घनकचरा व्यवस्थापन सुधारणे.**

- बांधकाम व राडारोडा प्रकल्पावर प्रक्रिया करुन त्यामधुन बिल्डींग मटेरियल निर्मीत करणे.
- ७५० टन Waste to Energy प्रकल्प राबविणे.
- ॲटोमेटीक रोडस्वीपींग व्हेईकल खरेदी करणेकरिता मोठया प्रमाणात तरतुद उपलब्ध करणे.
- घनकचरा व्यवस्थापनासाठी आऊटसोर्सिंगद्वारे आवश्यक गाडया उपलब्ध करणे.
- संगणकीकृत एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे.
- शहराच्या आतविकेंद्रीत पध्दतीने कचरा व्यवस्थापन प्रकल्प सुरू करून लँड फिलवर येणारा ताण कमी करणे.

**४. सर्वांना घर उपलब्ध होतील यासाठी उपाययोजना करणे.**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत झोपडपट्टी, विविध घटकांचाविचार करून झोपडपट्टी निर्मुल प्राधिकरण व म्हाडा यांचेशी समन्वय साधुन शहरात सर्वांसाठी घरांचा आराखडा तयार करुन, त्याअंतर्गत या आर्थिक वर्षाच्या संपुर्ण नियोजन तयार करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. त्यानुसार विविध प्रकल्प राबविण्याचा मानस आहे.

**५. पर्यावरण व शाश्वत विकास निर्माण करणे.**

- नदीसुधारणा प्रकल्प (River Front Development).
- राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत शहरात ठिकठिकाणी शौचालयाची निर्मिती करणे, वितरण नलिका तयार करणे, सांडपाणी प्रक्रीया केंद्र तयार करणे. (या प्रकल्पा अंतर्गत २०१७-२०१८ चा टप्पा पुर्ण करणे)
- संपुर्ण शहरासाठी एलईडी दिव्यांचा वापर करुन एकात्मिक पथदिवे प्रकल्प राबविणे.
- नविन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली अंतर्गत तरतुदीचा वापर करून हरित इमारत व प्रकल्पांना प्रोत्साहन देणे.
- स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत प्राप्त निधीच्या माध्यमातुन शहरात विविध ठिकाणी Environment Censors लावणे व त्यातुन शहराच्या वातावरणाची माहिती संकलित करुन त्यात सुधारणा करणे.

## मागील तीन वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

| जमा बाजू | डिसेंबर २०१३ अखेर | डिसेंबर २०१४ अखेर | डिसेंबर २०१५ अखेर | डिसेंबर २०१६ अखेर |
|---|---|---|---|---|
| आयातकर / स्थानिक संस्था कर | ६३७.६५ | ७८८.०२ | ११३४.८३ | १०५१.७४ |
| मिळकतकर | ४८०.७४ | ४९९.४६ | ५६९.७८ | ८९८.६० |
| पाणीपट्टी | १०३.४४ | १२४.९ | १३९.७२ | ३५.४९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ४८८.२१ | ५१३.२४ | ५७५.०८ | ४०२.०५ |
| इतर जमा | २९९.३७ | ३७८.१८ | ४८०.२३ | २१७.८७ |
| जेएनएनयुआरएम अनुदान | ४४.९१ | ० | ० | ० |
| शासकीय अनुदान | २२.६९ | ० | ३३.४४ | १२.४१ |
| **एकूण रक्कम रु.** | **२०७७.०१** | **२३०३.८** | **२९३३.०८** | **२६१८.७४** |

| खर्च बाजू | डिसेंबर २०१३ अखेर | डिसेंबर २०१४ अखेर | डिसेंबर २०१५ अखेर | डिसेंबर २०१६ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ५९१.९३ | ६७३.१३ | ८०२.०३ | ७४३.२२ |
| * प्राथमिक शिक्षण | १२४.६ | १३३.९५ | ० | १०७.६४ |
| वीजखर्च व दुरुस्ती | ८९.०९ | १०८.४ | ८०.४६ | १११.०६ |
| पाणीखर्च | ११.६५ | १०.९१ | १२.०९ | ७.५७ |
| कर्जपरतफेड, व्याज व घसारा | ३५.३८ | ३६.९१ | ३९.८४ | ३५.५१ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ५८.७८ | ५०.१२ | ५३.६३ | ६९.७० |
| देखभालदुरुस्ती व इतरखर्च | १९१.३३ | २५८.८३ | २९५.२६ | २८७.१३ |
| वॉर्डस्तरीय कामे | ५.६ | २.६३ | २.२२ | ४.४२ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | १२.७४ | ५.१२ | ६.११ | १८.४३ |
| भांडवलीव विकासाची कामे | ४७२.६८ | ४६१.८८ | ५२९.७७ | ४९८.३५ |
| जेएनएनयुआरएम | १४४.५४ | ७६.२१ | ९१.५५ | ५१.८४ |
| **एकूण रक्कम रु.** | **१७३८.३२** | **१८१८.०९** | **१९१२.९६** | **१९३४.८७** |

# विकास योजना प्रगती आढावा:-

## (१) पाणी पुरवठा(र.रु. ७८८.४४ कोटी )

- **सन २०१६-१७**

  सन २०१६-१७ सालासाठी पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ३२८.५१ कोटी व भांडवली कामासाठी र.रु. ५०१.५२ कोटी असे एकुण र.रु. ८३०.०३ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या अंदाजपत्रकामध्ये मुख्यत्वेकरुन जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मान्य झालेल्या पाणीपुरवठा योजना, पुणे शहरासाठी 24x7 पाणीपुरवठा योजना तसेच कालव्यातून उचलण्यात येणारे पाणी बंद करण्यासाठी बंद नळ योजना इत्यादी कामांसाठी तरतूद करण्यात आली होती. या व्यतिरिक्त पर्वती येथे बांधण्यात येत असलेल्या ५०० द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर असून, अंदाजे ७०% काम जागेवर पूर्ण करण्यात आलेले आहे.

- **सन २०१६-१७ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नावीन्यपूर्ण योजना/प्रकल्प :**

  वडगांव येथे बांधावयाचे जलशुध्दीकरण केंद्र व त्यासाठी आवश्यक ते रॉ वॉटर पंपिंग स्टेशनची कामे पूर्ण करुन, सदरची योजना कार्यान्वित करण्यात आली. तसेच खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्र दरम्यान टाकण्यात आलेल्या दाबनलिकेचे काम सुध्दा पूर्ण करुन सदरची योजना माहे मे २०१६ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. पुणे शहरास समान पाणी वाटप करणेकामी सन २०४७ सालच्या गरजा लक्षात घेऊन बृहत: आराखडा तयार करण्यात आला आहे. र.रु. २८१८ कोटी एवढया अंदाजीत खर्चाची योजना येत्या ३-४ वर्षाचे कालावधीमध्ये राबविण्याचा मानस आहे. सदर योजनेतील संपूर्ण शहरामध्ये ८२ साठवण टाक्या बांधण्याची कामे सुरु करण्यात आली. या व्यतिरिक्त संपूर्ण शहरास १००% मीटर पध्दतीने पाणीपुरवठा करणेकामी निविदा मागविण्यात आले. तसेच शहरामध्ये अंदाजे १७०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकण्यासाठीची र.रु. १७१८ कोटीची निविदा सुध्दा मागविण्यात आले असून, सदरची कामे सन २०१७-१८ मध्ये सुरु करण्यात येणार आहेत.

- **सन २०१७-१८ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक :**

  सन २०१७-१८ सालासाठी महसूल तरतूद र.रु. ३५२.३१ कोटी व भांडवली कामासाठी र.रु. ७८८.५७ कोटी असे एकुण र.रु. ११४०.८८ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. या तरतूदीमध्ये मुख्यत्वेकरुन पर्वती येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या जलशुध्दीकरण केंद्रासाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येणारी २२०० मि.मि. व्यासाच्या दाबनलिकेसाठी सुध्दा तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सन २०१७-१८ चे आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीपोटी असलेली थकबाकी वसूल करणेबाबत मोठया प्रमाणात मोहिम हाती घेण्यात येणार असून, पाणी गळती कमी करणे, अनधिकृत नळजोड शोधून कारवाई करणे इत्यादी कामांवर भर देण्यात येणार आहे.

- **सन २०१७-१८ मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना :**

  २०१७-१८ च्या आर्थिक वर्षात ख-या अर्थाने पुणे शहराच्या 24x7 पाणीपुरवठा प्रकल्पाला वेग दिला जाणार आहे. या प्रकल्पा अंतर्गत ८२ पाण्याच्या टाक्या बांधणे, १६०० किलोमीटर लांबीची वितरण व्यवस्था निर्माण करणे व संपुर्ण शहरामध्ये स्मार्ट मिटर बसविणे इ. कामे पुर्ण करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाकरिता म्युनिसिपल बॉंडस उभारणे अपेक्षित असून त्याची प्रक्रिया लवकर पुर्ण करण्याचा मानस आहे. पुणे शहरास बंद नळातून पाणीपुरवठा करणेचे योजनचे काम सुरु करण्यात आले असून, पर्वती जलशुध्दीकरण केंद्र ते लष्कर जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येणाऱ्या २२०० मि.मि.व्यासाच्या दाबनलिकेचे अंदाजे ७०% काम पूर्ण झाले असून, सदरची योजना माहे जून २०१७ मध्ये पूर्ण करुन कार्यान्वित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त पर्वती येथे बांधण्यात येत असलिले ५०० एम.एल.डी. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र उभारण्याचे काम पूर्ण करुन सदरची योजना माहे जून २०१७ मध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे. भामा आसखेड योजना व वडगांव बुद्रुक येथील जलशुध्दीकरण केंद्राचे काम या आर्थिक वर्षात संपणार असून त्यातुन शहराच्या मोठया लोकसंख्येला पाणी उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

## (२) मलनि:सारण(र.रु. ६९.४३ कोटी)

**सन २०१६-१७**

- **स्टॉर्म वॉटर ड्रेनेज :**

  पुणे महानगरपालिकेमार्फत वारंवार पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होणा-या ठिकाणी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज वर्क्स फॉर फ्रिक्वेन्टली फ्लडींग एरियाज इन पुणे सिटी (Storm water Drainage Project for frequently Flooding Areas in Pune City) र.रू. ४८२ कोटीचा चा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रायमुव्ह इन्फ्रस्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंटस पुणे यांचे मार्फत तयार करणयात आला त्यापैकी पहिल्या टप्प्यात पुणे महानगपालिके मार्फत तरतुद उपलब्ध करून स्टॉर्म वॉटर ड्रेनेज मास्टर प्लॅनच्या आधारे र.रू.११५.८४ कोटी रकमेची कामे सुरू केलेली आहेत.

- **टप्पा क्र.१** : सदर प्रकल्पामधील भाग-१अतंर्गत कोथरूड बेसिन,वारजे बेसिन,शिवाजीनगर बेसिन, औंध बेसिन, बावधान, पाषाण बेसिन, मंगळवार पेठ बेसिन, शनिवार पेठ बेसिन, दत्तवाडी बेसिन, हिंगणे बेसिन, वडगाव बेसिन, धायरी बेसिन व भाग-२ मधील अंतर्गत कळस बेसिन, विश्रांतवाडी बेसिन, धानोरी बेसिन, येरवडा मेंटल हॉस्पिटल बेसिन, विमाननगर बेसिन, हडपसर बेसिन, कोंढवा बेसिन, वाडिया कॉलेज बेसिन या भागासाठी निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली आहे. भाग १ व भाग २ करिता अनुक्रमे रक्कम रुपये ७९ व ९१ कोटीच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत व सदर कामापैंकी भाग-१ मधील सुमारे ८०% (खर्च र.रू.५३ कोटी) काम पुर्ण झाले असुन भाग-२ मधील सुमारे ४०% (र.रू.२२ कोटी)काम पुर्ण झाले आहे.

- **टप्पा क्र.२** :भाग १ व भाग २ येथील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे करणे,कल्व्हर्ट बांधणे,पावसाळी लाईन टाकणे व तदूनुषंगिक कामे करणे, तसेच त्यानुसार वरील प्रमाणे केलेल्या सर्व कांमाची पाच वर्षासाठी देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणे. या भागातील पावसाळी पाण्याचा निचरा भरणे कामी निविदा अनुक्रमे र.रू.५४.२१ कोटी व र.रू.४४.८३ कोटी मागविण्यात आलेल्या आहेत. या कामासाठी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.८५ कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामामुळे पावसाळी पाण्याचा निचरा सुरळीतपणे होऊन जिवीत व वितहानी टाळण्यास मदत होणार आहे.

- **मलवाहिनी :**

  पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नदी व नाल्यामधून उघडयावर वाहणारे मैलापाणी नजीकच्या मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापर्यंत पोहचविण्याबाबत मे.हरित लवाद यांनी दावा क्र.३७/२०१६ व ५५/२०१५ अन्वये आदेश दिलेला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने मे.राष्ट्रीय हरित लवाद यांनी नदीतील पाण्याचे प्रदुषण तपासण्यासाठी I.I.Tमुंबई यांची नियुक्ती केलेली आहे. I.I.T मुंबई यांनी सविस्तर अहवाल सादर केलेला असून त्यांनी केलेल्या शिफारशी च्या अनुषंगाने नाल्यामध्ये मलवाहिन्यांची कनेक्टीव्हीटी करणे, मोठया व्यासाच्या मलवाहिन्या टाकणे या कामांसाठी र.रू.५६.५७कोटी चे पुर्वगणनपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाकरिता निविदा मागविण्यात आली असून सदरहू कामासाठी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात र.रू.३०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

- सदर कामामध्ये ४५० मि.मी.ते १६०० मि.मी.व्यासाच्या सुमारे ५१ कि.मी.लांबीच्या मलवाहिन्या विकसित करण्याचे नियोजन आहे. सदर कामामध्ये नदीनाल्यामधून उघडयावर वाहणारे पाण्याचे प्रमाण कमी होणार असून नदीचे प्रदुषण कमी होण्यास मदत होणार आहे.

- **मैलापाणी शुध्दीकरण योजना :**

  पुणे शहरात आजमितीस ७४४ दशलक्ष लिटर प्रतिदिन एवढे मैलापाणी निर्माण होते. त्या अनुषंगाने सध्या ५६७ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेची मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे पुणे म.न.पा मार्फत उभारण्यात आलेली आहेत. संपुर्ण मैलापाणी शुध्दीकरण करणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत र.रु.९९०.०० कोटीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

सदर योजने अंतर्गत खालील कामांचा समावेश आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजे/पुगप रक्कम (कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | बाणेर-बालेवाडी भागामध्ये मलवाहिनी टाकणे. (४३ कि.मी.) | २३.५० |
| २ | शहरा मध्ये मुख्य मलवाहिनी टाकणे. (७०.६० कि.मी.) | १५६.३० |
| | शहरामध्ये ठिकठिकाणी ११ मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे - एकूण क्षमता ३९६ एम.एल.डी. | |
| ३ | मत्स्यबीज केंद्र व मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. | ५२.९० |
| ४ | भैरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र व कल्याणीनगर पंपिंग स्टेशन बांधणे. | ११२.५० |
| ५ | नायडु मैलापाणी शुध्दीकरण केंद्र, नवीन कसबा, जुना कसबा व तोफखाना येथील पंपिंग स्टेशन मधील सुधारणा करणे. | १५९.६० |
| ६ | वडगांव व वारजे मैलापाणी शुध्दीकरण केंद्र बांधणे. | ८७.४० |
| ७ | तानाजीवाडी व धानोरी येथे मैलापाणी शुध्दीकरण केंद्र बांधणे. | ८६.७० |
| ८ | बोटॅनिकल गार्डन, बाणेर आणि खराडी येथे मैलापाणी शुध्दीकरण केंद्र बांधणे. | १०९.०० |
| ९ | सेन्ट्रल स्काडा सिस्टीम विकसित करणे. | ३.१० |
| १० | पुणे शहरात विविध ठिकाणी २४ कम्युनिटी टॉयलेटस् बांधणे. | ३.२० |
| ११ | जी.आय.एस./एम.आय.एस. प्रणाली विकसित करणे. | १३.०० |
| १२ | लोगजागृती अभियान राबविणे. | ५.४० |
| १३ | प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या जागांचे भूसंपादन करणे. | ३३.१२ |
| १४ | प्रोजेक्ट मॅनेजमेट कंन्लसंटन्सी | ४८.५६ |
| १५ | सर्व्हिस टॅक्स | ६.८० |
| १६ | कार्टेज चार्जेस | ६५.०० |
| १७ | प्राईज एक्सलेशन | २४.१८ |
| **एकूण** | | **९९०.२६** |

वरीलप्रमाणे प्रकल्पीय योजनेनुसार प्रस्तावित असलेल्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्राचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मैलापाणी प्रक्रिया केंद्राचे नाव | एकूण क्षमता |
|---|---|---|
| १ | बोटॅनिकल गार्डन | १० |
| २ | बाणेर | २५ |
| ३ | वारजे | २८ |
| ४ | वडगांव | २६ |
| ५ | तानाजीवाडी | १५ |
| ६ | नायडू | १२७ |
| ७ | धानोरी | ३३ |
| ८ | भैरोबा | ७५ |
| ९ | मुंढवा | २० |
| १० | खराडी | ३० |
| ११ | मस्त्यबीज केंद्र | ०७ |
| **एकूण** | | **३९६** |

- वरील सर्व घटकांचा अंतर्भाव करुन सन २०१४-१५ च्या दरपत्रकानुसार योजनेची पुर्वगणन र.रु.९९०.२६ कोटी एवढी आहे. सदरची योजना जपान सरकारच्या अर्थसहाय्यानक राबविण्यात येणार आहे. यासाठी जपान सरकार कडील जायका संस्थेकडून भारत सरकारला अल्पशा दराने कर्ज देण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडील ई.एफ.सी. (Expenditure Finance Committee) ची बैठक दिनांक ०२/०७/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदरच्या बैठकीमध्ये योजना मंजूर करणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. योजना प्रत्यक्ष राबविण्यापूर्वी भारत सरकार व जपान सरकार दरम्यान करारावर दि.१३/०१/२०१६ रोजी स्वाक्षरी होऊन अंतिम मान्यता देण्यात आली आहे.
- सदरची योजना राबविण्याकरिता योजनेच्या ८५% रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान स्वरुपात पुणे म.न.पा.ला प्राप्त होणार असून, उर्वरीत १५% रक्कम पुणे मनपाने उभारणे अपेक्षित आहे. सदरची योजना सहा वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्याचा पुणे मनपाचा मानस आहे. दि. २९.०२.२०१६ चे मा. डेप्युटी सेक्रेटरी, भारत सरकार यांचे पत्रानुसार केंद्र शासनाकडून एकूण प्रकल्प खर्चाच्या (९९०.२६ कोटी) ८५% नुसार र.रु.८४१.७२ कोटी अनुदान रक्कमेतील पहिला हप्ता र.रु.४.९९ कोटी व दुसरा हप्ता र.रु.२१ कोटी अशी एकूण र.रु.२५.९९ कोटी रक्कम केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाकडे वर्ग करण्यात आलेली असून व त्यांचेमार्फत पुर्ण महानगरपालिकेला वर्ग केली आहे. सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.२००.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर योजना राबविल्यानंतर पुणे म.न.पा हद्दीमध्ये निर्माण होणारे १००% मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणे शक्य होणार आहे.

## (३) <u>घनकचरा व्यवस्थापन(र.रु. ९०.७५ कोटी)</u>

**सन २०१६-१७**

- सन २०१६ -१७ मधील अंदाजपत्रकातुन महानगरपलिका हददीतील घनकचरा महानगरपलिका क्षेत्रातच जिरविण्याच्या दृष्टीने विकेंद्रीत पध्दतीने प्रकल्प हाती घेण्यात आले. यात कमी जागेत व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेण्यात आले असुन खालीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.
- वडगाव बु।। , येरवडा कारागृह येथे बायोगॅस प्रकल्प सुरूकेले १५ मे.टन प्रतिदिन.
- कल्याणीनगर येथे मेकॅ.कंपोस्ट प्रकल्प सुरूकेले ३ मे.टन प्रतिदिन
- बायोमिथेनायझेशन चा ३०० टन क्षमतेचा प्रकल्प सुरूकेला.
- ५४ टन क्षमतेचे थर्मल कंपोस्ट प्रकल्प उभारणी सुरूकेली.
- कात्रज येथे ५० टन क्षमतेचा वर्गीकरण व कंपोस्ट प्रकल्प सुरूकेले.
- घरगुती कचरा जागेवर जिरविण्याचे वाढलेले प्रमाण ४५ मे. टन
- रोकेमची क्षमता ५०० मे.टन पर्यंत करण्याचे नियोजन आहे .
- थर्मल कंपोस्टचे ४६ टन चे प्रक्ल्प सुरूरण्याचे नियोजन आहे.
- उरूळी फुरसुंगी क्चरा डेपोवर ७५० टन क्षमतेचा नविन प्रकल्प सुरूकरण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.
- ५०० टन कचरा विलगीकरण व कंपोस्टचे १०० टन क्षमतेचे प्रकल्प १०० मे.टन.
- १ जाने २०१६ रोजी स्वच्छ पुणे सेवा सहकरी संस्था या कचरा वेचकांच्या सहकारी संस्थेबरोबर करारनामा करण्यात आला असुन सध्या अंदाजे ४.५ लाख मिळकतींमधुन होणाऱ्या विलगीकृत कचऱ्याचे प्रमाण वाढवून १० लाख मिळकतींमधुन विलगीकृत कचरा संकलित क्रण्याबाबतचे नियोजन केले आहे.

- सुका कचरा वर्गीकरणासाठी ४५ शेड उभारणी केली आहे.
- मनपामार्फत प्लास्टिक कचरा संकलनासाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३३२३२ सुरू केला आहे.
- हंजर प्रकल्पाच्या आवारात सध्याच्या शास्त्रीय भुभरावातील रिजेक्टस उचलून घेण्यात आले असुन त्याठिकाणी सध्या शास्त्रीय भुभरावाचे काम सुरू केले असुन भुभरावाचे क्षेत्र वाढवुन पुढील २.५ वर्षाच्या नियोजनाकरीता टेंडर प्रक्रिया सुरू केली आहे.
- शहरातील सर्व प्रभागांमध्ये कचरा व्यवस्थापन व शौचालय व्यवस्थापनाच्या कामाचे मुल्यमापन करण्याचे काम मे. अर्न्स ॲन्ड यंग या संस्थेच्या मदतीने सुरूवात केली आहे. सदर कामाची तपासणी गोखले इन्स्टीट्युट ऑफ ईकॉनामिक्स, सिंबॉयसिस कॉलेज व सेंटर फॉर एन्हायरमेंट एज्युकेशन या संस्थामार्फत सुरू केली आहे.
- कचरा विलगीकरणासाठीच्या अनुषंगाने शालेय विद्यार्थाचे प्रबोधन करण्यासाठी RB कंपनीशी करार केला आहे व मार्गदर्शक पुस्तिका वितरीत करण्यात आल्या आहेत. या संकल्पनेतून कच-यावर प्रक्रिया करण्याच्या विविध माध्यमांची माहिती देणे व प्रबोधन करणेकरिता नियोजन सुरु आहे.
- कचरा व्यवस्थापनमध्ये नागरीकांचा सहभाग वाढविण्याकरीता स्वच्छ प्रभाग व नाविण्यपुर्ण प्रकल्प योजना आखण्यात येत असून त्याचा आराखडा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- आदर पुनावाला क्लिन सिटी मुव्हमेंटचे दि. ७ जानेवारी २०१६ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले. त्या अंतर्गत १३ बेल्जिअम बनावटीची ग्लिटर लिटर सकींग मशिन दाखल झाले आहे. त्यादवारे शहरातील स्वच्छतागृहांची स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच मुख्य सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांच्या साफसफाईसाठी २०१६ अखेरपर्यंत २ रोड स्विपिंग मशिनद्वारे आदर पुनावाला यांचे संस्थेमार्फत करणेत येत आहे.
- कचरा हस्तांतरण केंद्रावर आलेला कचरा त्वरित लॅंडफिल साईटवर नेणेकरिता पुरेश्या प्रमाणात बी.आर.सी. उपलब्ध होणेसाठी सदर विषयाचे देखील निविदा जाहिर करण्यात आल्या आहेत.
- **S'Koch Awards 2016 -**पुणे महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी ६ प्रकारचे पुरस्कार प्राप्त झाले आहे.
- घनकचरा वर्गीकरणाचे (स्वच्छ संस्था व पुणे मनपा) उत्कृष्ठ नियोजनासाठी मा. पंतप्रधानांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुरस्कार.

## सन २०१७-१८

- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध विकासकामामुळे निर्माण होणारा बांधकाम राडारोडा गोळा करणे व वाहतुक करणे व प्रक्रिया कामासाठी DBOOT तत्वावर प्रक्रिया राबविणेसाठी निविदा प्रकिया पुर्ण झाली असुन या अंतर्गत शहरातील बांधकाम राडारोडा गोळा करणे वाहतुक करणे व त्यावर प्रकिया करणार आहे.
- उरुळी देवाची फुरसुंगी येथे ७५० टन मिश्र कच-यावर प्रकिया करण्यासाठी ऑरगनिक रिसायकल सिस्टीम प्रा लि यांना इरादा पत्र देण्यात आले असुन महाराष्ट प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडुन कच-या पासुन विज निर्मिती, आर डी एफ (इधंन विटा) व खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी मान्यता मिळाली आहे.
- कॅपिंगचे उर्वरित काम करण्यासाठी टेंडर प्रक्रिया सुरू केली असुन सदर काम एप्रिल २०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन केलेले आहे. केंद्र सरकारकडे कॅपिंगचे कामासाठी आर्थिक तरतूद मिळणेसाठी दि.१७/३/२०१७ रोजी केंद्रसरकारकडे प्रस्ताव सादर केला आहे.
- हंजर प्रकिया प्रकल्पाच्या अस्तितवातील भुभराव (लॅन्डफिल) पुर्नजिवित करुन नविन भुभराव तयार करण्याचे कामाचे निविदा प्रकिया करणेचे नियोजन आहे.

- सन२०१७-१८ या आर्थिक  वर्षात अजून ११ ग्लिंटर लिटर सकींगमशिनद्वारे कामाची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे.
- आदर पुनावाला संस्थेमार्फत १ हजार ठिकाणी २००० लिटर बिन्स बसविण्याचे नियोजन आहे.
- मोशी येथील२५ हेक्टर खानपड जागा भूभराव व प्रक्रियेसाठी मिळणेचा प्रस्ताव राज्यशासन मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी पाठविला असून तो मान्य झाल्यास पुढील २० वर्षाचे नियोजन होईल.
- हडपसर, कोंढवा, आंबेगाव येथील कचरा प्रकिया प्रकल्पाचे (G P P ) आरक्षणाच्या जागा ताब्यात घेणे व त्याठिकाणी प्रक्ल्पाच्या अनुषंगाने विकास कामे करण्याचे नियोजन आहे. सदर जागांवर प्रकल्प उभारणीबाबत प्रस्ताव तयार करून कार्यवाही करणे.
- पिंपरी सांडस, मोशी येथील जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करणे त्याठिकाणी प्रक्ल्पाच्या अनुषंगाने विकास कामे करण्याचे नियोजन आहे. मोशी व पिंपरी सांडस येथील जागा ताब्यात आल्यानंतर त्याठिकाणी कचरा प्रकिया प्रकल्प व त्या अनुषंगाने भूभरावाची निविदा प्रक्रिया करण्याचे नियोजन आहे.

## (४) आरोग्य

**सन २०१६-१७**

- **वैद्यकीय सेवा** : पुणे मनपाचे दवाखाने व रुग्णालयांमध्ये माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ अखेर एकूण ९,९९,८६७ रुग्णांनी बाह्यरुग्ण सेवेचा लाभ घेतला असून ३३,५९८ रुग्णांनी आंतररुग्ण सेवेचा लाभ घेतला आहे. तसेच लहान-मोठ्या स्वरुपाच्या एकूण ३,६९८ शस्त्रक्रीया पुणे मनपाचे रुग्णालयांमध्ये करण्यात आल्या आहेत. जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत एकूण १३१७७ गरोदर मातांनी प्रसुतिपूर्व वैद्यकीय सेवेचा (ए.एन.सी.) लाभ घेतला. तसेच एकूण ४६८२ मातांची प्रसुति मोफत करण्यात आली आणि गरोदर मातांना व त्यांचे नवजात अर्भकांना मोफत औषधोपचार पुरविण्यात आले.
- **वैद्यकीय सहाय्य योजना** : पुणे महानगरपालिकेचे शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ अखेर आर्थिक दुर्बल गटातील एकूण ११,३०७ सभासदांनी व त्यांचे कुटुंबीयांनी योजनेचा लाभ घेतला.
- **आरोग्य परवाने** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत अंतर्भुत असलेल्या तरतुदींनुसार सन २०१६-१७ मध्ये माहे फेब्रुवारी २०१७ अखेर आरोग्य विषयक विविध प्रकारचे एकूण ४९९ परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आले असून २७ नविन परवाने देण्यात आले आहेत.
- **नर्सिंग होम रजिस्ट्रेशन** : नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट नुसार पुणे महानगरपालिकेमार्फत एकूण ४०० नर्सिंग होम परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आले असून ४५ नविन नर्सिंग होम परवाने देण्यात आले आहेत.

**सन २०१६-१७ मधील महत्वाचे पूर्णत्वास आलेले/सुरू असलेले नाविन्यपूर्ण प्रकल्प**

- कमला नेहरू रूग्णालय येथे अद्ययावत कॅथलॅब प्रकल्प उभारण्यात आला असून या प्रकल्पामुळे शहरातील गोरगरीब व गरजू रूग्णांना अत्यअल्प दरामध्ये ॲन्जीग्राफी ॲन्जोप्लास्टी व बायपास सर्जरी या सुविधांचा लाभ मिळणार आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालय व दवाखान्यांमध्ये गरोदर माता मोफत सोनोग्राफी उपलब्ध होणेकामी नव्याने एकूण ४ ठिकाणी सोनाग्राफी मशिनची उपलब्धता करून देण्यात आली आहे.
- कमला नेहरू रूग्णालय येथे ह्युमन मिल्क बँक कार्यान्वित करण्यात आली असून नवजात अर्भकांना व बालकांना मातेचे दुध उपलब्ध होणे करीता मदत होणार आहे.

- पुणे मनपाचे कोंढवा कत्तलखाना येथे आधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. सदर अत्याधुनिक प्रयोगशाळेत  अन्न व अन्न पदार्थ, पाणी, सुयरेज वॉटर तसेच मांस व मांसजन्य पदार्थांची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून या प्रयोगशाळेस ISO:9001:2008 प्रमाणपत्र व अन्न सुरक्षा कायदा, २००६ अन्वये केंद्र शासनाचे NABL Accreditation (National Accreditation Board for Testing & Calibration Laboratories) मानांकन प्राप्त झाले आहे. प्रयोगशाळेस NABL Accreditation  प्राप्त करणारी पुणे महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली असून त्यामुळे महानगरपालिकेच्या वैभवात भर पडली आहे.
- गणेशपेठ येथील मासळी मार्केटचे आधुनिकीकरण करण्यात आले असून कोंढवा येथील आधुनिक कत्तलखाना देखील कार्यान्वित झाला आहे.

**सन २०१७-१८**

- मे. केंद्र शासनाचे आदेशानुसार शहरातील जन्म मृत्यूच्या नोंदी सिव्हील रजिस्ट्रेशन सिस्टीम (सी.आर.एस.) प्रणाली नुसार करण्यात येणार आहेत. त्यामुळे आगामी काळात मे. केंद्र शासनाचे www.crsorg.gov.in या संकेत स्थळावर जन्म व मृत्यचे दाखले मोफत उपलब्ध होणार आहेत.
- पुणे शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांची गणना करून त्यामध्ये नसबंदी शस्त्रक्रीया झालेले, नसबंदी शस्त्रक्रीया न झालेले तसेच भटकी व पाळीव अशी वर्गवारी करण्यात येणार आहे.
- पुणे मनपाचे प्रसुतिगृह व रुग्णालयांमध्ये दरवर्षी साधारणतः १०,००० प्रसुति होतात. जन्मास येणाऱ्या बालकांमध्ये मुलींचे प्रमाण साधारणतः ५,००० इतके असते. मुलींचा जन्म दर वाढविण्याकरीता प्रोत्साहनपर उपाययोजना म्हणून पुणे मनपाचे प्रसुतिगृह व रुग्णालयांमध्ये जन्माला येणाऱ्या मुलींचे पालकांना बेबी कीट चे वाटप करण्यात येईल. सदर बेबी कीट मध्ये बेबी सोप, बेबी ऑईल, बेबी क्लोथ्स व तत्सम इतर बाबींचा समावेश असेल.
- सुरक्षेच्या दृष्टीने  सर्व दवाखाने, प्रसुतिगृह व रुग्णालयांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.
- दैनंदीन कामकाजामध्ये सुसूत्रता निर्माण होण्याकरीता व पर्यवेक्षणाकरीता सर्व दवाखाने, प्रसुतिगृह व रुग्णालयांमध्ये बायोमेट्रीक यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.
- आगीमुळे उद्‌भवणारी दुर्घटना टाळण्याकरीता सर्व दवाखाने, प्रसुतिगृह व रुग्णालयांमध्ये फायर फाईटींग यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.
- पुणे मनपाचे दवाखान्यांकडील दैनंदीन कामकाजामध्ये अधिक सुसूत्रता प्रस्थापीत करण्याकरीता सर्व दवाखाने, प्रसुतिगृह व रुग्णालयांमधील फार्मसी विभागाकरीता सॉफ्टवेअर व हार्डवेअर प्रणाली उपलब्ध करून दिली जाईल.
- पुणे महानगरपालिकांच्या आरोग्य विभागामार्फत पुणे मनपाच्या रुग्णालये व दवाखाने येथे डायग्नोस्टिक सुविधा व रेडीऑलॉजिस्ट डायग्नोस्टीक सुविधा आऊटसोर्स करण्यात येणार असून या सुविधेमुळे शहरातील नागरिकांना पॅनॉलॉजिन रेडीयोलॉजी डायग्नोस्टिक सुविधा अल्पदरात मनपाच्या दवाखान्यात मिळणार आहे.  सध्या पुणे मनपा कडून केवळ ५० प्रकारच्या प्रयोगशाळा चाचण्या उलब्ध आहेत. सदरची सेवा आऊटसोर्स केल्याने २५० पेक्षा अधिक प्रकारच्या प्रयोगशाळा चाचण्या नागरिकांना अल्प दरात उपलब्ध होणार आहेत.  या शिवाय अत्यल्प दरात लॅब टेस्टची सुविधा नागरिकांना घरपोच मिळण्याची व्यवस्था यात करण्यात येणार आहे.
- **सी.टी.हेल्थ प्लॅन** : सदर योजना आरोग्य खात्यामार्फत राबविण्यात येणार असून सदर योजना सन २०१७-१८ ते सन २०२०-२१ या कालावधीकरीता राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालये व दवाखान्यांकडे माता व बाल यांना केंद्रबिंदू मानून विविध

प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या करीता रक्कम रूपये ५ कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | एकुण दोन रूग्णालयांमध्ये नवजात अर्भक कक्ष (एन.आय.सी.यु.)विकसित करणे. | २ कोटी. |
| २ | विविध रूग्णालयांकडील शस्त्रक्रिया विभाग अदयावत करणे. | १ कोटी |
| ३ | विविध प्रसुतिगृहे व दवाखान्याकडील ओ.पी.डी.विभाग,अंर्तरूग्ण विभाग येथे आवश्यक असणारे शस्त्रे,उपकरणे,यंत्रसामुग्री इत्यादीकरीता | २ कोटी |
| | **एकुण रक्कम रूपये** | **५ कोटी** |

## (५) <u>नगर नियोजन</u>

**सन २०१६-१७**

- **मोबाईल ॲप्लीकेशन (भाग नकाशा व झोन दाखला) :**

  नागरिकांना सुलभरितीने भाग नकाशा व झोन दाखला उपलब्ध होणेसाठी 'पुणे अर्बन' हे मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्यात आले आहे. या मोबाईल ॲप्लीकेशन व्दारे नागरिक झोन दाखला /साईट प्लॅन ऑनलाईन नि:शुल्क पाहु शकतात.तसेच ऑनलाईन पध्दतीने पैंसे भरल्यास ई साक्षांकीत (e-sign) झोन दाखला / साईट प्लॅन प्रत अर्जदारस उपलब्ध करण्यात येत आहे. शहर अभियंता कार्यालयामार्फत ॲटो.डीसीआर सिस्टीम द्वारे ला.आर्कि./ला.इंजि. यांना संगणकद्वारे प्राप्त होणारी माहिती मोबाईल द्वारे देखील उपलब्ध करून देण्याबाबतचे मोबाईल ॲप PMCBP Architect तयार करण्यात आलेले आहे.

  तसेच बांधकाम प्रस्तावाशी संबंधित अभियंता वर्गासाठी देखीलPMCBP official मोबाईल ॲप तयार करण्यात आलेले आहे. झोन दाखला, टी.डी.आर., डेव्हलपमेंट प्लॅन, ७/१२ उतारा, रेडि रेकनर रेट इ. शहर अभियंता कार्यालयाशी संबंधित विविध बाबींची माहिती मोबाईल ॲप-PMC URBAN व्दारे उपलब्ध करून दिलेली आहे.

- **एक खिडकी योजना (सिंगल विंडो सिस्टीम):**

  खाजगी मिळकतीवर बांधकाम करणेसाठी नागरिकांना महापालिकेकडून परवानगी घ्यावी लागते. बांधकाम परवानगी साठी विविध खात्यांची उदा. उद्यान, अग्नीशमन, भूसंपादन, पाणीपुरवठा इ. ना हरकत पत्रे दाखल करावी लागतात. सदरची ना हरकत पत्रे सध्या त्या त्या खात्याकडे अर्ज करुन उपलब्ध करुन घेऊन परवानगीसाठी दाखल करावी लागतात. नागरिकांना होणारा याबाबतचा त्रास कमी करण्याच्या अनुषंगाने व बांधकाम परवानगी सुकर, सुलभ व गतीने होणेसाठी आवश्यक ना-हरकत दाखल्यासाठी एक खिडकी योजना राबविण्यात येत आहे. या प्रणाली मध्ये सर्व आवश्यक NOC साठी अर्ज Onlineदाखल केल्यानंतर संबंधीत खात्याकडे Online पाठविला जाईल व तेथून Online NOC खात्यास प्राप्त होईल. यामुळे NOC साठी प्रत्येक खात्याकडे स्वतंत्र अर्ज करणेची गरज नाही. या अनुषंगाने खात्याने संगणक प्रणाली विकसित केले असून एप्रिल १७ पासुन कार्यान्वीत करण्यात येत आहे.

- **ऑनलाईन पेमेंट गेटवे :**

  बांधकाम परवानगी घेण्यासाठी भरावयाचे विविध रकमा मनपाकडे जमा होणेसाठी खात्याकडून ऑनलाईन पेमेंटची गेटवे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. बँक ऑफ महाराष्ट्र व Billdeskमार्फत सदर सुविधा बांधकाम विकास विभागाकडील बांधकाम प्रकरणासाठी देण्यात येणाऱ्या चलनासाठी उपलब्ध आहे यामध्ये क्रेडीट कार्ड, डिबिट कार्ड, इंटरनेट बँकिंगद्वारे अर्जदार, ला.आर्कि./ला.इजिनिअर/ डेव्हलपर्स सदर चलनाची रक्कम भरू शकणार आहे. ऑनलाईन पेमेंट गेटवेचे सुविधा एप्रिल २०१७ पासुन कार्यान्वित करण्यात येत आहे.

- **पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट येवलेवाडी गावाचा प्रारुप विकास आराखडा :**

  दि. २१.१२.२०१२ रोजीच्या शासन आदेशान्वये शासनाने पुणे महानगरपालिका हद्दीत मौजे येवलेवाडी गावाचा समावेश केला आहे. सदर गावाचा प्रारुप विकास आराखडा तयार करण्यात येऊन तो नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणेसाठी MRTP Act 1966 चे कलम २६(१) नुसार प्रसिध्दीकरीता मा. शहर सुधारणा समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे मान्यतेस सादर केला आहे. मा. मुख्य सभेच्या मान्यते नंतर सादर करण्यात येईल.

- **जीआयएस एंटरप्राईज ॲप्लिकेशन :**

  जीआयएस एंटरप्राईज ॲप्लिकेशन बाबत सांख्यिकी विभागा मार्फत संपूर्ण पुणे महानगरपालिकेतील दैनंदिन कामकाजात सुसूत्रता येणेसाठी व प्रशासकीय यंत्रणेची कार्यक्षमता वाढणेकरीता पुणे महानगरपालिकेच्या सर्व खात्यांना उपयोगी जीआयएस एंटरप्राईज ॲप्लिकेशन तयार करणेसाठीची निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. सदर निविदेनुसार या अंतर्गत विविध विभागाची दैनंदिन कार्यप्रणाली व गरजा लक्षात घेऊन या विभागांच्या कार्यपध्दतीची एकमेकांशी सांगड घालून काम करणेत येत आहे.

## सन २०१७–१८

- **बांधकाम विकास विभागाकडील सिंगल विंडो क्लिअरन्स सिस्टीम(Single window clearance system) -** बांधकाम परवानगी शुल्कातून महापालिकांना मोठया प्रमाणात महसूल मिळतो. नागरीकांना बांधकाम परवानगी गतीने व सुलभपणे मिळणेसाठी केंद्र शासन/राज्य शासन पातळीवर विविध प्रयत्न सुरू आहेत. शासन स्तरावर 'Ease of doing Bussiness'माध्यमातून याबाबत कार्यवाही सुरू आहे. या बाबत केंद्र शासना मार्फत दि. २६/१०/२०१६ रोजी बांधकाम परवानगी गतीने व सुलभपणे मिळणेसाठी मिलीनियम प्लस शहरासाठी निर्देश निर्गमित करण्यात आलेलेल आहेत. या अनुषंगाने बांधकाम परवानगी साठी मनपा अंतर्गत येणाऱ्या विविध खात्याचे ना–हरकत पत्र/दाखला व केंद्र व राज्य शासनाकडील बांधकाम परवानगी शी संबंधित विभाग जसे रेल्वे, पुरात्वत विभागा, नागरी उड्डान विभाग (Airport ), संरक्षण विभाग इ. विभागाचा ना हरकत पत्र/ दाखला संगणकीय प्रणालीचा वापर करून ऑनलाईन पध्दतीने मिळणेकामी संगणक प्रणाली तयार करण्यात येत आहे.
- **बांधकाम प्रस्तावासाठी ई –हस्ताक्षर (डिजीटल सिग्नेचर) चा वापर २०१७–२०१८ :**
- बांधकाम विकास विभागाकडील देण्यात येणाऱ्या विविध दाखले (Certificate) जसे बांधकाम चालु करण्याचा दाखला,जोते तपासणी दाखला,पुर्णत्वाचा दाखला व झोन दाखला, साईट प्लॅन इ. स्वाक्षरीने देण्यात येतात. वरील सर्व दाखल्यासाठी (Certificate) डिजीटल स्वरूपात स्वाक्षरी करणेसाठी सद्यस्थितीत Centre for Development of Advanced Computing (CDAC) चे e-Hastakshar ho Digital Signature चे सॉफ्टवेअर बांधकाम विकास विभागासाठी उपलब्ध करून दिलेले आहे.
- वरील प्रकारे डिजीटल स्वरूपात स्वाक्षरी केल्यावर बांधकाम परवानगी नकाशे, दाखले नागरीकांना ई–मेल द्वारे किंवा सॉफ्ट कॉपी स्वरूपात देणे शक्य होणार आहे. तसेच भविष्यात सदर कागदपत्रांचे डिजीटल स्वरूपातील जतन करणे सोपे होणार आहे. तसेच सिंगल विंडो क्लिअरन्स सिस्टीम (Single window clearance system) मधील संबंधित खात्यांकडील प्राप्त होणाऱ्या ना हरकत पत्र/अभिप्राय यांच्यावर देखील Digital Signature उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.
- वरीलप्रकारे डिजीटल स्वाक्षरीचा वापर बांधकाम चालु करण्याचा दाखला, जोते तपासनी दाखला, पुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी वापर करणारी भारतातील पहिली महानगरपलिका ठरलेली आहे.
- **Discussion Room**

  पुणे महानगरपालिके अंतर्गत बांधकाम प्रस्तावाची स्क्रुटीनी करणेसाठी आणि पेपरलेस ऑफिस संकल्पना राबविण्यासाठी शहर अभियंता कार्यालयात Discussion Room ची उभारणी करण्यात आलेली आहे. बांधकाम प्रकरणांमधील नकाशामध्ये तांत्रिक दुरूस्ती संबंधित अभियंता यांनी टचस्क्रिनवर संबंधित

आर्किटेक्ट ला समजून सांगणे अपेक्षित आहे व त्यानंतर ऑटो डी.सी.आर. प्रणालीद्वारे सुचविलेल्या दुरूस्तीचा नकाशा ऑनलाईन पध्दतीने लॉगईन आयडीवर अपलोड करावयाचा आहे. अशा पध्दतीने ला.आर्कि./ला.इंजि. व शहर अभियंता कार्यालयाकडील अभियंते यांचेमधील बांधकाम प्रकरणाशी संबंधित संवाद व दुरूस्त्या तत्काळ कळविल्यामुळे बांधकाम प्रक्रिया सुलभ व जलदहोण्यास मदत होणार आहे.

- **Paperless Office**

  बांधकाम विकास विभागाकडील कनिष्ठ अभियंता यांचेमार्फत उप अभियंता किंवा कार्यकारी अभियंता यांचेशी बांधकाम प्रकरणाशी संबंधित पत्रव्यवहार लेखी स्वरूपात न ठेवता संगणक प्रणालीद्वारे पेपरलेस ऑफिस पध्दतीचा अवलंब करून स्वरूपात करण्याचे नियोजन आहे. संगणकिय प्रणालीद्वारे प्राप्त विविध निवेदन संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगणक प्रणालीद्वारेच मान्य करावयाचे आहे. बांधकाम प्रकरणाशी संबंधित ला.आर्कि./ला.इंजि. यांचेशी साधण्यात येणारा लेखी स्वरूपाचा पत्रव्यवहार संगणक प्रणालीद्वारे ई-मेल स्वरूपात करण्याचे नियोजन आहे.

## (६) भू-संपादन व व्यवस्थापन(र.रु. ७५ कोटी)

**सन २०१६-१७**

- पुणे शहरासाठी सुमारे ३५ कि.मी.एच.सी.एम.टी.आर. रस्त्याच्या भूसंपादनाचे काम प्रगती पथावर आहे.
- घनकचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प उभारणेकरिता स.नं.४८ बाणेर, वडगांव खुर्द स.नं.५५,५६,५७, आंबेगांव बुद्रुक, स.नं.५१, स.नं.३८ व ३९ कोंढवा बुद्रुक याजागेचे भूसंपादनासाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर केले आहे.

**सन २०१७ -१८**

- पुणे शहरासाठी सुमारे ३५ कि.मी.एच.सी.एम.टी.आर. रस्त्याचा ताबाटीडीआर, एफएसआय, रिझर्व्हेशन क्रेडीट बाँड व भुसंपादनाद्वारे ताब्यात घेण्याचा मानस आहे.
- शहरातील मंजुर विकास आराखडयातील अनेक डी.पी.रस्त्याची रस्ता रुंदीसाठी जागा तडजोडीने एफ.एस.आय / टि.डी.आर. पोटी घेणेचे नियोजन आहे. याबाबत मिळकतधारकांना विनंती पत्रे पाठवून समन्वय बैठक घेणेस सुरुवात करणेस आली आहे. बाधित जागा तडजोडीने ताब्यात देणेबाबत माहिती देऊन मिळकतधारकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

## (७) वाहतूक नियोजन व प्रकल्प(र.रु. १६८ कोटी)

**सन २०१६-१७**

**सार्वजनीक वाहतुक सुधारणा व जे.एन.एन.यु.आर.एम.क्र.२ (विशेष प्रकल्प)**

- नदीसुधारणा, वाहनतळ विकास व सुधारणा, वाहतूक व चौक सुधारणा, जेएनएनयुआरएम/बीएसयुपी अंतर्गत नविन घरे व रात्र निवारा प्रकल्प इ. कामे मार्गी लावण्यात येत आहे. पुणे शहराची वाढती लोकसंख्या व वाहतुकीवर येणारा ताण या बाबींचा विचार करता सक्षम व सुलभ वाहतुकीकरीता यावर्षी **पुणे मेट्रो प्रकल्प** राबविण्यात येत आहे.

**महत्वाच्या पूर्णत्वास / सुरू असलेल्या योजना / प्रकल्प :**

**पूर्ण झालेले प्रकल्प :**

- **खडकी रेल्वे स्टेशन येथे पादचारी पूल बांधणे –** पुणे मुंबई रस्त्याकडे जाताना औंध कडील रहिवासी तसेच रेंजहिल्सकडील रहिवासी यांना लोहमार्ग ओलांडून पुढे जावे लागत आहे. शाळा, कॉलेज, दवाखाने हे पुणे-मुंबई रस्त्याचे पलीकडे असल्याने तसेच रेल्वे मार्गावर उड्डाणपूल पादचारी पूल बांधल्याने रेल्वे मार्ग ओलांडणे सोयीस्कर झाले आहे. सदर कामाचा खर्च अंदाजे रु. १.६९ कोटी इतका आहे. सद्यस्थितीमध्ये १००% काम पूर्ण झाले असून नागरिकांकडून पादचारी पूलाचा वापर सुरु आहे.

- **पुणे-सोलापूर रस्त्यावर हडपसर गाडीतळ येथे उड्डाणपूल बांधणे –** या पुलाचे कामामुळे हडपसर गाडीतळ परिसर व सासवड फाटा चौकातील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत झाली आहे. सदर प्रकल्पाचा संपुर्ण खर्च अंदाजे ३०.०० कोटी आहे. सदर काम माहे जूलै २०१६ मध्ये पूर्ण करणेत आलेले आहे.

**एप्रिल २०१७ अखेर पूर्ण होवू शकणारे प्रकल्प :**

- **स्वारगेट उड्डाणपूल** :स्वारगेट चौकात उड्डाणपूल बांधणेचे काम पुणे महानगरपालिकामार्फत अंशदान ठेव पध्दतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करून घेणेत येत आहे. कात्रजकडून सारसबागेकडे व हडपसरकडे जाणाऱ्या मोठया उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले असून सदर उड्डाणपूल दि.२७/०५/२०१६ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आला आहे. स्वारगेट जेधे चौक येथे उड्डाणपूल, वाहन भुयारी मार्ग व पादचारी भुयारी मार्ग बांधणे या प्रकल्पाची अंदाजित रक्कम रु. १५७.८५ कोटी इतकी आहे. त्यापैकी पुणे महानगरपालिकेकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सन २०१५-१६ अखेर पर्यंत र.रु. ९९.५० कोटी इतकी रक्कम देण्यात आली आहे. महानगरपालिका सन २०१७-१८ अंदाजपत्रकात स्वारगेट उड्डाणपूलासाठी रु.२.०० कोटी व स्वारगेट उड्डाणपूलांतर्गत येणा-या सेवा वाहिन्या हलविण्यासाठी रु. २.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

- **मुंढवा येथे मुळा मुठा नदीवर पूल बांधणे** : नगर रस्ता ते हडपसर यांना जोडण्या-या रस्त्यावर मुळा-मुठा नदीवर नवीन पूल बांधण्याचे काम हाती घेणेत आलेले आहे. सदर कामाची प्रकल्पिय रक्कम रुपये २३.४६ कोटी इतकी आहे. या कामासाठी सन २०१६-१७ मध्ये १४.७० कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदर पुलामुळे या रस्त्यावरील वाहतूकीचा ताण कमी होणार आहे. सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रामध्ये रक्कम रुपये ५.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर पूलाचे काम माहे एप्रिल २०१७ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.

**सन २०१७-१८**

- **बालेवाडी स.नं. ४६/४७ येथे मुळा नदीवर पुल बांधणे** :स.नं. ४७ बालेवाडी येथे मुळा नदीवर सहा पदरी पुल बांधणेचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाचा खर्च अंदाजे रक्कम रुपये ३० कोटी इतका अपेक्षित आहे. सद्या एकूण कामापैकी ६०% काम पुर्ण झाले आहे.

- **अभियांत्रिकी महाविद्यालय ते पाटील इस्टेट दरम्यान उड्डाणपूल बांधणे** : सन २०१७-१८ या अर्थिक वर्षामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय चौकामधील‘ए’ व ‘एस’ पुलाचे उर्वरीत काम पुर्ण करणेकरीता र.रु. ५.०० कोटी एवढी तरतूद सुचविण्यात आलेली आहे. मे २०१७ अखरे दोन्हीपुलाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

- **युनिव्हर्सल चौक व कमिन्स कॉलेज चौक वारजे रोड येथे उड्डाणपूल बांधणे** : सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये कमिन्स कॉलेज चोक येथील उड्डाणपूलाचे उर्वरीत काम पुर्ण करणे आणि युनिव्हर्सल चौक येथील पुलाचे काम करणेकरीता एकूण र.रु. ६.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. माहे एप्रिल २०१७ अखरे कमिन्स कॉलेज चौकातील पुलाचे काम पुर्ण करणे व युनिव्हर्सल चौकातील पुलाकरीता जागा ताब्यात मिळाल्यास या पुलाचे काम पुर्ण करण्याचे खात्याचे नियोजन आहे.

- **लुल्लानगर चौकात उड्डाणपूल बांधणे** :कोंढवा येथील लुल्लानगर चौक येथील उड्डाणपूल बांधणे या कामाची प्रकल्पीय रक्कम रुपये १५ कोटी इतकी असून, उड्डाणपूलासाठी आवश्यक संरक्षण खात्याकडील जागा भाडे करारावर उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर उड्डाणपूलाच्या आराखड्यास संरक्षण विभागाचा ना हरकत दाखला माहे जून२०१६ मध्ये प्राप्त झालेला असून त्यानुसार सप्टेंबर २०१६ मध्ये कामास प्रत्यक्ष सुरुवात करणेत आलेली आहे. या कामासाठी १८ महिने इतकी विहीत मुदत असून सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये सदर कामासाठी रक्कम रुपये १०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

- **हडपसर ससाणेनगर येथे रेल्वे गेट जवळ भूयारी मार्ग बांधणे** : हडपसर ससाणेनगर येथील रेल्वे भूयारी मार्गाकरिता रक्कम ३७.०९ कोटी रकमेची निविदा मान्य करणेत आली असून, रेल्वे खात्याकडील मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा कालावधी ३० इतका महिने असून चालु वर्षातील सन २०१६-१७ अंदाजपत्रकामध्ये सदर कामासाठी रक्कम रुपये ७.०० कोटी इतकी तरतुद उपलब्ध आहे. सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये सदर कामासाठी रक्कम रुपये २.०० कोटी इतकी रक्कम सुचविणेत आलेली आहे.

- **मुंढवा स.नं. ८९ व ७१ दरम्यानचे पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर २४मी. एचसीएमटीआर साठी रेल्वे ओलांडणी पूल बांधणे** : सदर ठिकाणी एच.सी.एम.टी.आर रस्त्याकरिता उड्डाणपुल प्रस्तावित आहे. या कामाची मुदत २४ महिन्यांची आहे. सदर कामामुळे हडपसर मुंढवा भागातील २४ मीटर रुंदीचा एच.सी.एम.टी.आर. रस्ता जोडला जाणार असून मगरपट्टा व हडपसर परीसरातील वाहतुक या रस्त्यावरून सुरू होऊन सध्याच्या मगरपट्टारस्त्यावरील व सोलापूर रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. सदर कामाचा अपेक्षीत खर्च र.रु. २४.७५ कोटी इतका आहे. या कामा करीता सन २०१७-१८ मध्ये र.रु. १५.०० कोटी तरतूद आवश्यक असल्याने करण्यात आलेली आहे.

- **रामवाडी भूयारी मार्गाचे उर्वरीत काम पूर्ण करणे** : या ठिकाणी पादचा-यांबरोबर वाहनांसाठीही भूयारी मार्ग तयार करण्यात येत असुन, उर्वरीत कामांकरीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ३.५० कोटी इतकी तरतुद काम पूर्ण करणेसाठी करण्यात आलेली. तसेच भूसंपादन विभागामार्फत जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून जागा ताब्यात मिळाल्यास या पूलाचे काम पूर्ण करणेचे खात्याचे नियोजन आहे.

- **अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे** :पुणे महानगरपालिकेतर्फे अलंकार थिएटरजवळ रेल्वे उड्डाणपूलाचे रूंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले. सदर कामामध्ये जागेबाबतचा वाद न्यायप्रविष्ट होता.या मध्ये जागामालकाबरोबर तडजोडीने वाद मिटविणेत आला आहे. सदरील प्रकल्पाचा खर्च र.रु.१०.७७ कोटी असुन चालु अंदाजपत्रकात र.रु.१०.००कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

- **बीएसयुपी - डॉरमेटरी (रात्रनिवारा प्रकल्प)** : मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. १९६/२०१ अन्वये सर्व राज्यांना पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये नाईट शेल्टर सुरू करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. पुणे शहरामध्ये एकुण १५९४ बेघरांसाठी सोय करावयाची आहे. यापैकी १७७ बेडस्चे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

- **पुणे शहरातील नदीवरील व रस्त्यांवरील पुलांचे दुरूस्ती व देखभाल** : पुणे शहरातील नदीवरील व रस्त्यावरील पुलांची देखभाल व दुरुस्ती करणेसाठी सन २०१६-१७ या अंदाजपत्रकात रक्कम रुपये ७.०० कोटी इतकी तरतूद करणेत आलेली असून, पुलाच्या कामांच्या दुरुस्तीची निकड लक्षात घेता खालील पुलांच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे.

  १. म्हात्रे मुठा नदीवरील पुल
  २. संभाजी मुठा नदीवरील पुल (लकडीपूल)
  ३. गाडगीळ मुठा नदीवरील पूल (झेड ब्रीज)
  ४. शिंदे पूल मुठा नदीवरील (बालगंधर्व)
  ५. शिवाजी पूल मुठा नदीवरील (नवा बाजार पूल)
  ६. डेंगळे मुठा नदीवरील पूल
  ७. मुंढवा मुळा-मुठा नदीवरील पूल (जुना)

  या सर्व पुलांच्या दुरुस्तीची कामे मार्च २०१७ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

- **डेंगळे पुलास नविन समांतर पूल तयार करणे-** अस्तित्वातील जुना डेंगळ पूल वाहतूकीसाठी कमी पडत असल्याने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध झाल्याने माहे डिसेंबर २०१६ मध्ये र.रु. २०.२३ कोटीची निविदा मान्य करुन वर्कऑर्डर देण्यात आली आहे. या कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. ५.५ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

**सन २०१७-१८**

- **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प** : पुणे महानगराची सुमारे ७५ लाखापर्यंत पोहोचलेली लोकसंख्या, वाहनांची सुमारे ४० लाखापर्यंत पोहोचलेली संख्या तसेच पुढील २ ते ३ दशकातील लोकसंख्या व वाहन संख्या वाढीचा अंदाज सी.एम.पी. (Comprehensive Mobility Plan) अहवालाद्वारे घेण्यात येऊन सार्वजनिक वाहतूक समस्या सोडविण्यासाठीच्या विविध उपायांपैकी नागरिकांचा वैयक्तिक वाहन वापर कमी करणेसाठी मेट्रो रेल्वे ही वेगवान, प्रदुषणमुक्त, विना अडथळा, इंधन व वेळेची बचत करणारी, पार्किंग प्रश्न कमी करणारी मोठी वहन क्षमता असलेली सार्वजनिक वाहतूक सुविधा पुणे महानगरासाठी होणार आहे.

- राज्य शासनाने २९ ऑक्टोबर २०१३ च्या शासन निर्णय क्र.पीएमआर ३३१३/प्र.क्र.२९/युडी-७ अन्वये मेट्रो रेल प्रकल्पाच्या एकूण ३१.५ कि.मी. लांबीच्या टप्पा क्र.१ ला मान्यता दिलेली आहे. केंद्रीय शहर विकास मंत्रालयाने ११ फेब्रुवारी २०१५ अन्वये तत्वतः मान्यता दिलेली आहे.

- पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये ३१.२५४ कि.मी.लांबीच्या २ मार्गिकांचा समावेश असून प्रत्येक मार्गिकेसाठी एका डेपोचा समावेश आहे. या डेपोचा उपयोग ट्रेन थांबण्यासाठी, स्वच्छता, नियमीत तपासणी, छोटे मोठ्या दुरूस्त्या इ. साठी होणार आहे.

- **मार्गिका क्रमांक १** : पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेची लांबी १६.५९ कि.मी. पैकी ११.५७ कि.मी.उन्नत व ५.०१९ कि.मी. भूमिगत आहे. या मार्गिकेवर ९ उन्नत स्टेशन्स असून ६ भूमिगत स्टेशनचा समावेश आहे. मार्गिका क्रमांक २ :- वनाज ते रामवाडी या मार्गिकेची लांबी १४.६६५ कि.मी. असून ही संपूर्ण मार्गिका उन्नत आहे व यावर १६ उन्नत स्टेशन्स आहेत. नोव्हेंबर २०१५ च्या दरानुसार या मार्गिकेचा अंदाजित खर्च रुपये २७९४ कोटी व दोन्ही मार्गिकांचा एकूण अंदाजित खर्च रुपये ८१२७ कोटी व प्रकल्पाचा पूर्णत्वाचा सन २०२२-२३ अंदाजित खर्च रुपये ११४२० कोटी असणार आहे. मे.केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक ०७ डिसेंबर २०१६ च्या बैठकीद्वारे पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पास अंतिम मान्यता मिळाली. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे नविन कृषी महाविद्यालय, सिंचन नगर, भोसलेनगर येथे दिनांक २४ डिसेंबर २०१६ रोजी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. सन २०१७-१८ साठी र.रु. ५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

* **हॅरिस पूलालगत नवीन पूल बांधणे** :जुन्या पुणे-मुंबई रस्त्यावर बोपोडी येथे ब्रिटीश कालीन हॅरिस पूल असुन सदरचा पूल जुना झाला आहे. तसेच या ठिकाणी पर्यायी पूल बांधणे आवश्यक आहे. सदर पूलाचे बांधकाम हे पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपाकडून संयुक्तपणे आर्थिक तरतूद वापरून करणेत येणार आहे. सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात पुणे मनपाच्या हिश्यापोटी रक्कम रु. ५.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

* **पुणे शहरातील नदीवरील व रस्त्यांवरील पुलांचे दुरूस्ती व देखभाल :** सद्यस्थितीत रस्त्यावरील प्रामुख्याने उड्डाणपूले, भूयारी मार्ग, रेल्वे ओलांडणी पूल तसेच पादचार पूल यांची खात्याकडील तज्ञ सल्लागाराच्या अहवालाची तपासणी केली असता, काही पूलांचे तातडीने मजबुतीकरण व दुरूस्ती करणे आवश्यक आहे. या करीता सन २०१७-१८ मध्ये र.रु. ४.०० कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

* **रस्त्यांवरील टी जंक्शनचा विकास व सुधारणा करणे** :वाहतुक पोलिसांकडील अभिप्राय व जागेवरील परिस्थिती यांचा अभ्यास करुन शहरातील विविध चौक व टी जंक्शन यामध्ये वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने चॅनलायझर करणे,डिव्हायडर करणे, वाहतुक बेटे निर्माण करणे अथवा त्यात सुधारणा करणे चौकांचे सुशोभिकरण करणे इत्यादी कामे केली जातात. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये या कामासाठी ३.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून पुढील ठिकाणी सुधारणा कामे करणेचे नियोजन आहे.

* व्ही. आय. टी. हॉस्टेल चौक, भारत फोर्ज ते बी.टी.कवडे रोड, तळजाई रोड, काळेबोराटे चौक, काळेपडळ मारुती मंदिर, बोपोडी हॅरिसब्रीज चौक, फाईव्ह नाइन चौक, पीएमसी बसस्टॉप चौक, सूर्या हॉस्पिटल चौक, पूरम चौक, उंड्री हडपसर चौक, पाषाण साई चौक, कर्वेनगर सहवास कॉर्नर, शितल पेट्रोलपंप कोंढवा, पुणे युनिर्व्हसिटी चौक, शिवाजीनगर चौक, आर.टी.ओ. चौक, ब्ल्यू डायमंड चौक, आंबेडकर चौक बोपोडी, तात्याराव दांगट चौक, कुसाळकर चौक, बंडगार्डन चौक, टपळे पार्किंग, गंगाधाम चौक, गिरीधरभवन चौक, रविदर्शन चौक, शत्रुंजय चौक, जांभूळकर चौक वानवडी, जगतापनगर चौक वानवडी, मांगिरबाबा मंदिर चौक, साऊथ कमांड हॉस्पिटल, हडपसर गाडीतळ चौक.

* **पुणे शहरातील घोरपडी येथे मिरज रेल्वे लाईन व पुणे सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधणे**: सन २००८ मध्ये पुणे मनपामार्फत पुणे सोलापूर रेल्वे लाईन व पुणे मिरज रेल्वे लाईन येथे १३ मी. रुंदीचे दोन संलग्न रेल्वे उड्डाणपूल प्रस्तावित करण्यात आले आहेत. प्रस्तावित पूलांसाठी आवश्यक जागा इंडियन रेल्वे, पुणे कॅन्टोन्मेंट व संरक्षण विभाग यांचे अखत्यारीत असून त्यातील रक्षा संपदा विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेमार्फत प्रस्तावित उड्डाणपूलासाठी दि. १२/०८/२०१६ अन्वये 'Working Permission' देण्यात आलेली आहे. प्रस्तुत कामी निविदा प्रक्रिया राबविणेचे दृष्टीने तज्ञ सल्लागार नेमणूक कार्यवाहीस सुरुवात करणेत आलेली असून या कामासाठी आवश्यक जागा ताब्यात घेणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. सदर कामासाठी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात १०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

* **शहरी एकात्मिक सायकल आराखडा**:पुणे शहरामध्ये वाढणा-या वाहतुकीमुळे ब-याच ठिकाणी वाहनांची गर्दी व त्यामुळे प्रदुषणात भर पडत आहे. पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणुन प्रसिध्द होते व त्याचे लौकीक कायम ठेवणेसाठी व पुणेकरांनी सायकलींचा वापर जास्तीत जास्त करावा या हेतुने शहरी एकात्मिक सायकल आराखडा तयार करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी अस्तित्वात असणारे सायकल ट्रॅक व उर्वरित आवश्यक ठिकाणी सायकल ट्रॅक करुन त्याचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता पुढीलप्रमाणे नियोजन आहे.
    * स्वतंत्र सायकल ट्रॅक - महत्वाच्या मोठया आणि गर्दीच्या रस्त्यांवर
    * रंगित सायकल ट्रॅक - जिथे स्वतंत्र सायकल ट्रॅक करण्यास शक्य नाही अशा रस्त्यांवर.
    * एकत्रित सायकल ट्रॅक - जिथे अरुंद रस्ते आहेत तिथे.
    * आजमितीस अस्तित्वातील दुरुस्त करुन वापरात येणारे सायकल ट्रॅक अंदाजे ७१ कि.मी.

- प्रस्तावित सायकल ट्रॅक – १४५ कि. मी.
- प्रस्तावित सायकल लेन – ५९ कि. मी.
- प्रस्तावित हिरवा लेन – १३२ कि. मी.

पुणे सायकल योजना ही शहरी सायकलिंगकरिता मार्गदर्शक तत्वे बनविणर असून सदरची तत्वे ही Urban Street Design Guidelinesमध्ये अंतर्भुत करण्यात येणार आहे.

- **पब्लिक बायसिकल शेअरींग सिस्टीम –** यामध्ये पुणे शहरासाठी प्राथमिक स्वरुपात ६८० अत्याधुनिक स्टेशन प्रस्तावित असून फेज १ साठी अंदाजे ३८८ स्टेशन्स प्रस्तावित आहेत व त्यासाठी अंदाजे ४६५० सायकलिंचा वापर करण्यात येणार आहे. सदर योजनेमध्ये नागरिकांसाठी पुणे शहराअंतर्गत वापराकरिता पुणे महानगरपालिकेमार्फत भाडेतत्वावर सायकली उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. फेज १ मध्ये पुणे मुख्य शहर, बिबवेवाडी, कोंढवा, वानवडी, धनकवडी, सहकारनगर, सिंहगड रोड, एंरडवणे, गणेशखिंड रोड आणि येरवडा परिसरातील भागात योजना प्रस्तावित आहे.

वरील प्रकल्प राबविण्यासाठी रक्कम रुपये १०० कोटी तरतुद करण्यात आलेली आहे.

## (८) पथ(र.रू. ४३३ कोटी)

### सन २०१६–१७

- पथ विभागाने यावर्षी खोदाई व रिईन्स्टेटमेंट यामध्ये सुसुत्रता आणणेसाठी ट्रेंचिंग पॉलिसी 'मार्गदर्शन पुस्तिका' तयार केलेली आहे. त्यानुसार अंमलबजावणी सुरु झालेली असून सदर मार्गदर्शन पुस्तिका पुणे महानगरपालिकेच्या सर्व विभाग व सर्व सेवासुविधा पुरविणाऱ्या कंपन्यांवर बंधनकारक राहणार आहे. तसेच नागरिकांच्या सुविधेसाठी पथ विभागामार्फत ऑनलाईन खोदाई परवानगीसाठी आवश्यक असणाऱ्या अर्जांचे मोबाईल ॲप्स विकसनाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सर्व ओएफसीधारक केबल कंपन्या व अन्य सेवा सुविधा धारक कंपन्या यांना खोदाईमुक्त तंत्रज्ञानाचा अवलंब करुन रस्ते खोदाईची कामे करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

- सन२०१६–१७ च्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून ३६किमी लांबीचे डांबरी रस्ते व सुमारे ५४ कि मी लांबीचे थिन व्हाईट टॉपींग कॉंक्रीटचे रस्ते पुर्ण करण्यात आलेले आहे.

- नरवीर तानाजी मालुसरे (सिंहगड) रस्त्यावरील वाहतुकीचा ताण वाढत असल्यामुळे त्यासाठी पर्यायी रस्ता म्हणुन पु.ल. देशपांडे उदयान, पर्वती ते वडगांव बु।। येथील फनटाईम थिएटर दरम्यान बेबी कॅनॉलच्या कडेने ७.५ मी. रुंदीचा रस्ता विकसनाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदरचे काम हे सुमारे ४५०० र.मी. चे असून तीन टप्प्यामध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये वडगाव बु।। ते हिगंणे दरम्यान सुमारे २०००र.मी. लांबीपैकी १४००र.मी. रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातील सुमारे १६००र.मी. पैकी हिंगणे ते विश्रांतीनगर या भागातील काम प्रगतीपथावर आहे.

- **कात्रज कोंढवा रस्ता**

पुणे मनपा हददीत या रस्त्यापैकी कात्रज व पिसोळी दरम्यान ३.७किमी.रस्त्याचा अंतर्भाव होत आहे. पुणे महानगरपालिकेने या रस्त्याचे महत्त्व लक्षात घेउन प्रादेशिक विकास आराखडयातील या ६० मी. रूंदीच्या रस्त्यावर पुणे मनपाच्या मंजुर विकास योजना आराखडयामध्ये त्यानुसार दोन्ही बाजूने १२ मी. रुंदीचे सर्व्हिस रस्ते दर्शविलेले आहे. त्यानुसार पुणे मनपा हददीतील ३.७ कि मी. रस्त्याच्या विकसनाबाबत प्रस्ताव तयार केलेला आहे. यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रस्तावामध्ये पुर्ण ८४मी. रुंदीचे विकसन करताना एकुण ५ ठिकाणी अंडरपास व ग्रेड सेप्रेटर यांचा समावेश केलेला आहे. त्यासाठी सुमारे र.रु. २१५.४३ कोटीचा खर्च अपेक्षित आहे.

- **बी.आर.टी. योजना**

- पुणे मेट्रोचे काम सुरु होत आहे. पुणे मेट्रोशी संलग्न व सुसंगत अशी सार्वजनिक वाहतुक व्यवस्था म्हणजे बसची वाहतुक व्यवस्थाही सुधारणे आवश्यक आहे. तसेच बी.आर.टी.चे मार्गही वाढविणे आवश्यक आहे. या पुर्वी पुणे महानगरपालिकेने संगमवाडी ते विश्रांतवाडी चौक, आळंदी रस्ता हा ७ किमी. आणि येरवडा पर्णकुटी चौक ते खराडी, नगर रस्ता हा ९किमी. रस्त्याचा बी.आर.टी. मार्ग विकसन केलेला आहे.

- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रावेत ते सांगवी फाटा व निगडी ते दापोडी पर्यंत बी.आर.टी. मार्ग सुरु केलेला आहे. या मार्गाशी संलग्न पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये औंध राजीव गांधी पुल ते सिमला ऑफिस सुमारे ६.५ किमी व हॅरिस पुल ते पाटील इस्टेट जंक्शन पर्यंत सुमारे ५.७ किमीच्या बी.आर.टी.मार्गाचे नव्याने विकसन करण्याचे नियोजन केलेले आहे. तसेच संगमवाडी ते पाटील इस्टेट जंक्शन पर्यंत सुमारे १.२ किमी बी.आर.टी.मार्ग वाढविणेचे कामही सुरु करण्यात आले आहे.

- सातारा रस्ता, स्वारगेट कात्रज दरम्यानच जुन्या दहा वर्षापुर्वीच्या बी.आर.टी.मार्गामध्येही दोन उड्डाण पुल, दोन अंडरग्राऊंड रस्ते इत्यादी विविध कामे करताना बी.आर.टी.मार्गाची मोडतोड झाल्याने स्वारगेट ते कात्रज या सुमारे ६.२की.मी. बी.आर.टी.मार्गाची पुर्नबांधणी व पुनर्विकसनाचे काम सुरु करण्यात आले आहे. यामध्ये नव्याने बी.आर.टी. मार्गाचे मध्यभागी बस शेल्टर , पदपथ, सायकल टॅक, स्वतंत्र मोटार व्हेईकल लेन, सार्वजनिक टॉयलेट ब्लॉक, क्युऑस, नागरीकांना सार्वजनिक वापरासाठी जागा ई.सुविधांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

- शिवणे ते खराडी नदीकाठचा १००फुटी १७किलोमीटर लांबीचा डी.पी. रस्ता शिवणे ते म्हात्रे पूल आणि संगमवाडी ते खराडी दरम्यान कॉंक्रिटीकरणाचे काम फुटपाथ/सायकल ट्रॅक /चौक विकसन/ कल्व्हर्ट इ. सह प्रगतीपथावर आहे. येथील जागा ताब्यात आलेल्या ठिकाणी टप्पेनिहाय काम पुर्ण करुन तेथे वाहतुक सुरु करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्पाची अंदाजे रक्कम रुपये ३६३ कोटी इतकी असून, डिफर्ड पेमेंट पध्दतीचे काम असल्याने आतापर्यंत सुमारे रक्कम रुपये ७७कोटी इतका खर्च झालेला आहे. यामध्ये ५.७ किमी. पर्यंतचे काम पुर्ण करणेत आलेले आहे.

- पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पी.पी.पी.) योजने अंतर्गत रस्ते सदर योजने अंतर्गत खराडी, बाणेर बालेवाडी येथील ३० मी.रुंदीच्या व प्रमुख डी.पी.रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

- पुणे महानगरपालिकेकडील पथ विभाग येथील हॉट मिक्स प्लान्ट हा सुमारे २३ वर्षे जुना असल्यामुळे त्यामध्ये वारंवार बिघाड होण्याचे प्रमाण वाढले होते. यासाठी नविन बॅच मिक्स टाईपचा प्लॅन्ट (१२० मे.टन प्रति तास क्षमतेचा) उभारण्याचे काम पुर्ण झाले आहे.

- पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने प्लॅस्टीक वेस्टचा उपयोग डांबरी मिक्स मालामध्ये प्रथमच करणेत आला आहे. सदर काम आय.आर.सी. (एसपी) ९८-२०१३ या मानकांनुसारकरणेत आले असुन सध्या एकुण १० रस्त्यांची सुमारे १.५ किमी. लांबीची कामे पूर्ण करणेत आली आहेत.

## सन २०१७-१८

(भांडवली तरतुद रक्कम रुपये ४३३. ०० कोटी )

- **अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन** : राष्ट्रीय नागरी परिवहन धोरण व सर्वंकष वाहतूक आराखडयानुसार पुणे शहरातील रस्त्यासाठी योग्य ते नियोजन करणेसाठी व सर्व रस्त्यांचे रुंदीनुसार रस्त्यांचे डिझाईनमध्ये एकसुत्रता राहणेसाठी सर्व अभियंता यांना मार्गदर्शन ठरेल यासाठी अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार रस्त्यांचे पुर्नविकसन करताना या पुस्तिकेतील मार्गदर्शक नकाशांचा वापर करण्यात येत आहे.

- **सेफ्टी ऑडिटः** पुणे शहराचे नागरीकरण व लोकसंख्येमध्ये सातत्याने वाढ होत आहे. अपुरी सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेमुळे गरज म्हणुन खाजगी वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अस्तित्वातील रस्ते रहदारीने व्यापुन जात आहे. परिणामी रस्ते केवळ स्वयंचलित वाहतुकीसाठीच असल्याची भावना होउन पादचारी व सायकलस्वार यांचेकडे दुर्लक्ष होत आहे. याकरिता नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने व नागरिकांना सुरक्षितपणे दळणवळण सुविधा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने पुणे महानगरपालिका हददीतील २००कि.मी. मुख्य रस्त्याचे सेफ्टी ऑडिट करणेबाबतची कार्यवाही सुरु केली आहे. यामध्ये रस्त्यावरील सर्व वापर करणा या घटकांचा विचार करण्यात येणार आहे. त्यानुसार रस्त्याचे पुर्नविकास व नव्याने कामे करताना या अहवालाचा विचार करुन नव्याने रस्ता आराखडा तयार करणे शक्य होईल व त्यामध्ये सर्व घटकांचा विचार करुन सर्वांना समान न्याय देऊन त्यांचेसाठी रस्त्याचा काही भाग राखुन ठेवणेबाबत नियोजन करणे शक्य होईल. इंडियन रोड कॉंग्रेस (एस पी) ८८-२०१० नुसार सेफ्टी ऑडिट करणेत येणार आहे. त्यानुसार आवश्यक त्या उपाय योजनांची कामे पुणे शहरात करण्यात येणार आहेत.

- **एच.सी.एम.टी.आर.प्रकल्प** : पुणे मनपाच्या १९८७ च्या मान्य विकास आराखडयामध्ये २४ मी. रुंदीचा एच.सी.एम.टी.आर.रस्ता दाखविणेत आला असून त्याची लांबी सुमारे ३५ कि.मी. इतकी आहे. तज्ञ सल्लागार यांनी एलव्हीटेड एच.सी.एम.टी.आर. प्रस्तावित केला आहे. त्यानुसार तज्ञ सल्लागार यांनी प्राथमिक अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये २४ मी रुंदीमध्ये मध्यभागी सार्वजनिक व्यवस्थेच्या अनुषंगे बी.आर.टी दोन मार्गीका व दोन्ही बाजुस इतर वाहनांसाठी दोन मार्गीका सुचविणेत आल्या आहेत. एकुण सहा पदरी रस्ता प्रस्तावित आहे.

- प्रस्तावित एच.सी.एम.टी.आर. व पिंपरी चिंचवड एच.सी.एम.टी.आर. यांची कार्यवाही बाबत समन्वय साधून मे. शासनाकडे प्रस्ताव सादर केला असल्याने दोन्ही शहरातील वाहतूकीस फायदा होणार आहे. अलाईनमेंटवरील जीओटेक्नीकल सर्व्हे सुरु असून, तज्ञ सल्लागार यांचेमार्फत अंतिम अहवाल (DPR) तीन महिन्यात सादर करणेत येईल. सदर एचसीएमटीआर पुणे शहराचे मध्यवस्तीतुन पुर्णपणे एलिव्हेटेड असल्यामुळे नागरिकांना वाहतुकीस मोठ्या प्रमाणात पर्यायी व्यवस्था उपलब्ध होणार आहे. तसेच बीआरटी मार्ग प्रस्तावित असल्यामुळे सार्वजनिक वाहतुक व्यवस्था बळकट होणेस मदत होणार आहे.

- **रोड मेंन्टेनंस व्हॅन** : शहरातील मुख्य रस्त्यांवर दुरूस्तीची कामे करणेसाठी कोणतीही सक्षम यंत्रणा नसल्यामुळे अशी कामे वेळेवर करणे शक्य होत नव्हते या बाबींवर उपाय योजना करणेसाठी मोबाईल मेन्टनस व्हॅन कार्यान्वीत करण्यात आल्या आहेत यामध्ये रस्त्यावरील चेंबर्स, मटेरीअल, राडारोडा उचलणे, करणे, खराब रस्त्याचे पॅच वर्क करणे इत्यादी कामे केली जातात. सदर व्हॅन्स सर्व प्रकारची सुरक्षा साधने Vehicle Tracking System इ. ने अद्ययावत करणेत आली आहेत. अशा ४ गाड्यांच्या यशस्वी प्रयोगानंतर ८ नवीन गाडया कार्यान्वीत करणेत आल्या आहेत.

- पुणे विमानतळाकडे जाणा या सर्व रस्त्याचे रुंदीकरण व विकसन करणे आवश्यक आहे. यापूर्वी एअरपोर्ट रस्ता हा संरक्षण मंत्रालय, केंद्र शासन यांच्या ताब्यातील रस्त्यांचे रुंदीकरण करणेबाबत मा.केंद्रीय मंत्री, मा.खासदार, मा.आमदार व महापालिकेतील पदाधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार सदर रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच पुणे लोहगाव विमानतळ येथे वेकफिल्ड चौकते लोहगाव गावाकडे जाणारा विमान प्राधिकरणाचा रस्ता बंद करावयाचा असल्याने त्याला पर्यायी रस्ता म्हणुन लोहगाव कडे जाणारा रस्ता म्हणजे ५०९ चौक ते धानोरी जकातनाका पर्यंत, लोहगाव स.नं. २३५,२३८,२३९ मधील डी.पी.रस्ते, तसेच विमाननगर / लोहगांव स.नं. २२५,२२६,२१४ मधील रस्ता आणि ५०९ चौकते टाटा गार्डरूम पर्यंतचे रस्ते नव्याने विकसित करणे व रूंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामास तरतुद सुचविणेत आलेली आहे.

- पुणे महापालिका भवन रस्ता डेंगळे पुल ते बालगंधर्व चौकआणि घोले रस्त्याचे सुशोभीकरण करणे. या कामासाठी तरतुद सुचविणेत आली आहे.

- पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम अंतर्गत पुणे मनपा हद्दीतील १००कि.मी. लांबीपैकी सुमारे ३०कि.मी. लांबीच्या रस्त्याचे सर्व्हेक्षण झाले असून पहिल्या टप्प्यात जंगली महाराज रस्त्याचे (लांबी सुमारे २कि.मी.) काम हाती घेण्यात येत आहे. तसेच या पुणे स्ट्रीट प्रोगॅम अंतर्गत येणा या रस्त्यांवरील पदपथ व सायकल ट्रॅक अद्यावत करणेसाठी नियोजन केलेले आहे. त्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे.

**पुणे महानगरपालिका सार्वजनिक पार्किंग धोरण**

- पुणे शहरातील वाहतूक समस्या बिकट होण्यामागे प्रमुखतः खालील कारणे आहेत.
- दैनंदिन वाहतुकीसाठी खाजगी वाहनांवरील अवलंबित्व ज्यामुळे आज ५०% दैनंदिन वाहतूक ही खाजगी वाहनांनी होते.
- कमकुवत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था प्रती लक्ष लोकसंख्यमागे ५० बस संख्या अपेक्षित असताना आज केवळ ३२ बसेस
- चालणे आणि सायकल यांच्या वापरात होणारी घट
- रस्त्यावरील मोफत पार्किंगमुळे अधिक वाहने रस्त्यावर येऊन वाहतुकीवरील ताणात भर
- अवैध पार्किंगने व्यापलेले फुटपाथ आणि सार्वजनिक जागा

**पुणे महानगरपालिकेचे सार्वजनिक पार्किंग धोरण हे शहराची वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी होणाऱ्या खालील उपाययोजनांना पूरक आहे.**

- पीएमपीएमएलसाठी घेतल्या जाणा-या १,५५० नवीन बस मुळे प्रती लक्ष लोकसंख्या आणि बस यांचे प्रमाण ५० होणार आहे. पहिल्या टप्यातील बसेस टप्पा मे-जून २०१७ दरम्यान दाखल होतील.
- चालणे आणि सुरक्षितता यांस प्राधान्य देण्यासाठी १०० किमी 'परिपूर्ण रस्ते' यांच्या आराखडा आणि रस्ते बांधणी यातील जंगली महाराज रस्त्याचे काम प्रगतीपथावर
- ७,००० सार्वजनिक सायकलीची निविदा प्रक्रिया चालू
- २०१७ पर्यत बीआरटीचे एकूण ४६ किमी मार्गांचे काम - यातील एकूण २१ किमी (सातारा रस्ता, औंध आणि जुना मुंबई पुणे हायवे) चे काम प्रगतीपथावर
- पादचारी धोरण, Urban Street Design Guidelines यासारखी धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी.
- सायकल प्लान
- मेट्रो रेलची कार्यवाही
- तंत्रज्ञानाचा उपयोग - 'मी कार्ड' पीएमपीएमएल मोबाईल ऐपचे कार्य प्रगतीपथावर

हे पार्किंग धोरण 'खाजगी वाहनांचा वापर कमी व्हावा आणि इतर शाश्वत वाहतूक साधनांचा वापर वाढावा' या तत्वावर आधारित आहे. यातील उदिदष्टे सर्वंकष धोरणात नमूद केलेल्या २०३१ पर्यंत गाठावयाच्या उदिदष्टांवर आधारीत आहेत. त्यानुसार

- सार्वजनिक वाहतुकीचा वापर ८०% पर्यंत वाढविणे (Out of total motorised trips).
- Total Vehicle Kilometre Travelled (VKT) मध्ये ५०%पर्यंत घट साध्य करणे
- सुसूत्रीकरणामुळे पहिल्या वर्षात रस्त्यावरील कमीत कमी १०%पार्किंगच्या जागांचे सार्वजनिक खुल्या जागेत, पादचारी, सायकलस्वारांसाठी पायाभूत सुविधेत रुपांतरण करणे.

पार्किंग धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शहराचे खालीलप्रमाणे विभाजन करण्यात आले आहे.

- शहराचा मध्यवर्ती भाग.
- शहरातील प्रमुख रहदारीचे रस्ते.
- शहराचा इतर भाग.

**Telescopic तत्वावर आधारित पार्किंग शुल्क जे खालील घटकांवर अवलंबून असेल**

- वाहनाने व्यापलेली जागा.
- पार्किंगचा एकूण कालावधी.
- पार्किंगची वेळः गर्दीची आणि गर्दी नसलेली वेळ.
- दिवसः सुट्टीचा आणि इतर दिवस.

- रस्ताबाहय पार्किंगला प्राधान्य देण्यासाठी रस्त्यावरील पार्किंग शुल्क हे रस्ताबाहय पार्किंग इमारतीच्या पार्किंग पेक्षा महाग.
- काही घटकांसाठी सवलतः उदाः पीएमपीएमएल बस, सायकल, अपंग व्यक्तींची वाहने.
- उत्तम पार्किंग व्यवस्थापन याशिवाय या सार्वजनिक पार्किंग धोरणामुळे एकंदरीत वाहतूक व्यवस्थापन देखील सुलभ होणार आहे.

## (९) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(र. रू. ३९२.१६ कोटी)

**सन २०१६–१७**

- आजमितीस पीएमपीएमएलद्वारा जवळपास ११ लाख नागरीकांना बससेवा उपलब्ध करुन दिली जाते. परिवहन महामंडळाचे उद्दीष्ट जवळपास ४० लाख लोकांना दैनंदिनी सेवा देण्याचे आहे. याकरीता पीएमपीएमएल मा. संचालक मंडळाने १५५० बसेस घेण्याचे निश्चित केले आहे. याकरीता पुणे व पिंपरी–चिंचवड महानगरपालिका ६० व ४० च्या प्रमाणात आवश्यक तो निधी व मदत महामंडळास करणार आहे.
- या कामी १५५० बसेसची कार्यवाही महामंडळाकडून सुरू आहे. यामध्ये २०० मिडी बसेस (१२० पीएमसी व ८० पीसीएमसी) चे खरेदी आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच ५५० एसी बसेस भाडेतत्वावर घेण्याबाबत वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे. या संस्थेमार्फत महामंडळाकडील ग्रीन झोनमधील १८ एकर जागेमध्ये ३ डेपोंची उभारणी फर्स्ट ग्रुप या कंपनीमार्फत करण्यात येणार आहे. तसेच ८०० सीएनजी बीआरटी बसेस घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे महामंडळाकडे सध्या असलेल्या एकूण २०१२ बसेसमधील १२ वर्षापुढील ३२४ बसेस बाद करण्याचे नियोजन असून १६८८ बसेस व नव्याने प्राप्त होणाऱ्या १५५० बसेस अशा एकूण ३२३८ बसेसपैकी पुणे व पिंपरी–चिंचवड तसेच उपनगरामध्ये दैनंदिनी २६०० बसेस संचलनामध्ये देण्याचे महामंडळाने नियोजन केलेले आहे.
- सदरच्या नविन १५५० बसेस प्राप्त झाल्याने सध्या असलेल्या ३७० मार्गांवर या बसेस देऊन वारंवारीता वाढविण्यात येणार आहे. तसेच आवश्यकतेनुसार काही नविन मार्ग सुरू करण्याचे देखील नियोजन आहे. त्यामुळे दैनंदिनी प्रवाशांना वारंवारीता मिळाल्याने तसेच एसी बसेस दिल्याने आरामदायी व नियोजित ठिकाणी वेळेत पोहचण्यास मदत होणार आहे. याच बरोबर महामंडळाने २० वर्षीय बिझनेस प्लॅनकरीता थर्डपार्टीची नेमणूक केलेली असून या संस्थेमार्फत महामंडळाच्या सर्व विभागाचा अभ्यास करून तसेच रूट रॅशनलायझेशन करून आर्थिक खर्च कमी करणे व उत्पन्नात वाढ करण्याबाबत महामंडळ प्रयत्न करीत आहे. तसेच बीआरटीच्या माध्यमातून इंटीलिझन्ट ट्रान्सफर मॅनेजमेंट सिस्टिम व कंट्रोल रूमच्या माध्यमातून प्रवाशांना अत्याधुनिक सेवेचा फायदा व महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना याबाबतचे ज्ञान देणेबाबत महामंडळ सतत प्रयत्नशिल आहे.

**सन २०१६–१७**

| | | |
|---|---|---|
| पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या सद्याच्या बसेस येत्या दिड वर्षात येणाऱ्या बसेसची भर | | २०२५ |
| १. | भाडेतत्वावरील वातानुकूलित बसेस | ५५० |
| २. | पुणे म.न.पा. व पिंपरी–चिंचवड मनपा बसेस खरेदी (मिडी बसेस)<br>**पुणे म.न.पा. मिडी बसेस (१२०)**<br>**पिंपरी–चिंचवड म.न.पा. मिडी बसेस(८०)** | २०० |
| ३. | पी.एम.पी.एम.एल.ने घ्यावयाच्या बसेस (खरेदी तत्वावर) (स्टॅण्डर्ड) | ८०० |
| | **एकुण बसेस** | **१५५०** |

**सन २०१७-१८**

| | | |
|---|---|---|
| १. | मिडी बसेस | ३४ कोटी |
| २. | नव्याने ८०० खरेदीसाठी (पुणे म.न.पा. ६० टक्के हिस्सा प्रमाणे) | १३० कोटी |
| ३. | डेपो डेव्हलपमेंटसाठी | ३१ कोटी |
| | **एकुण तरतुद** | **१९५ कोटी** |

- संचलन तुटीसाठी केलेली तरतुद र.रु. १६२.१६ कोटी

## (१०) नदीसुधारणा प्रकल्प(र.रु. ८६.८५ कोटी)

**सन २०१७-१८**

पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागांच्या हद्दीतून वाहणाऱ्या अंदाजे ४० कि.मी. लांबीच्या मुळा, मुठा व मुळा-मुठा नदीकाठ सुशोभिकरण व विकसनाबाबत नद्यांचे जलशास्त्रीय सर्वेक्षण करणे, डिझाईन नकाशे तयार करणे, डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, तसेच संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय विभागाकडील मान्यता घेणे इ. स्वरुपाची कामे करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या या कामा करिता सन २०१७-१८ मध्ये रक्कम रुपये ५०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. पुणे महानगरपालिकेच्या विहीत निविदा पध्दतीनुसार मागविण्यात आलेल्या (सात) निविदाधारकांची छाननी करुन मा. स्थायी समितीने मे. एस.एस.सी.पी.डिझाईन प्लॅनिंग ॲन्ड मॅनेजमेंट प्रा.लि., अहमदाबाद यांच्या निविदेस ठराव क्रं. १७०४, दि. ०२/१२/२०१५ अन्वये मान्यता दिली. सदर कंपनीचे र.रु. ३.९६ कोटीची निविदा मान्य करण्यात आली असून, त्याप्रमाणे नदीकाठ विकसन प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच पुणे शहर हद्दीतून बावधन, पाषाण, बाणेर परिसरातून वाहणाऱ्या राम नदीचाही नदीकाठ विकसन प्रकल्पांतर्गत समावेश करणेचे आणि मुळा, मुठा, मुळा-मुठा व रामनदी इ. नद्यांचे सिटी सर्व्हे विभागाकडील नकाशात डिमार्केशन करुन सदर नद्यांची हद्द निश्चित करणेचे काम करण्याचे प्रयोजित आहे.

## (११) उद्यान(र. रु. ३४ कोटी)

**सन २०१६-१७**

- पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीसमोरील उद्यानाचे अत्याधुनिक पद्धतीने नुतनीकरण करण्यात आले आहे. या कामामध्ये अस्तित्वात असलेले वृक्ष जतन करण्यात आलेले आहेत. महात्मा जोतीबा फुले यांचे पुतळ्याच्या चौथऱ्यास दगडी बांधकाम, पुतळ्याभोवती दगडी चौथरा नव्याने करण्यात आला आहे. तसेच फ्लेम फिनिश ग्रनाईटमध्ये पॅसेज, स्टँप कॉंक्रिटमध्ये फुटपाथ, नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस इ. कामे करण्यात आलेली आहेत. उर्वरित मोकळ्या जागेमध्ये हिरवळ व शोभिवंत झाडे लावण्यात आलेली आहेत. हिरवळ व झाडांकरिता पॉप अप स्प्रिंकलर चे काम करण्यात आले आहे. तसेच सदर ठिकाणी डिझायनर पोल बसविण्यात आलेले असुन या पोलमध्ये एल.ई.डी. फिटिंग्स, ध्वनिक्षेपण यंत्रणा व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे एकत्रित बसविण्यात आले आहेत. महात्मा जोतिबा फुले यांचे पुतळ्यावर आकर्षक प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे.
- **रिव्हर्स ऑसमॉसिस वॉटर ट्रिटमेंट प्लांट**

पुणे महानगरपालिकेच्या विविध उद्यानात नागरिकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे यासाठी १७ उद्यानात रिव्हर्स ऑसमॉसिस वॉटर ट्रिटमेंट प्लांट कार्यान्वित करणेत येणार असुन कै. संजय निम्हण ग्राम संस्कृती उद्यान, स्व. राजीव गांधी प्राणी संग्रहालय, पेशवे उर्जा उद्यान, सारसबाग, पु.ल.देशपांडे उद्यान तसेच कै. विठ्ठलराव शिवरकर उद्यान या ठिकाणी प्रकल्प कार्यान्वित करणेत आले आहेत.

- **राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, वडगाव शेरी**

  वडगाव शेरी येथील ब्रम्हा सनसिटी समोरील राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान विकसीत करण्यात आले आहे. सदर उद्यानात नागरिकांसाठी ॲक्युप्रेशर जॉगींग ट्रॅक तसेच ओपन एअर जीम इ. कामे करण्यात आली आहेत. उद्यानात म्युझिकल फाउंटन व लेझर शो, फुलराणी, जॉगींग ट्रॅक, वॉकिंग ट्रॅक, ॲक्युप्रेशर ट्रॅक, ओपन जीम, लहान मुलांकरिता खेळणी बसविण्यात आलेली आहेत.

**सन २०१७–१८**

- **पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड फेज –३**

  पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड फेज –३ येथे दिल्ली हटच्या धर्तीवर कलाग्राम विकसीत करणेत येणार आहे. विविध राज्यामधील कलाकारांना त्याची कला सादर करणे व त्यांच्या वस्तुचे प्रदर्शन व विक्री करणे या संकल्पनेवर आधारित कलाग्राम विकसीत करणेत येणार आहे. पहिल्या टप्प्यांमध्ये २८ कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृती विक्रीसाठी दालने (काउंटर्स) बांधण्याचे नियोजन आहे. पुढील टप्प्यांमध्ये २०० नागरिक बसु शकतील इतक्या क्षमतेची आसन व्यवस्था तसेच अल्पोपहार केंद्र उभारण्यात येणार आहे.

- **तळजाई टेकडी येथील नियोजित जैवविविधता उद्यान**

  सुमारे ११० एकर क्षेत्रावर आणि महापालिकेच्या ताब्यात असलेल्या डोंगर माथा, डोंगर उताराच्या जागेवर जैवविविधता उद्यान साकारले जाणार आहे.प्रकल्पाच्या क्षेत्रात वाहनांचा वापर टाळण्यासाठी स्वतंत्र वाहनतळ असणार आहे.वीज निर्मीतीकरिता वाहनतळावर सौर उर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. नक्षत्र उद्यान, बांबु उद्यान, रानमेवा उद्यान, मसाल्यांच्या वनस्पतींचे उद्यान, वनौषधी उद्यान, पुष्प उद्यान आणि सुगंधी वनस्पतींचे उद्यान डिअर पार्क इ. प्रकारच्या संकल्पनेवर आधारित उद्याने विकसीत करण्यात येणार आहेत.व्यायाम आणि चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांकरिता जॉंगींग ट्रॅक तयार करण्यात येणार आहे .मोठ्या प्रमाणात स्थानिक जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

## (१२) विद्युत(र. रू. २३.७५ कोटी)

**सन २०१६–१७**

- उर्जा बचतीचे दृष्टीकोनातून सन २०१६–१७ या आर्थिक वर्षात विविध प्रकारच्या १५,००० एल.ई.डी. फिटींग्ज नवीन प्रकाश व्यवस्थेच्या स्मार्ट स्ट्रीट लाईटींग प्रोजेक्ट कामाअंतर्गत बसविण्यात आल्या आहेत.
- सांस्कृतिक भवन विद्युतीकरणाअंतर्गत आण्णाभाउ साठे नाट्यगृह येथील संपूर्ण विद्युत कामे करण्यात आलेली आहेत. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह विस्तारित इमारत विद्युतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.
- हडपसर स्मशानभूमी येथे गॅस दाहिनेचे काम प्रगतीपथावर असून येरवडा व खराडी स्मशानभूमी येथे विद्युत दाहिनी उभारणे ही कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.
- वैकुंठ स्मशानभूमी येथे तिसरी विद्युत दाहिनी बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरीता सक्षमीकरण करणे यामध्ये रस्त्यांवरील दिव्यांकरिता जी.आय.एस. मटेरियल इनव्हेंटरी सिस्टीम बसविणेचे काम करण्यात येत असून या योजनेच्या माध्यमातून आज अखेर १,४०,००० पोलला जीपीएस टूलद्वारे सर्व्हे करुन आय.डी. नंबर देण्यात आलेले आहेत.

- शनिवारवाडा या ऐतिहासिक ठिकाणी नवीन थीमवर आधारित ध्वनी प्रकाश योजना कार्यान्वित करण्यात आली असून त्याअंतर्गत ४० मिनीटांचे ऐतिहासिक शो दाखविण्यात येत आहे. या ठिकाणीहिंदी व इंग्रजी भाषेतील शो तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे. दर्शनी भागात ४५ मी. उंचीचा राष्ट्रध्वज उभारणीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.
- पंडित नेहरु स्टेडियम येथे दिवस-रात्र क्रिकेटमॅचेसकरिता तेथील मैदानावर करावयाच्या प्रकाश व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे.
- पुणे महानगरपालिका मुख्य भवन व पुणे सातारा रस्ता बालाजी नगर फ्लायओव्हर व विश्रामबागवाडा या ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे आर्किटेक्चरल प्रकाश व्यवस्था करणेचे काम पूर्ण करण्यात आलेलेआहे.
- पुणे शहरामधील एकूण १९ ठिकाणी पर्यावरणपूरक एअर - पोल्यूशन यंत्रणा बसवून कार्यान्वित आहेत. नव्याने ५ ठिकाणी अशाच प्रकारची यंत्रणा बसविण्याची कामे पूर्णत्वाकडे आहेत.

**सन २०१७-१८**

- उर्जा बचत करणेसाठी व पथदिव्यांसाठी दैनंदिन देखभाल दुरुस्तीवर होणाऱ्या खर्चामध्ये बचत होण्याच्या दृष्टीने शहरामध्ये एस्क्रो तत्वावर ७०,००० एल.ई.डी. दिवे बसविण्याचे काम करण्यात येत आहे.
- सन २०१७-१८ मध्ये सहा महिन्याच्या कालावधीत उर्वरित दिवे बसविण्याचे काम पूर्ण करण्याचा खात्याचा मानस आहे.
- शहरामधील विविध रस्त्यांवरील पथदिवे नियंत्रण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानानुसार मध्यवर्ती नियंत्रण कक्ष सिंहगड रस्ता विद्युत भवन या ठिकाणी उभारण्यात आला आहे. सदर नियंत्रण कक्षामध्ये बंद दिव्यांबाबतची माहिती SCADA तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेकडून यापूर्वी विविध ठिकाणी बसविण्यात आलेले एल.ई.डी. दिवे SCADA अंतर्गत समाविष्ट करणेकामी सदर प्रकल्पासाठी र.रु. ५ कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे.
- शहरातील संपूर्ण स्ट्रीट लायटींगची यंत्रणा (इन्फ्रास्ट्रक्चर) सक्षमीकरण करण्यासाठी र.रु. १५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.
- वैकुंठ स्मशानभूमी येथे तिसरी विद्युत दाहिनी उभारणेचे काम प्रगतीपथावर असून यासाठी र. रु. ५०,००,०००/- तरतूद करण्यात आली आहे.
- हडपसर शूटींग रेंज येथे १० मी. रेंज साठी शूटींग प्रशिक्षणासाठी डिजिटल टार्गेट यंत्रणा बसविणे कामी ३० लाखांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.
- मनपा मुख्य भवन येथे विस्तारित इमारत विद्युतीकरण करणे, सुशोभिकरण करणे या कामी र.रु. ३० लाखाची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.
- शनिवारवाडा येथील ध्वजस्तंभाच्या परिसरामध्ये पेडेस्ट्रीयल ब्रिज उभारणे व तद्नुषंगिक विद्युत कामे करणेसाठी र.रु. २५ लाख प्रस्तावित करण्यात आली आहे.
- शहरामध्ये सौर उर्जा प्रकल्प राबवून उर्जा बचत करणे कामी पुणे मनपाच्या इमारतींवर सौर उर्जा निर्मितीसाठी सौर पॅनेल व अत्याधुनिक उपकरणे बसविणे काम र.रु.१कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## (१३) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियानांतर्गत प्रकल्प

### सन २०१६-१७

- जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुर्ननिर्माण अभियान, स्मार्ट सिटी व अमृत अभियान या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०१६-२०१७ साठी आवश्यक तरतूद-र.रु.३२०.६७ कोटी मंजूर आहे.
- ज.ने.रा.श.पु.अ.अंतर्गत दि.०१.११.२०१६ ते दि.३१/३/२०१७ अखेर होणारा अपेक्षित खर्च (खात्याकडून प्राप्त माहिती नुसार) र.रु. २०.८४ कोटी इतकी आहे.
- याव्यतिरिक्त सन २०१६-१७ मध्ये केंद्र व राज्य शासनाकडील अंदाजपत्रकीय उत्पन्नाचा मंजूर अनुदानाचा हिस्सा र.रु.२०२.६९ कोटी इतकी आहे.
- दि.०१.१२.२०१६ ते दि.३१/३/२०१७ अखेर केंद्र व राज्य शासनाकडील अपेक्षित अनुदानाच्या उत्पन्नाचा हिस्सा र.रु. १३२.४२ कोटी इतका आहे.

**सन २०१६-१७ मधील महत्त्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प :**

- भारत सरकारच्या शासन परिपत्रक क्रं. के -१४०२७/४/एनयुआरएम-२०१५ दि. १४.०८.२०१५ च्या (क्लॉज नं.६.Other issues) अन्वये जे प्रकल्प मंजूर झालेले आहेत परंतु मंजूर झालेल्या प्रकल्पांपैकी ज्या प्रकल्पांचा निधी मार्च-२०१४ च्या अगोदर वितरित करण्यात आलेला आहे. त्याच प्रकल्पांचा समावेश अमृत अभियानात करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले होते.
- ज.ने.रा.श.पु.अ.अंतर्गत भामाआसखेड व वडगाव बुद्रुक या दोनही प्रकल्पांच तिसरा हप्ता मार्च २०१७ च्या मध्ये वितरित झाला आहे.सदर दोनही प्रकल्पांसाठी अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा एकूण र.रु.५२.३२ कोटी इतका निधी प्रत्यक्ष प्राप्त झालेला आहे. तसेच सदर दोनही प्रकल्पांसाठी २०१६-१७ साठी दि.२०.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णया द्वारे केंद्र शासनाचे तथा राज्य शासनाचे र.रु.७७.७२ कोटी इतक्या निधीचे वितरण आदेश प्राप्त झालेले आहेत.सन २०१६-१७ मध्ये वडगाव बुद्रुक हा प्रकल्प पूर्ण झालेला आहे.
- तसेच अमृत अभियानांतर्गत बगीचा/ग्रीन स्पेसेस या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाचा एकूण र.रु.१५ लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार उद्यान विभागामार्फत बगीचा/ग्रीन स्पेसेस प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष सूरु आहेत. तसेच सन २०१५-१६ मध्ये तयार केलेल्या रिफॉर्मचे र.रु. ४६ लाख इतका निधी दि. २८.०२.२०१६ रोजी केंद्रशासना मार्फत प्रोत्साहन लाभ स्वरुपात पुणे महानगरपालिकेच्या खात्यावर प्राप्त झालेले आहेत.

### सन २०१७-१८

- स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत प्रकल्प सल्लागारांची फी अदा करणेसाठी र.रु. ५.०० कोटी इतकी तरतुद अंदाजपत्रकात सूचविण्यात आली आहे.
- अमृत अभियानांतर्गत नव्याने सुरु होणाऱ्या प्रकल्पांसाठी र.रु.५ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद अंदाजपत्रकात सूचविण्यात आली आहे.
- ''स्मार्ट सिटी अभियानांतर्गत नव्याने सुरु होणाऱ्या प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य अनुदानासहित तरतुद'' या अर्थशिर्षकाखाली पुणे महानगरपालिकेच्या स्वहिश्याची र.रु.५० कोटी इतकी इतकी रक्कम सूचविण्यात आली आहे.

**सन २०१७-१८ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या विशेष उद्देश वाहनाची स्थापना करण्यात आलेली आहे.
- पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने स्मार्ट सिटी अंतर्गत ५१ प्रकल्पांचा आराखडा तयार केला असून यातील अनेक प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहेत.

## (१४) भवन रचना(र. रू. १४०.३६ कोटी)

**सन २०१६-१७**

- छत्रपती शिवाजीराजे भोसलेसांस्कृतिक भवन व कलामंदिराचे १०% काम पुर्ण झाले आहे.
- प्र.क्र. ७५ ब मध्ये स.नं. ८ ज्ञानसीलेक क्रिडासंकुलाचे चालू असलेले काम पूर्ण करणे. (जलतरण तलाव पुर्ण)
- स.नं. ३३/५ ब आंबेगांवयेथे चालू असलेले क्रिडासंकुलाचे काम पुर्णझाले आहे.
- पाषाण भाजी मंडईचे ५०% काम पुर्ण.
- सोमेश्वरवाडी स्पोर्टस कॉम्पलेक्समधील बॅडमींटन हॉलचे काम पुर्ण झाले आहे.
- प्र.क्र. ३० ब वारजे छ. शिवाजी महाराज क्रिकेटस्टेडियम येथे क्रिकेट पीच व हिरवळ लावण्याचे काम पुर्ण झाले आहे.
- विठ्ठलराव तुपे क्रिडा संकुल ८०% काम पुर्ण झाले आहे.
- घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाची इमारतीचे काम ७०% पुर्ण झाले आहे.
- मनपा भवन येथे विस्तारीत इमारतीचे ७०% काम पुर्ण झाले आहे.

**सन २०१७-१८**

- मनपा भवन येथे विस्तारीत इमारतीचे काम प्रगती पथावर असून आर्थिक वर्षात पुर्ण करणे.
- पुणे शहरात विविध ठिकाणी प्लेस मेकिंग अंतर्गत आकर्षक पब्लिक प्लेसेस तयार करणे.
- मनपा भवन मुख्य इमारतीसाठी रौप्य दर्जा मानांकन मिळणेकरीता आय. जी. बी. सी. अंतर्गत मुख्य इमारतीत विविध विकासाची कामे करणे.
- वारजे येथे छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अॅकॅडमी उभारणे कामी मुख्य प्रवेशद्वार, सीमाभिंत, स्वच्छतागृह नियोजित आहे.
- सिंहगड रोड वडगाव बु. येथे श्री. छत्रपती शिवाजी राजे भोसले सांस्कृतिक भवन व कला मंदीर उभारणे कामी बेसमेंटपार्किग व्यवस्था व नाटयगृह हॉलचे बांधकाम करणे.
- बाणेर बालेवाडी येथील ईलर्निंग स्कूलचे काम पुर्ण करुन ४०% इमारत प्रत्यक्षात शाळेच्या वापरात आणणे.
- प्र.क्र. ३४ ब, यशवंतराव चव्हाण बालनाटयगृहाचे काम पुर्ण करुन वापरात आणणे.
- वारजे येथे मॅटर्निटी होम बांधणे.
- कर्वेनगर स.नं. ९ येथे ईलर्निंग स्कूल बांधणे.
- घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाची इमारतीचे बांधकाम पुर्ण करणे.
- सावरकर भवन येथे चौथ्या मजल्याचे काम पुर्ण करणे.

## (१५) माहिती व तंत्रज्ञान(र. रू. ४५.२४ कोटी)

**सन २०१६-१७**

- पुणेकर नागरीकांना केंद्रस्थानी ठेवत विविध डिजीटल माध्यामांचा उपयोग करून पीएमसी केअर नागरिक (Citizen) सहाय्य (Assistance) प्रतिसाद (Response) आणि संवाद (Engagement) प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले. पीएमसी केअर अंतर्गत कॉलसेंटर 1800-1030-222 याटोल फ्री नंबरद्वारे कार्यान्वित करण्यात आले तसेच सोशल मिडीआ, व्हॉटसअॅप, ई-मेल , फेसबुक, व्टिटर, मोबाईल अॅपस् इतर 16 विविध माध्यामांद्वारे नागरिकांना तक्रारी नोंदविणे व माहिती मिळविणे शक्य झाले. पीएमसी केअरच्या माध्यामातून सर्व विभागांची नागरिकाभिमुख प्रश्नोत्तर स्वरुपामध्ये माहिती एकत्रित करण्यात आली व त्याचे PMCCARE FAQ हे मोबाईल अॅप व संकेतस्थळ विकसित करण्यात आले.
- पुणे मनपाचे अदयावत तंत्रज्ञानावर आधारित punecorporation.org व pmc.gov.in या संकेतस्थळाचे उद्घाटन 2 October 2016 रोजी करण्यात आले. सदर संकेतस्थळावर सर्व विभागांची अदयावत

माहीती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. आंतराष्ट्रीय स्तरावरील शहरांच्या संकेतस्थळांच्या दर्जानुसार पुणे मनपाचे संकेतस्थळ विकसित करण्यात आले. ऑक्टोबर 2016 ते फेब्रुवारी 2017 या कालावधीमध्ये एककोटीपेक्षा जास्त क्लिकस् नागरिकांमार्फत नोंदविण्यात आले. दैनंदीनरित्या २०,००० क्लिकस् सदर संकेतस्थळास प्राप्त होत आहेत. जगातील सर्व देशांमधून पुणे मनपाचे संकेतस्थळ नागरिकांमार्फत वापरले जात आहे.

- M-Governance चा प्रभावी वापर करून पुणेकर नागरिकांकरीता विविध मोबाईल ॲप पुणे मनपाचे सर्व सेवासुविधा करीता अधिकृत “Pune Connect” ॲप तसेच मनपातील कामकाज अधिकाधिक पारदर्शक व गतिमानरित्या होणेकरीता अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता Office Connect, Road Ambulance, PMC STP, PMCCARE, PMC Building permission, Pune urban असे विविध मोबाईल ॲप्स पुणे ॲपस्टोअर्सद्वारे उपलब्ध करण्यात आले.
- मनपाचे कामकाज पेपरलेस व गतिमानरित्या होण्याच्या दृष्टीकोनातून बांधकाम परवाना संगणकप्रणाली मध्ये e-sign इंटिग्रेट करुन कार्यान्वित करण्यात आले e-sign द्वारे कामकाज करणारी पुणे मनपा भारतातील पहिली महानगरपालिका झाली.
- “Right to Services”(सेवा हमी कायदा) अंतर्गत येणाऱ्या सर्व सेवासुविधा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होणेकरिता PMC Connect ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. सदर ऑनलाईन संगणक प्रणाली द्वारे जन्म व मृत्यु दाखले, विवाह नोंदणी दाखले, कर आकारणी विभागाचे Tax NOC,इत्यादी सेवा सुविधा सुलभरीत्या उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनांच्या आपले सरकार संगणक प्रणालीबरोबर संपूर्णपणे RTS संगणकप्रणाली व तक्रार निवारण संगणक प्रणाली जोडण्यात येऊन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आले.
- भारत सरकारतर्फे नागरिकांना “Digital Locker”प्रणाली उपलब्ध आहे. सदर Digital Locker संगणक प्रणालीमध्ये महानगरपालिकेचे जन्म मृत्यू दाखले Digital Locker द्वारे नागरिकांना उपलब्ध करण्यात आले. अशा स्वरूपाची पुणे मनपा भारतातील पहिली महानगरपालिका झाली आहे.
- पुणे मनपाचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत विविध संगणक प्रणाली करीता आवश्यक असणारे “Private Cloud” कार्यान्वित करण्यात आले. विविध ऑनलाईन संगणक प्रणाली, मोबाईल ॲप्स नागरिकांना सदर “Private Cloud” द्वारे उपलब्ध होणार आहेत. त्याबाबत पुणे मनपाची Cloud Policy तयार करण्यात आली.
- पुणेकर नागरिक, शास्त्रज्ञ, विविध संस्था, माहीती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ, इंजिनिअर्स यांना शहरातील विविध शासकीय विभागांची तपशिलवार माहीती Open Governance चे माध्यमातून उपलब्ध होणेकरीता आंतराष्ट्रीय स्तरानुसार ओपन डेटा पोर्टल (opendata.punecorporation.org) विकसित करण्यात आले. सदर ओपन डेटा पोर्टलद्वारे मनपातीलविविध विभागांचे 125 डाटासेटस् नागरिकांना उपलब्ध करण्यात आले.
- आंतरराष्ट्रीय शहरांमधील विविध स्वरुपाचे डाटाचे तुलनात्मक विश्लेषण करून शहराचे विकासाच्या दृष्टीकोनातून सहकार्य करणेकरीता World City council Of Data संस्था कार्यरत आहेत. पुणे शहरास World City council Of Data यांचेमार्फत Platinum ISO 37120 नामांकन प्राप्त झाले. तसेच त्याकरीता सर्वोच्च असे Platinum Certificate मिळवणारी भारतामधील पुणे महानगरपालिका पहिली महानगरपालिका ठरली आहे.
- मनपातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशासकीय कामकाजामध्ये अधिकाधीक माहीती व तंत्रज्ञानाच्या अधिकाधिक वापर करणेकरीता प्रशिक्षण देण्यासाठी घोले रोड आर्ट गॅलेरी येथे Digital Training LAB कार्यान्वित करण्यात आली. माहीती तंत्रज्ञान विभाग व NASSCOM तर्फे माहीती तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण वर्ग सर्व कर्मचाऱ्यांकरीता सुरु करण्यात आले.

- मनपातील सर्व विभागांकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत GIS संगणकप्रणाली कार्यान्वित करण्यात आली. पुणे शहराच्या Digi Survey पूर्ण करुन शहराचा Basemap GIS संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली.
- विविध क्षेत्रिय कार्यालय व संपर्क कार्यालय, नागरी सुविधा केंद्रांचे अत्याधुनिकीकरण करण्यात आले. नव्या स्वरूपामध्ये नागरिकांच्या गरजेनुसार Token System, Feedback System व इतर नवीन प्रणाली विकसित करून अद्यावयत नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित करण्यात आले.
- पीएमसी केअर प्रकल्पांचे माध्यामातून चांगले कामकाज करणारे विभाग, अधिकारी व कर्मचारी यांना कामकाजामध्ये प्रोत्साहन मिळणेकरिता "Best Dept Of The month" व "Best Employee Of The month" सुरु करण्यात आले याबाबत घनकचरा विभाग,धनकवडी क्षेत्रिय कार्यालय व नानासाहेब शिंदे, सॅनिटरी इन्सपेक्टर यांना सदर पुरस्कार माहे Feb 2017 मध्ये प्रदान करण्यात आले.

**सन २०१७–१८**

- नागरिकांकरिता PMCCARE (Citizen Assistance Response Engagement) प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. नागरिकांना प्रशासनामार्फत उपलब्ध सेवा सुविधा अधिकाधिक सुलभरीत्या प्राप्त होऊन महानगरपालिकेचे प्रशासकीय कामकाज अधिकाधिक गतिमानरित्या होणेकरीता PMCCARE प्रकल्प "Government Citizen Collaboration Platform" आधारावर अद्यावत करणे प्रस्तावित आहे.
- पुणे मनपाचे सर्व विभागातील सेवा सुविधा नागरिकांना 100%ऑनलाईन करणेकरीता विविध संगणकप्रणाली अद्यावत करुन कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. तसेच शहरातील सर्व शासकीय विभागांच्या सेवा सुविधा PuneConnect मोबाईल ॲप द्वारे कार्यान्वीत करणे प्रस्तावीत आहे तसेच मनपाच्या विविध विभागांमध्ये प्रशासकीय कामकाजामध्ये m-governance तंत्रज्ञानाचा वापर करून विविध मोबाईल ॲप्स विकसीत करणे प्रस्तावीत आहे.
- पुणे मनपाच्या विविध कल्याणकारी योजनांचा नागरिकांना दयावयाचा मोबदला महाराष्ट्र शासनाच्या 'थेट लाभ हस्तांतरण'(Direct Benefit Transfer) धोरणानुसार लाभार्थ्यांच्या आधार नंबरव्दारे बँक खात्यात जमा करणेकरीता मनपाचे स्वतंत्र DBTप्रकल्प अंमलबजावणी करण्याकरिता संगणकप्रणाली विकसित करणे प्रस्तावित आहे.
- पुणे मनपाचे प्रशासनामध्ये अधिकाधिक माहीती तंत्रज्ञानाचा वापर होणे करिता विविध विभागांचे Dashboard विकसित करणे, उपलब्ध संगणकप्रणाली मधील Dataचा वापर करून Business Intelligence And Data Analytics प्रणाली कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे.
- पुणे मनपाच्या विविध विभागांचे कामकाजामध्ये दैनंदिन व्यवहारांमध्ये नागरीकांकरीता Cashless व्यवहारांना प्रोत्साहन देणेकरिता मनपाची Cashless Strategyतयार करून अंमलबजावणी करणे प्रस्तावीत आहे. त्या अनुषंगाने नागरीकांना मनपाच्या नागरी सुविधा केंद्र, मोबाईल ॲप्स, ई–सुविधा, पॉस मशीन्स द्वारे डेबिट कार्ड, क्रेडीत कार्ड, ऑनलाईन बँकींग सुविधा भारत ब्लिल पेमेंट सर्व्हिसेस, मी काड्र्स इत्यादी द्वारे कॅशलेस व्यवहारांकरिता विविध माध्यमे उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच पुणेकर नागरिकांना विविध विभागांच्या सेवासुविधा मनपामध्ये हेलपाटे न मारता घरपोच देणेकरिता Doorstep Services प्रकल्प प्रस्तावित आहे.
- या सुविधा आणखी पुढे नेत आता पुणे महानगपालिका कर, बिले आदी गोष्टींचा भरणा अधिक सोपा आणि पारदर्शक होण्यासाठी पाऊले उचलत आहे.
- **BBPS**: भारत बिल पेमेंट सिस्टिमद्वारे कर, पाणी पट्टी आदीचा भरणा करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

- **IVRS Based Payments**: आय व्ही आर एस अर्थात इंटिग्रेटेड व्हॉईस रिस्पॉन्स सिस्टिम च्या माध्यमातून नागरिकांना टोल फ्री क्रमांकावर कॉल करून कर, पाणीपट्टी आदीचा भरण करता येणार आहे.
- **Doorstep Payments**: नागरिकांच्या सोयीसाठी त्यांच्या घरी जाऊन मालमत्ता कर, जन्मदाखला आणि पाणी पट्टी यांचा भरणा करता येणार आहे. याद्वारे नागरीक त्यांच्या सोयीची वेळ निवडून महानगरपालिकेच्या प्रतिनिधीला घरी बोलवू शकतात. एप्रिल २०१७ पासून ही पध्दत कार्यान्वीत होणार आहे.
- **AEPS** : आधार एनेबल्ड पेमेंट सिस्टिमद्वारे नागरिकांच्या बँक खात्यांमध्ये थेट रक्कम जमा करण्यात सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- **Missed Call Based System**: भरणा करण्यासाठी नेमकं संकेतस्थळ मागून घेण्यासाठी नागरिक त्यांच्या मोबाईल नंबर वरून मिस्ड कॉल देऊ शकतात अशा मिस्ड कॉल नंतर नागरिकांच्या मोबाईल वर लिंक पाठवण्यात येईल तेथे जाऊन ते कर व बिलांचा भरणा करून शकतात.
- **Remind Presentment and Payment System**: कर, बिले भरणा करण्याची तारीख लक्षात ठेवण्यासाठी नागरीक त्यांचा मोबाईल क्रमांक नोंदवू शकतात. त्यांच्या मोबाईल क्रमांकावर रिमायंडर आणि लिंक पाठवण्यात येईल.
- **NACH**:बँक खात्यातून ठराविक वेळेस ऑटोमॅटीक पध्दतीने पैसे वळते करून घेता यावेत यासाठी नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस अर्थात NACH मध्ये महानगरपालिमकेला नोंदविण्यात येईल. नागरीक बिले आणि कर भरण्यासाठी या सोयीचा वापर करतील.
- मनपाचे Open Governance तंत्रज्ञानावर विकसित करण्यात आलेले संकेतस्थळ अपग्रेड करणे प्रस्तावित आहे.
- पुणे मनपाचे IT Policy धोरणांतर्गत आवश्यक अत्याधुनिक Data Centre विकसित करणे प्रस्तावित आहे.
- पुणे शहरातील सर्व स्तरातील नागरिकांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर व दैंनदीन जीवनात सुधारणा करणेकरीता Digital Pune 2020दृष्टीकोनातून डिजीटल साक्षरता होणेकरीता डिजीटल लिटरेसी सेंटर्स कार्यान्वित करण्यात येणार आहेत.
- पुणे महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासकीय कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून दैनंदिन प्रशासकीय कामकाजामध्ये सुलभता व कार्यक्षमता वाढविणेची नितांत गरज आहे. पुणे महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना सदर बाबी उपलब्ध माहिती तंत्रज्ञाचा दैनंदिन कामकाजामधील वापराबाबत सर्व प्रशिक्षण देण्याकरिताDigital Training LABविकसीत करण्यात आली आहे व सदर प्रशिक्षण प्रबोधीनीचे अद्यावतीकरण करणे प्रस्तावीत आहे.
- माहिती तंत्रज्ञानाचा पुणे महानगरपालिकेतील सर्व विभागांमध्ये प्रभावी वापर करून विविध IT Policy, Network Policy, Cloud Policy, Active Directory, Hardware Policy,इत्यादीचे बाबत कर्मचारी व सेवकांना अवगत करून अंमलबजावणी करणे प्रस्तावित आहे.
- पुणे मनपाचे विविध प्रकल्पांची, नागरीकाभिमुख माहिती, कल्याणकारी योजना इत्यादी नागरीकांपर्यंत प्रभावीरीत्या पोहोचविण्याकरीता विविध ऑनलाईन संगणक प्रणाली, मोबाईल ॲप्स, सोशल मिडीया ॲप्स, माहिती तंत्रज्ञान साधनांचा वापर करून पुणे महानगरपालिका मार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधा तसेच पुणे महानगरपालिकेच्या अनेकविविध उपक्रमांचे Branding करून सर्व बाबी जास्तीत जास्त लोकाभिमुख करणे व नागरिकांकरिता प्रसिध्दी करणे प्रस्तावित आहे.
- पुणे महानगरपालिका अंतर्गत "Centralized Enterprise GIS Platform' या संगणक प्रणालीव्दारे विविध विभागांकडे उपलब्ध असलेला सर्व्हे डाटा सदर प्रणाली मध्ये पोर्ट करून जीआयएस प्रणालींचा

विविध प्रशासकीय कामकाजामध्ये प्रभावी वापर करणे प्रस्तावित आहे. मनपातील विविध संगणक प्रणाली अपग्रेड करून सर्व विभागाचे संगणक प्रणाली मनपाच्या GIS संगणक प्रणालीत इंटिग्रेट करणे प्रस्तावित आहे.

- घनकचरा विभाग, आरोग्य विभाग, आधुनीक तंत्रज्ञावर आधारीत IOT Based संगणक प्रणाली विकसीत करून अंमलबजावणी करणे प्रस्तावीत आहे.
- मनपाच्या सर्व शाळांमध्ये अद्यावत स्वरुपामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर तयार करून ई-लर्निंग संगणक प्रणाली अंमलबजावणी प्रस्तावीत आहे.
- पुणे मनपातील मुख्य भवन, सावरकर भवन, उद्यान विभाग, विविध क्षेत्रिय कार्यालये व संपर्क कार्यालयांमध्ये नेटवर्क अपग्रेडेशन करून सर्व विभाग ४ mbps लीज लाईनद्वारे जोडून नेटवर्क कनेक्टीवीटी उपलब्ध करून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत Network Infrastructure अद्ययावत करणे प्रस्तावीत आहे.

## (१६) हेरिटेज सेल(र. रू. २७.२९ कोटी)

- पुणे शहराला असलेली ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी पाहता 'टुरिझम डेव्हलपमेंट' ही पुणे शहरासाठी एक उत्तम संधी आहे. 'पुणे टुरिस्ट हब' या संकल्पनेवर आधारीत आपली विकासाची दिशा असल्यास आर्थिक विकास व स्थानिक रोजगारावर सकारात्मक परिणाम होईल.
- पुणे शहरामध्ये हॉटेल इंडस्ट्रीज, आर्किटेक्चरल कॉलेजेस, ट्रॅव्हल इंडस्ट्रीज, आय.टी. सेक्टर्स, ऑटोहब शैक्षणिक संस्था इ.सह ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी, पर्यावरण, सामाजिक स्वास्थ इ. चा विचार करता सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून पर्यटनामध्ये वाढ कशी होईल यावर आधारीत भविष्यातील वाटचाल करणे गरजेचे झाले आहे.पुणे शहरात आज उत्तम दर्जाची उद्याने, म्युझियम्स, नाट्यगृहे आहेत, प्राणी संग्रहालय आहे, ऐतिहासिक वास्तु ही आहेत. तसेच पुणे शहरात अनेक मौल्यवान सांस्कृतिक महोत्सव वर्षभर साजरे होतात. त्यामुळे अनेक सोयी/सुविधांसह सज्ज असलेल्या या शहराचे चांगल्या प्रकारे मार्केटींग होणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत विविध प्रयत्न करणेत येत आहेत.

**सन २०१६-१७**

- दोनशे वर्षापूर्वीच्या ऐतिहासिक विश्रामबागवाडा जतन संवर्धनाअंतर्गत सांस्कृतीक कार्यक्रमासाठी कायमस्वरूपी ग्रीन रूम, बैठक व्यवस्था इ.ची कामे पूर्ण करणेत आली आहे.
- नानावाडा या ऐतिहासिक वास्तुची प्राथमिक दुरूस्ती व जतन संवर्धनाची कामे अंतिम टप्प्यात आहेत.तसेच येथे फ्रिडम फायटर शो व फ्रिडम फायटर म्युझियमच्या प्रकल्पास सुरूवात करण्यात आली आहे.
- प्राचीन नागेश्वर मंदीर जतन संवर्धन व परिसर विकास हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे.
- ब्रिटीश कालीन बंडगार्डन पूल जतन संवर्धना अंतर्गत 'आर्ट प्लाझा ' विकसित करण्याचे काम पूर्ण झाले आहे.
- महात्मा फुले मंडई या वास्तुच्या जतन संवर्धन प्रकल्पाचा पहिला टप्पा पुर्ण झाला आहे.
- सावरकर स्मारक व परिसर विकसित करण्याच्या प्रकल्प पूर्ण झाला आहे.
- सिहंगड येथे तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे विकास व सुशोभिकरण या कामास प्रारंभ करण्यात आला आहे.

**टीप :- प्राचीन नागेश्वर मंदीर जतन संवर्धनाच्या प्रकल्पास आर्किटेक्ट इंजिनिअर्स सर्व्हेअर्स. (AESA) या संस्थेने पारितोषिक देऊन गौरव केला.**

**सन २०१७ –१८**

- सिंहगड किल्ल्यावरील नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ येथे स्वराज्यनिष्ठ शिल्प उभारणे व परिसर विकसित करणे.
- लाल महाल येथील मास्टर प्लॅनिंगनुसार विविध विकास सुशोभिकरण प्रकल्प पूर्ण करणे.
- ऐतिहासिक जुनी महात्मा फुले मंडई येथे मंडई दुरूस्ती करणे (गाळ्यांची डेव्हलपेमेंट +विद्युत व्यवस्था)

**टुरिस्ट हब अंतर्गत खालील कामे करणे**

- पर्यटन वाढीसाठी विविध ब्रॉशर्स,पोस्टर्स,नकाशे पुस्तिका इत्यादी तयार करणे.
- पुणे शहरात विविध प्रकारचे वॉक, ट्रेल,मिनी बस टुर विकसित करणे.
- टुरझिमसाठी विविध ठिकाणी पायाभूत सुविधा (स्वच्छतागृहे इ.),मार्केटिंग व विविध विकास कामे करणे .
- पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी हेरिटेज व्हिलेज / पार्क यांची उभारणी करणे. (कोंढवा, बाणेर)
- जुन्या पुणे शहराचे मिनिएचर मॉडेल तयार करणे.
- पुणे शहरामध्ये नानावाडा येथे फ्रिडम फायटर म्युझियम तयार करणे.
- पुणे शहराच्या हेरिटेज अंतर्गत केले जाणा–या कमांचे चांगले नियोजन व्हावे म्हणून पुणे महानगरपालिकेचे स्वंतत्र हेरिटेज ट्रस्ट स्थापित करणे प्रस्थावित आहे. या ट्रस्ट मार्फत यापुढे हेरिटेज सेलचे कामकाज चालावे असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## (१७) शिक्षणासाठी आधुनिक सुविधा

## (प्राथमिक र. रू. ३११.२५ कोटी, दुय्यम शिक्षण र. रू. ५५.५२ कोटी)

**सन २०१६–१७**

- **मॉडेल स्कूल :**
- शिक्षण मंडळाच्या मराठी व उर्दु माध्यमाच्या शाळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत असून १५ प्रशासकीय विभागातून प्रत्येकी १ याप्रमाणे १३ मराठी व २ उर्दु माध्यमाच्यामॉडेल स्कूल कार्यान्वीत झाल्या आहेत. या शाळांमधून विशेष भौतीक सुविधा, ज्ञानरचनावादावर आधारित आनंददायी अध्यापन पध्दती, शालेय वेळेत वाढ करणे, विशिष्ट शैक्षणिक साहित्य, फर्निचर, वाचनालय, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, स्वच्छतागृह, प्रोजेक्टर इ. सुविधासह विभागातील इतर शाळांतील शिक्षकांना मार्गदर्शन करणे, मॉडेल स्कूलच्या माध्यमातून शैक्षणिक उपक्रमसाठी शाळांना आदर्श करून देणे यासाठी ही मॉडेल स्कूल योजना राबविण्यात येत आहे.
- **शिक्षण उत्सव :**

  शिक्षण मंडळ पुणे मनपा शाळातील उपक्रमशील शिक्षकांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी शिक्षण उत्सव आयोजित करण्यात आला होता.शाळांची गुणवत्तावाढीसाठी अनेक शिक्षक उत्तम काम करतात. त्यांनी विविध उपक्रम राबविलेले असतात. त्यांचे नाविन्यपुर्ण उपक्रमइतर शिक्षकांना मार्गदर्शक ठरावे म्हणून सर्व शाळांतील निवडक ६०शिक्षकांनी स्वत:चे उपक्रम प्रदर्शित केले होते. यामध्ये ज्ञानरचनावादी अध्यापन, ई–लर्निग, मोबाईल ऑपद्वारे अध्यापन विविध शैक्षणि साहित्याची निर्मिती इ. बाबीचे उत्तम सादरीकरण केले होते. शिक्षक व अधिकारी यांनी सदर उपक्रमात उत्साहाने सहभागी होऊन शाळांसाठी गुणवत्तापूर्ण अध्यापन कसे होईल यासाठी प्रयत्न केले आहेत.
- **शिक्षक सहयोगी दल :**

  शिक्षण मंडळाकडे सहयोगी दलाची स्थापना करण्यात आलेली असून या दलामध्ये २९ विषयतज्ञ व २३ उच्च शिक्षित व अनुभवी शिक्षकांची निवड करून त्यांना प्रशिक्षित करण्यात आलेले असून त्यांचे मार्फत शांळातील शिक्षकांना विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येते. सहयोगी दलाच्या

उपक्रमाअंर्तगत अध्यापन व मार्गदर्शन यामध्ये सुलभता व आधुनिकता येण्यासाठी टॅबलेट पीसी देण्यात आले आहेत. सी एस आर कक्ष-शामची आई फाउैंडेशनच्या वतीने शिक्षण मंडळाकडे सी एस आर कक्ष स्थापन करण्यात आलेला असून त्यासाठी विविध संस्था व कंपन्याच्या मदतीने शाळांसाठी भौतिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता यासाठी महत्वपूर्ण सहकार्य घेण्यात येत आहे.या अंतर्गत पुढील संस्थानी भरीव कामगिरी केलेली दिसून येते.

- **पर्सिस्टंट फाउंडेशन**:शिक्षणमंडळाच्या शाळांमधून नवीन १०१ स्वच्छतागृहे बांधून दिलेली आहेत.
- **झेन्सार फाउंडेशन** :या संस्थेने चंदननगर येथील ५ शाळा दत्तक घेवून संगणक लॅब, शैक्षणिक उपक्रम, शिक्षक प्रशिक्षण, भौतिक इ. सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.
- **थरमॅक्स फाउंडेशन** :इंग्रजी माध्यमाच्या ४ शाळा दत्तक घेवून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे.
- **सायन्स फॉर ऑल फाउंडेशन** :सेमी इंग्रजी वर्गासाठी अध्ययन व अध्यापन अनुषंगिक कामकाज केले जाते.
- **भारत फोर्ज लि.** : मुंढवा येथील शाळेत आधुनिक स्वच्छतागृहे, पाण्याची टाकी अशा भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.
- **रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड**: नव निर्मिती संस्थेच्या माध्यमातून गणित विषयासाठी १२०० शिक्षकांचे कृतीयुक्त प्रशिक्षण देत आहेत.
- **नॅस्कॉम फाउंडेशन** :डिजिटल लिटरसी संदर्भात पालक व विद्यार्थी यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- **आझम कॅम्पस् पी.ए.इनामदार ट्रस्ट** : उर्दु माध्यमाच्या २१ शाळांतून अदययावत संगणक संगणक कक्ष इंटरनेट, स्पोकन इंग्लिश इ.सुविधा दिल्या जात आहेत.
- **विद्यानिकेतन शाळा** : निवडक विद्यार्थांसाठी विदयानिकेतन शाळा सुरू करण्यात आलेली असून मराठी माध्यमाच्या १७, उर्दु माध्यमाच्या २ व इंग्रजी माध्यमाची १ अशा विदयानिकेतन शाळा सुरू असून त्या इ.१ली ते ८वी पर्यंत चे वर्ग आहेत. या शाळेतील विदयार्थांना महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती परिक्षेसाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. या विदयार्थांसाठी बस वाहतूकीसाह सर्व शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात.
- **ई-लर्निंग स्कूल** : सद्या शिक्षण मंडळाअंतर्गत कै.रामचंद्र बनकर प्रशाला,हडपसर,क्रांतीवीर लहूजी वस्ताद साळवे प्रशाला, येरवडा तसेच राजीव गांधी ई-लर्निग स्कूल, पर्वती या तीन ई-लर्निग स्कूल सुरू असून पुढील शैक्षणिक वर्षात चार नविन ई-लर्निग शाळा सुरू करण्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.
- **क्रिडानिकेतन** : क्रिडाविषयक विशेष मार्गदर्शन करणेसाठी तीन क्रीडानिकेतन शाळा सुरू आहेत. या शाळांतील विद्यार्थांना पौष्टीक आहार तसेच वाहतूक सुविधा देण्यात येते. या शाळेतील विदयार्थी राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धामध्ये प्राविण्य मिळवत आहेत.
- **संगीत विद्यालय** : संत तुकाराम संगीत विद्यालय, प्रभात रोड पुणे या ठिकाणी निवडक १२५ विदयार्थ्यांना गायन, तबला वादन या विषयी संगीत शिक्षकामार्फत मार्गदर्शन केले जाते. या विदयार्थ्यांची गंधर्व महाविदयालमार्फ त घेण्यात येण्या-या परिक्षांसाठी तयारी करून घेतली जाते.
- **विशेष मुलांची शाळा** : कै.लालबहादूर शास्त्री विदयालय, शिवाजीनगर या ठिकाणी मतिमंद विदयार्थ्यांसाठी विशेष मुलांची शाळा सुरू आहे.या ठिकाणी २२ विदयार्थी असून शाळेसाठी आवश्यक स्पीच थेरपी रूम इ. सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.
- **पटनोंदणी अभियान** :विद्यार्थी पटसंख्या वाढवी म्हणून पटनोंदणी अभियानासाठी स्वतंत्रपणे तरतूद करण्यात आली आहे. गृहभेटी, कुटुंब सर्वेक्षण करणे, कोपरा सभा आयोजित करणे यासाठी आवश्यक बॅनर, माहितीपत्रके, माहितीपट प्रक्षेपण करणे या बाबींचे आयोजन करून शिक्षण मंडळाच्या शाळांतील विदयार्थासाठी प्रवेश वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

**सन २०१७–१८**

- प्राथमिक शिक्षण–सन २०१७–१८ करिता पुणे मनपा शिक्षण मंडळासाठी मनपा मा. मुख्य सभेमार्फत अंदाजपत्रक मंजूर होणे प्रस्तावीत आहे.
- **संगणक शिक्षण** :शिक्षणमंडळ पुणे मनपाच्या सर्व शाळांमधून संगणक शिक्षण देणे प्रस्तावित आहे.
- **ई–लर्निंग उपक्रम** :शिक्षणमंडळ पुणे मनपाच्या सर्व शाळांमधून ई–लर्निंग उपक्रम कार्यान्वित करणे प्रस्तावित असून यात व्हॅच्युअल क्लास रूम, डिजिटल क्लास रूम, ई–लर्निंग सिस्टिम इ.समावेश होतो.
- **शिक्षण उत्सव** :शिक्षण मंडळ पुणे मनपा शाळातील उपक्रमशील शिक्षकांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी शिक्षण उत्सवआयोजित करणे प्रास्तावित आहे.

तसेच सन २०१६–२०१७ या आर्थिक वर्षामध्ये सुरू करण्यात आलेल्या योजना व उपक्रम, सन २०१७–२०१८ मध्येही राबविण्यात येणार आहेत.

## (१८) कामगार कल्याण

**सन २०१६–१७**

- **मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य** :

  मृत सेवकांच्या ११५ वारसांना रु. ७५,०००/– प्रमाणे रु. ८६,२५,०००/–, ७ वारसांना रु.५२,५००/– प्रमाणे रु. ३,६७,५००/–, १ वारसास रु. ३५,०००/– प्रमाणे रु. ३५,०००/– व २ वारसांना रु. ५०,०००/– प्रमाणे रु. १,००,०००/– असे एकूण रु. ९१,२७,५००/– अर्थसहाय्य आदा करण्यात आलेले आहे.

- **क्षेत्रिय महिला तक्रार निवारण समिती** :

  मुख्यलेखा व वित्त अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली असून विविध विभागातील व संवर्गातील महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

- **मराठी भाषा संवर्धनसमिती :**

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आले आहेत :

- मराठी आठवड्यानिमित्त दिनांक २१ ते २७ फेब्रूवारी, २०१७ या कालावधीत महापालिका कर्मचाऱ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धा, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा, सहा अक्षरी शब्दलेखन स्पर्धा, इत्यादींचे आयोजन करण्यात आले.
- पुणे मनपाच्या ५ उद्यानांमध्ये साहित्य कट्ट्यांचे उद्घाटन करण्यात आले. या साहित्य कट्ट्यांद्वारे विविध साहित्यिक व कवींचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
- पुणे महानगरपालिकेच्या २४ शाळांमधून इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर आणि विज्ञान व गणित प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले.
- मराठी भाषा संवर्धन अंतर्गत पुणे मनपा व जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने एकूण ६ शाळांमधून ग्रंथ महोत्सव व ग्रंथ दिंडीचे आयोजन करणेत आले.

**सन२०१७-१८**

- **कामगार प्रशिक्षण वर्ग :**

  वर्ग ३ व ४ मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी ४५ दिवसांच्या ४ कामगार प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येणार आहे.

  पुणे महानगरपालिकेतील विविध अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देताना गरजेनुरुप प्रशिक्षण देणेकामी विविध संवर्ग आणि हुद्यावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रशिक्षण गरज विश्लेषण (Training Need Analysis) कार्यक्रम प्रस्तावित आहे.

- **गुणवंत कामगार पुरस्कार :**

  सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षातील एकूण ४० गुणवंत कामगार पुरस्कार वितरण जानेवारी, २०१८ मध्ये प्रस्तावित आहे.

- **मराठी भाषा संवर्धन समिती** :

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत मराठी आठवड्याच्या निमित्ताने खालील विविध उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

- मराठी आठवडा व मराठी भाषा दिनानिमित्त ग्रंथ महोत्सव, कवी संमेलन, इत्यादी कार्यक्रम आयोजित करणेत येणार आहेत.
- मराठी माध्यमातून अत्युच्च शिखरावर पोचलेल्या व्यक्तींच्या जीवनावर लघुपट तयार करुन तो शाळांमधूनप्रसारित करणे.
- पाच उत्कृष्ट साहित्यिक व एक नवोदित युवा साहित्यिक यांना रक्कम रु. २५,०००/- व सन्मानचिन्ह देवून गौरविणे.
- मराठी भाषा संवर्धनासाठी महाराष्ट्र व शेजारील राज्यांमधील मराठी भाषा विषयक कार्य करणाऱ्या तज्ञांची बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळ साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

## (१९) अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन

**सन २०१६-१७**

- हॉकर्स पुर्नवसनासाठी जेएनएनयुआरएम अतंर्गत या पुर्वी बांधण्यात आलेल्या चार ओटा मार्केटमध्ये अतिक्रमण विभागाकडील नोंदणी कृत फेरीवाला व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही चालू आहे.
- पुणे शहरातील एकुण जास्त रहदारीचे मुख्य ४५ रस्ते व रहदारीचे १५३ चौक या ठिकाणांवरील सर्व प्रकारची अतिक्रमणे हटवून शहरातील नागरिकांना रस्ते/पदपथ, वापराकरीता अतिक्रमणमुक्त ठेवणेकरिता सयुंक्त कारवाई मोहिम राबविण्यात आली आहे. या पुढे ही सदरची मोहिम चालू ठेवण्यात येणार आहे.
- केंद्र शासनाच्या ''पथविक्रेता अधिनियम २०१४'' या कायद्याची शहरात अंमलबजावणी चालु करुन पुणे महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करणे, नोंदणी करणे व ओळखपत्र देणे यासाठी अद्यावत संगणक प्रणाली तयार करण्यात आली असून त्या अंतर्गत माहे डिसेंबर २०१६अखेर पर्यंत एकूण२०२९७ व्यावसायिकांचे संगणकीय नोंदणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. **क्षेत्रीय कार्यालय निहाय प्रमाणपत्राचे १४६७७ वाटप केले आहे.**त्यांना प्रमाणपत्राचे वाटप करूण त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करुन त्यांना ओळखपत्र देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
- ''मनपा मंडप धोरण २०१५'' ची अंमलबजावणी चालु केली आहे.

**सन २०१७ –१८**

- एकुण परवाना शुल्कपोटी र.रु. २५,९४,००,०००/– येणे अपेक्षित आहे.
- शहरातील नोंदणीकृत पथविक्रेत्यांना पथ विक्रेता अधिनियम २०१४ चे नुसार हॉकर्स झोन मध्ये त्यांचे पुनर्वसन करून त्यांना अधिकृत ओळख पत्राचे वाटप करणे.
- मान्य धोरणाअंतर्गत शेतकरी समुह गटांना शेतकरी अठवडे बाजार भरविणे करीता महाराष्ट्र राज्य कृषीपणन मंडळ यांना मोकळ्या जागा भाडे कराराने उपलब्ध करून देणे.
- पुणे मनपा स्थरावर नव्याने ''स्वतंत्र पोलीस स्टेशन''निर्मितीची शासनाकडील मिळालेल्या मान्यतेअंतर्गत नविन पोलीस स्टेशन निर्मिती करणे व त्याकरिता अद्यावत यंत्रणा उभारणे फर्निचरसह विविध तदअनुषंगिक कामे करणेचे आर्थिक नियोजन केले आहे.

## (२०) <u>अग्निशमन दल</u>

**सन २०१६–१७**

- अग्निशमन दलाकरीता सन २०१६–१७ चे महसूली उत्पन्नाचे उद्दीष्ट र.रू.८५.११ कोटी इतके होते. त्यापैकी सप्टेंबर २०१६ अखेरपर्यंत र.रू.२४.६० कोटी इतके उद्दीष्ट पूर्ण केलेआहे.
- सन २०१६–१७ चे महसूली खर्चासाठी अग्निशमन दलाकरिता र.रू.२१.४२ कोटी इतकी तरतूद केली होती. यात प्रामुख्याने सेवकांचे गणवेश, फायरगाड्या, वॉटर टँकर यांची देखभाल दुरूस्ती, सेवकांसाठीच्या अपघाती विमा योजनेचा हप्ता इ. गोष्टींचा समावेश आहे.
- सन २०१६–१७ चे भांडवली खर्चासाठी र.रू.१.२६ कोटी इतकी तरतूद केली आहे. त्याचा विनिमय शहरातील कोंढवा (बु), स.नं.१५ येथील अग्निशमन केंद्राचे बांधकाम पूर्ण करणे, शहरात झोनल ऑफीसेस उभारणे, मुख्य इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणी करणे यासाठी करण्यात आलेला असून, कोंढवा (बु) येथील अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

**सन २०१७–१८**

- सन २०१७–१८ मध्ये अग्निशमन दलाच्या महसूली उत्पन्नाच्या जमेचा अंदाज रू.४२.५१ कोटी (मिळकतकरातील अग्निशामक कर वगळून)इतका निश्चित करण्यात आलेला आहे.
- भांडवली निधीचा वापर हा प्रामुख्याने नविन केंद्र विकसित करणेसाठी करणेत येईल. यामध्ये अग्निशमन केंद्रांसाठी आरक्षितअसणाऱ्या जागांवर तसेच ॲमेनिटी स्पेसच्या जागांवर नजीकच्या कालावधीत अग्निशमन केंद्रे विकसित केली जातील.
- भवानी पेठेतील मध्यवर्ती अग्निशमन केंद्राचे आवारातील नियंत्रण कक्षाची ५० वर्षांपुर्वीची जुनी इमारत पाडून त्याजागी अत्याधुनिक यंत्रणांनी सुसज्ज असे नियंत्रण कक्ष व प्रशासकीय इमारत उभारणे प्रस्तावित आहे.
- अग्निशमन दलासाठी नवीन अग्निशमन केंद्रांची उभारणी करणे, अत्याधुनिक वाहने, यंत्रसामग्री, नियंत्रण कक्षासह सर्व अग्निशमन केंद्रांवर तसेच सर्व प्रकारच्या वाहनांवर अत्याधुनिक अशी संपर्क यंत्रणा, कर्मचाऱ्यांसाठी चांगल्या दर्जाचे गणवेश व साहित्य उपलब्ध करून देणे, खात्याकडील अधिकारी व जवांनाना आवश्यक असणारे प्रशिक्षण देणे, अधिकारी / जवानांच्या शारिरिक तंदुरूस्तीकरिता केंद्रांमध्ये व्यायामाचे साहित्य उपलब्ध करून देणे व या माध्यमातून अग्निशमन दलाचे सर्वांगाने बळकटीकरण करणेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व उपायोजना करण्यात येतील.

## (२१) सामान्य प्रशासन

**सन २०१६-१७**

**कर्मचारी माहिती व्यवस्थापन प्रणाली (HRMS)**

- पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांची वैयक्तीक व सेवा तपशीलाची खाली नमुद केलेल्या मुद्यांवरील माहिती संगणकीकृत करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून Human Resource Management System – HRMS ही संगणकप्रणाली विकसित करण्यात आली आहे.
- वरील संगणकप्रणालीमुळे कोणत्याही मनपा कर्मचाऱ्याचे कोणत्याही स्वरूपाचे अहवाल (उदा. पदनिहाय महिला व जाती संवर्गनिहाय महिला कर्मचारी, मालमत्ता विवरणपत्रे, गोपनीय अहवाल सादर न केलेले कर्मचारी, प्रशिक्षण घेतलेले व प्रशिक्षण न घेतलले कर्मचारी इत्यादी) एका क्लिकद्वारे प्राप्त करणे शक्य झाले आहे.
- Human Resource Management System – HRMS या संगणक प्रणालीमध्ये डाटा एंन्ट्री करण्याचे काम अंतिम टप्यात आहे.

**ऑनलाईन भरती प्रक्रिया :**

- भरती प्रक्रिया ऑनलाईन राबविण्याबाबत शासन निर्देश असल्याने पुणे महानगरपालिका प्रशासनाने सन २०१६- १७ मध्ये अभियांत्रिकी संवर्गाची भरती प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन राबविली आहे.
  - पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून देणे, अर्ज प्रोसेसिंग करणे.
  - कॉल लेटर डाऊनलोडची सुविधा उपलब्ध करून देणे, एसएमएस, ई-मेल द्वारे संपर्क सुविधा.
  - ऑनलाईन परिक्षेचे केंद्र व पर्यावेक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे.
  - रिजल्ट व मेरिट लिस्ट प्रोसेसिंग करणे.
- ऑनलाईन भरती प्रक्रियेमुळे भरतीप्रक्रिया जलद गतीने राबविणे व आवश्यक असलेले अधिकारी / कर्मचारी अत्यंत कमी कालावधीत नियुक्त करुन त्यांच्या सेवा प्राप्त करून घेणे शक्य झाले आहे.
- **कॉम्प्युटर लॅब :**

  पुणे मनपातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना माहिती व तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी घोले रोड आर्ट गॅलरी येथे ५० बैठक व्यवस्था असलेले संगणक लॅब सुरू करण्यात आली आहे. सदर संगणक लॅबमध्ये मनपाच्या सर्व खात्यातील आय. टी. नोडल ऑफिसर्स यांना माहिती व तंत्रज्ञान विषयावर प्रशिक्षण देण्यात आले आहे तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना संगणकीय ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी सन २०१६-१७ मध्ये एकूण ३७५९ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आय. टी. प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ :**

  महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५या अधिनियमांतर्गत पुणे महानगरपालिकेने अधिसूचित केलेल्या जन्म दाखला ,मृत्यु दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता कर उतारा, थकबाकी नसल्याचा दाखला, मालमत्ता हस्तांतरण नोंद, झोन दाखला, भाग नकाशा, बांधकाम परवाना, जोते प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, नळजोडणी व जलनि:स्सारण जोडणी देणे, अग्निशामक प्राथमिक व अंतिम ना - हरकत दाखला या सेवांबाबत प्राप्त झालेल्या अर्जांवर केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल संबंधित खात्यांकडून संकलित करून मे. शासनास सादर करण्यात येत आहे. माहे नोव्हेंबर २०१६ अखेर १,५०,९६७ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.
- **आपले सरकार ग्रिव्हन्स पोर्टलवरील अर्जांवरील कार्यवाहीचे समन्वय व अंमलबजावणी :**

  मा. नामदार मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे नियंत्रणाखाली आपले सरकार या नावाने ग्रिव्हन्स रिड्रेसल पोर्टल फेज-१ दि. २६ जानेवारी २०१५ पासून व फेज -२ दि. १५ ऑगस्ट २०१५

पासून कार्यान्वीत करण्यात आले आहे. नागरीकांनी आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन दाखल केलेल्या तक्रारी नोडल ऑफीसर म्हणून पुणे महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त होतात. सामान्य प्रशासन विभागामार्फत ऑनलाईन प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण होणेच्या अनुषंगाने संबंधित खात्यांना तात्काळ पाठविण्यात येतात व संबंधित खात्यांशी व मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेशी समन्वय साधुन तक्रारींचा निपटारा जलदगतीने होणेबाबत कार्यवाही करण्यात येते. आपले सरकार पोर्टलवरील दिनांक २०/३/२०१७ च्या अहवालानुसार प्राप्त झालेल्या १८०७ तक्रारींपैकी १५१७ तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

- **नागरिकांची सनद :**

पुणे महानगरपालिका प्रशासनाने नागरीकांशी संबंधित विविध कामांचे बाबततीत प्रत्येक कामासाठी आवश्यक असलेला अर्जाचा नमुना, अर्ज मिळण्याचे ठिकाण, कामासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे,सदर काम कोणत्या कायद्यानुसार, परिपत्रकानुसार, शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे, संबंधित कामासाठी नियमानुसार विहित केलेली फी, निर्णयाचे स्तर, अंतिम निर्णय घेण्यासाठी निश्चित केलेला कालावधी, अंतिम निर्णय घेणारे अधिकारी इत्यादी माहितीचा समावेश करुन प्रत्येक खातेनिहाय व कामाच्या विषयनिहाय नागरीकांची सनद तयार करुन जानेवारी २०१० पासुन कार्यान्वित केली आहे व त्याची अंमलबजावणी नियमितपणे करण्यात येत आहे.

## सन २०१७ –१८

- **शासनाने मजूरी दिलेल्या आकृतीबंधानुसार सेवांचे वर्गीकरणानुसार संबंधित सेवेसाठी तज्ञ (Speacialized) मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे :**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक पी.एम.सी. – ३०१४/प्र.क्र.२/नवि–२२ दिनांक २६ ऑगस्ट २०१४ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. शासनाने सदर मंजूरीद्वारे मनपातील सेवांचे प्रशासकीय सेवा, अभियांत्रिकी सेवा, वैद्यकीय/ निमवैद्यकीय सेवा, अग्निशमन सेवा, शिक्षण सेवा, तांत्रिक सेवा, लेख सेवा, क्रीडा सेवा, उद्यान सेवा, विधी सेवा इत्यादी सेवा प्रकारात वर्गीकरण करुन विविध संवर्गातील ३८७७ नविन पदांना मंजूरी दिली आहे. शासनाने मंजूरी दिल्याप्रमाणे व सेवांचे वर्गीकरण केल्याने विशिष्ट सेवेसाठी त्या त्या क्षेत्रातील प्रशिक्षित व सक्षम सेवकवर्ग सरळसेवा भरतीच्या माध्यमातुन उपलब्ध करुन घेणे व त्यांचेद्वारे नागरीकांना दर्जात्मक सेवा व सुविधा विहीत कालावधीमध्ये उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे.त्यासाठी आस्थापना खर्चाची मर्यादा व उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या अधिन राहुन नवनिर्मित पदांवर सक्षम मनुष्यबळाची नियुक्ती करण्याचा या विभागाचा प्रयत्न असणार आहे.

- **लेखनिकी संवर्गातील बढतीची रिक्त पदे बढतीसाठी आवश्यक असलेली विभागीय परीक्षा ऑनलाईन घेऊन जलद गतीने सक्षम अधिकारी/ कर्मचा–यांची बढतीने नियुक्ती करणे :**

लेखनिकी संवर्गातील बढतीची रिक्त पद भरण्यासाठी सेवा प्रवेश नियमावलीनुसार बंधनकारक असलेली विभागीय परीक्षा ऑनलाईन घेऊन परीक्षेत यशस्वी होणा–या पात्र व सक्षम कर्मचा–यांना बढती देऊन त्यांच्या माध्यमातुन नागरीकांची कामे जलद गतीने व तत्परतेने निकाली काढुन सक्षम प्रशासन निर्माण करण्याचा या खात्याच्या प्रयत्न असणार आहे.

- **मनपा अधिकारी– कर्माचा–यांना मे. राज्य शासनाच्या प्रशिक्षण धोरणानुसार पायाभुत प्रशिक्षण, बढती व बदली नंतरचे प्रशिक्षण, नवीन विषयांचे प्रशिक्षण तसेच उजळणी प्रशिक्षण व माहिती व तंत्रज्ञाचे प्रशिक्षण देऊन सक्षम प्रशासन निर्माण करणे :**

पुणे महानगरपालिकेने घोले रोड आर्ट गॅलरी येथे अनुक्रमे २०० व ५०बैठकींचे अद्ययावत सुविधेसह प्रशिक्षण हॉल व **कॉम्प्युटर लॅब** स्थापित करण्यात केली आहे. प्रशिक्षण प्रबोधिनीमार्फत मनपा अधिकारी– कर्माचा–यांना मे. राज्य शासनाच्या प्रशिक्षण धोरणानुसार पायाभुत प्रशिक्षण, बढती व बदली नंतरचे प्रशिक्षण, नवीन विषयांचे प्रशिक्षण तसेच उजळणी प्रशिक्षण व माहिती व तंत्रज्ञानाचे

प्रशिक्षण देऊन शहराच्या वाढीबरोबर शहराच्या विकासाची आव्हाने आणि नागरी समस्यांची सोडवणूक करण्याकरिता उत्कृष्ट दर्जाचे प्रशासन व प्रशासन चालविणारी यंत्रणा सक्षम करण्याचा या खात्याचा प्रयत्न असणार आहे.

## (२२) झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन(र. रू. ८.६० कोटी)

**सन २०१६–१७**

- झोनिपु निधीतून करावयाची कामे या अर्थशिर्षकामधून मा.उपआयुक्त/सह आयुक्त (परिमंडळ वि.क्र. १ ते ४) यांना त्यांच्या प्रभाग संख्येनुसार सार्वजनिक ठिकाणी शौचालये/मुता–या बांधणे इ. कामासाठी रक्कम रू.३,१५,००,०००/– इतके वाटप करण्यात आलेले आहे. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करण्यात आली असून सार्वजनिक शौचालये/मुतारी बांधण्याची कार्यवाही झाली आहे व काही ठिकाणी सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या झोनिपु खात्या अंतर्गत सेवाशुल्क वसुलीसाठी क्षेत्रिय कार्यालय स्तरावरील योजना प्रस्तावित असून मे.राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे सन २००० पूर्वीच्या झोपडयांच्या हस्तांतरणाबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सर्व घोषित व अघोषित झोपडपटटयांची माहिती मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

**सन २०१७–२०१८**

- शौचालये बांधणे, (झोनिपु) विभागातील विविध कामांसाठी र. रू. ३,६०,००,०००/– तरतूद सुचविली असून र.रू.४५,००,०००/–वाढकरण्यातयेत आहे.
- उपआयुक्त (झोनिपु) कार्यालय अंतर्गत क्षेत्रिय कार्यालय स्तरावर शहरातील झोपडपटटीवासियांच्या संगणकीकृत सेवाशुल्क देयके तयार करणे व त्यानुसार प्रत्येक झोपडपटटी धारकाचे स्वतंत्र खाते तयार करणे. त्यामुळे प्रत्यक्ष मागणी निश्चित करता येणे शक्य होणार आहे.
- मा.महाराष्ट्र शासन राज्य पत्रकाप्रमाणे सन १९९५ ऐवजी सन २००० पर्यंतच्या झोपडपटटीधारकांना फोटोपास देणे आवश्यक असून त्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
- मा.पंतप्रधान आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी संगणक प्रणाली विकसित करणे व शहरी गरजू लाभार्थ्यांचे संगणकीय फॉर्म भरून घेण्याची कार्यवाहीसाठी लागणारी रक्कमही संकिर्णामधूनच खर्च करण्यात येणार आहे. वरील सर्व बाबींसाठी अंदाजे र.रू.२०,००,०००/– ची आवश्यकता आहे.
- आज अखेर सुमारे ४५,००० ऑनलाईन अर्ज पंतप्रधान आवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी आले आहेत. व किमान एक लाख ऑनलाईन अर्ज प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे.

## (२३) समाज विकास

**सन २०१७–१८**

- समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणेत येते. याकरीता सन २०१६–२०१७ चे अर्थसंकल्पात रक्कम रु.७१,०८,५४२००/– तरतूद करणेत आली होती. सन २०१६–२०१७ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प
- पुणे महानगरपालिका,समाज विकास विभागामार्फत दारिद्र्यरेषेखालील व अन्य उत्पन्न गटातील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविणेत येतात.
- केंद्र व राज्य शासनाची राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासून राबविणेत येत आहे.या योजनांकरीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त

मनपा अर्थसंकल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला व बाल कल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ३% रक्कम अपंगांसाठी राखून ठेवली जाते. खात्यामार्फत महिला व बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना,युवक कल्याणकारी योजना, अपंग कल्याणकारी योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान इ. योजना राबविल्या जातात.

- **स्वयंरोजगार उपक्रम**ः व्यवसाय प्रशिक्षण,उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान सन २००५-२००६ मध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे करण्यात आला. शासनाने पुणे शहरातील १००८१ कुटुंबांचा दारिद्र्यरेषेखालील समावेश केला असून केंद्र व राज्य शासनाची राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियाना अंतर्गत या कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रशिक्षण, स्वयंरोजगार, बचत गटांना फिरता निधी, व्यवसाय गटांना कर्ज इ .योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवाकेंद्र, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीकरीता आधार केंद्र, पुणे महानगर समाज विकास संस्था यांचा समावेश आहे.
- **बचत गटांसाठी योजना** ःशहर पातळीवर सुमारे १३१०० बचतगट कार्यरत असून बचतगट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण,फिरता निधी,बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी प्रदर्शन व विक्रीकरीता अर्थसहाय्य,शेजार समुह गटातील स्वयंसेवकांना प्रशिक्षण, स्वस्त धान्याची दुकाने देणे, तसेच मनपाच्या प्राथमिक शाळेतील सुमारे ७०००० विद्यार्थ्यांना शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत मध्यान्ह भोजन व बालवाडीतील १२००० मुलांना बचतगटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.
- **महिलांसाठी योजना** ःविधवा महिलांना अनुदान,महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, महिला सबलीकरण केंद्र, महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी व्यवसाय प्रशिक्षण योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ.योजना राबविण्यात येतात.
- **विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना** : इ.१० वी व१२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास फी, सीईटी क्लास फी,उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल वाटप, कमवा व शिका योजना, इ.१० वी व इ.१२ वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना अर्थसहाय्य, स्पर्धा परीक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ.उपक्रम राबविले जातात.
- **भौतिक सुविधा उपक्रम** ःझोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरुस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करिता मागासवर्गीय यांना अर्थसहाय्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील ४०० विद्यार्थ्यांचा एक वेळचा भोजनाचा खर्च दिला जातो.
- **सामाजिक उपक्रम** : वृध्दांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, रात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.
- **अपंग कल्याणकारी योजना** : अपंगांना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य दिले जाते.
- सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षापासून पुणे महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये जेण्डर बजेटची अंमलबजावणी करणेत येत आहे.
- पुणे महानगरपालिका,समाज विकास विभाग व उन्नती व्होकेशनल ट्रेंनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यामाने सावित्रिबाई फुले स्मारक,गंज पेठ,पुणे येथे सन २०१६ मधील मध्ये डिसेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत ३०० विद्यार्थ्यांना ट्रेंनिंग देऊन रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.
- पुणे महानगरपालिका,समाज विकास विभाग व आस्था ब्रेस्ट कॅन्सर सपोर्ट ग्रुप, पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने पुणे शहरातील वस्ती पातळीवर महिलांकरीता स्तन कर्करोगाच्या लवकर निदानासाठी

स्क्रिनिंग कॅम्प (पूर्वतपासणी) राबविणेत येत आहे. सदर उपक्रमांतर्गत १५ क्षेत्रीय कार्यालय पातळीवर १५०० महिलांची तपासणी कारणेत आली आहे.

- औध व येरवडा क्षेत्रिय कार्यालय येथे लाईट हाऊस प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. याव्दारे लाभार्थ्यास कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करण्यात येते. सन २०१६-२०१७ मध्ये उर्वरीत क्षेत्रिय कार्यालयामध्ये प्रकल्प चालु करण्यात येणार आहेत.
- दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत एकुण ६७ दारिद्र्यरेषेखालील बचत गटांचे वस्ती स्तर संघ स्थापन करण्यात आला आहे.त्या प्रमाणे एकुण ६७ बीपीएल (SHGS) चे संघटना तयार करण्यात आली आहे .त्याला १८६० व १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तालयाची नोंदणी करण्यात आलीव या संघटनांमधुन महिला सक्षमीकरणातून दारिद्र्य मिर्मुलन करणे हा मुख्य उद्देश आहे.

**सन २०१६-२०१७ फेब्रुवारी अखेर लाभार्थी संख्या**

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन-२०१७-२०१८ नोव्हेंबर अखेर लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | स्वयंरोजगार योजना | ७५०० |
| २. | राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान | २७४२ |
| ३. | बचतगटांसाठी योजना | ६७०० |
| ४. | महिलांसाठी योजना | ९००० |
| ५. | विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक योजना | ४०८०० |
| ६. | सामाजिक योजना | २१५० |
| ७. | अपंगांसाठी योजना | ७३०० |
| | **एकूण** | **७६१९२** |

# अ)दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक–

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) <u>स्थानिक संस्था कर</u>

**सन २०१६–१७**

- माहे एप्रिल २०१६ ते फेब्रुवारी २०१७ अखेर स्थानिक संस्था करापोटी एकूण रक्कम **<u>रू.१२९४.२० कोटीचे</u>** उत्पन्न प्राप्त झालेले आहे.
- स्थानिक संस्था कर कार्यालयाकडे सन २०१३–२०१४ पासून आजअखेर ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने विवरणपत्र दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आलेली असून दाखल झालेल्या वार्षिक विवरणपत्रांची तपासणी करण्यासाठी सनदी लेखापाल संस्थांची नेमणूक केलेली असून त्यांचेकडून वार्षिक विवरणपत्र तपासणीचे कामकाज चालू आहे.
- ज्या व्यावसायिक / नोंदणीधारकांनी स्थानिक संस्था कर भरलेला नाही किंवा अत्यल्प प्रमाणात भरलेला अशा व्यावसायिक / नोंदणीधारकांना कागदपत्रांसह सुनावणीस हजर राहणेबाबत नोटीसा बजावण्यात आल्या असून ज्या व्यावसायिकांच्या विवरणपत्रामध्ये तपासणीअंती स्थानिक संस्था कराचा भरणा कमी भरलेला आहे, अशा व्यावसायिकांकडून स्थानिक संस्था कराची वसुली करण्यात येत आहे.
- ज्या आर्थिक वर्षाची वार्षिक विवरणपत्रे दाखल न करणाऱ्या नोंदणीधारकांना विवरणपत्रे दाखल करणेबाबत खात्यामार्फत नोटीसा बजावण्यात आलेली आहे. तसेच त्यांचेकडून र.रु.५,०००/– शास्ती वसुल करण्यात येत असून, विवरणपत्रही दाखल करुन घेण्यात येत आहेत.

| दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक – सन २०१६–१७ |
|---|
| **<u>प्रमुख बाबी</u>**<br>**१. स्थानिक संस्था कर –**<br>**उद्‌दीष्ट – र.रू. १६५०.०० कोटी**<br>**प्रत्यक्ष जमा – र.रू. १२९४.२० कोटी (फेब्रुवारी २०१७ अखेर)**<br><br>* स्थानिक संस्था कर मुख्य कार्यालय येथे अद्ययावत संगणक प्रणालीसह व्यावसायिकांची नोंदणीची तसेच भरणा चलनाची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.<br><br>* ७ बँकांच्या शाखांमधून स्थानिक संस्था कर भरणा करण्याची ऑनलाईन व ऑफलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. |

- सन २०१६–१७ या आर्थिक वर्षासाठी स्थानिक संस्था कर उत्पन्नाचे **उद्‌दीष्ट र. रू.१६५०.०० कोटी** इतके सुचविले आहे. मात्र सदर करास प्रथम पासूनच व्यावसायिकांचा असहकार व विरोध असल्याने तसेच इमारत बांधकामापोटी कमी प्रमाणात मिळणारे दरमहाचे स्थानिक संस्था कराचे ठोक उत्पन्न आणि १% मुद्रांक शुल्कचे अनुदान हे देखील गतवर्षीच्या तुलनेने कमी प्रमाणात प्राप्त होत आहे. त्याचप्रमाणे मे. राज्य शासनाने दि.०१/०८/२०१५ पासून ज्या व्यावसायिकांची वार्षिक उलाढाल रुपये ५० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल अशा व्यावसायिकांनाच स्थानिक संस्था कर लागू केलेला असल्याने त्यामुळे दरमहाचे स्थानिक संस्था कराचे उत्पन्नात घट होत असून,दि. १५/०८/२०१६ पासून मद्य व वाईन या मालास स्थानिक संस्था कर लागू केलेला असल्याने त्यापासून दरमहा अंदाजे ५ ते ६ कोटी उत्पन्न प्राप्त होत असून असे एकूण दरमहा अंदाजे ३५ ते ४० कोटीचे उत्पन्न प्राप्त होत आहे.
- मे. राज्य शासनाने दि.०१/०८/२०१५ पासून ज्या व्यावसायिकांची वार्षिक उलाढाल रुपये ५० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल अशा व्यावसायिकांनाच स्थानिक संस्था कर लागू केलेला असल्याने

महानगरपालिकेच्या उत्पन्नात होणारी तुट भरुन काढण्यासाठी मे. राज्य शासनाकडून पुणे महानगरपालिकेस दरमहा ७७.९५ कोटी सहाय्यक अनुदान प्राप्त होत होते. मात्र त्यामध्येही माहे जानेवारी २०१७ पासून कपात केलेली असून ते दरमहा ६३.१४ कोटी इतके मिळत असून त्यामध्ये दरमहा १४.८१ कोटीची घट झालेली असल्याने माहे जानेवारी ते मार्च २०१७ अखेर सहाय्यक अनुदानात र.रु.४४.४३ कोटीची घट होणार आहे. हे याठिकाणी नमूद करण्यात येत आहे.

- मे. राज्य शासनाकडून दरमहा प्राप्त होणारे सहाय्यक अनुदानात वाढ होणे तसेच १% मुद्रांक शुल्क अनुदान प्राप्त व्हावे म्हणून वेळोवेळी नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे निवदने सादर करण्यात येऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.
- सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात माहे फेब्रुवारी २०१७ अखेर स्थानिक संस्था करापोटी र.रु. १२९४.२० कोटी इतके उत्पन्न प्राप्त झालेले असून, खालील तक्यात नमूद केलेले संभाव्य उत्पन्न र.रु. २७०.५४ कोटी गृहीत धरता सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात मा. महापालिका आयुक्त यांनी अंदाजपत्रकात सुचविल्याप्रमाणे र.रु.१५६४.७४ कोटी उत्पन्नाचे उद्दिष्ट प्राप्त होऊ शकेल.

| अ.क्र. | अपेक्षित उत्पन्न तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | माहे फेब्रुवारी व मार्च २०१७ या दोन महिन्याचे सहाय्यक अनुदानाचे अपेक्षित उत्पन्न (दरमहा ६३.१४ कोटी प्रमाणे) | १२६.२८ कोटी |
| २ | माहे ऑक्टोंबर २०१६ ते मार्च २०१७ या सहा महिन्याचे १% मुद्रांक शुल्क अपेक्षित उत्पन्न (दरमहा अंदाजे १५.०० कोटी प्रमाणे) | ९०.०० कोटी |
| ३ | सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील मे. राज्य शासनाकडून १% मुद्रांक शुल्कापोटी थकबाकी येणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कपात केलेली १% मुद्रांक शुल्क रक्कम असे एकूण येणे (१४.१३+ २.१३ कोटी) | १६.२६ कोटी |
| ४ | माहे मार्च २०१७ मधील स्थानिक संस्था कराचे संभाव्य प्राप्त उत्पन्न | ३८.०० कोटी |
| **एकूण संभाव्य प्राप्त होणारे अपेक्षित उत्पन्न** | | **२७०.५४ कोटी** |

### सन २०१७-१८ (उद्दिष्ट र.रू.१०५० कोटी)

- सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात विविध बाबींपासून स्थानिक संस्था कराचे उत्पन्न र.रु. १७३०.०० कोटी उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे. तथापि, मे. केंद्र शासनाकडून माहे जुलै २०१७ पासून वस्तू सेवा कर (GST)लागू झाल्यास सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी स्थानिक संस्था कर कार्यालयाकडून सुचविण्यात आलेले उत्पन्न र.रु.१७३०.०० कोटी प्राप्त होऊ शकणार नाही, हे या ठिकाणी नमूद करण्यात येत आहे.

## (२) <u>मिळकत कर</u>

### सन २०१६-१७

### मिळकतकर विभागाने केलेली कामे

- पुणे शहराची वाढ व भविष्यातील गरज विचारात घेता, तसेच वाढती लोकसंख्या, समाविष्ट गावांची लोकसंख्या आणि लोकसंख्येच्या अनुषंगाने निर्माण झालेले वाहतुक, रस्ते, कचरा, पाणीपुरवठा, ड्रेनेज इ . पायाभूत सोयी-सुविधांबाबतचे महत्वाचे प्रश्न, ग.व.नि. चा भाग, २३ गावांच्या विकासाचा प्रश्न इ. बाबी विचारात घेवून महानगरपालिकेच्या उत्पन्ना मध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून पुणे शहरातील सर्व मिळकतीवरील कराची थकित बाकी वसुल करणेसाठी, एकरकमी संपुर्ण रक्कम (थकबाकीसह) मिळकतदारांनी (मोबाईल टॉवर व्यतिरिक्त) दिनांक ५/१०/२०१६ ते ३०/११/२०१६ अखेर कालावधी दरम्यान भरल्यास, भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रकमेच्या ७५% शास्ती रकमेस माफी देवून शिल्लक रक्कम भरून घेणेबाबत व अशा प्रकारच्या ज्या मिळकतदारांनी

दिनांक १/१२/२०१६ ते ३१/१२/२०१६ अखेर कालावधी दरम्यान भरल्यास, भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रकमेच्या ५०% शास्ती रकमेस माफी देवून शिल्लक रक्कम भरून घेणे बाबत दिनांक ५/१०/२०१६ पासून अभय योजना राबविण्यात आली आहे.

- अभय योजने अंतर्गत दि.५/१०/२०१६ ते ३०/११/२०१६ अखेर मिळकतकरा पोटी सुमारे २५२.४६ कोटी इतकी वसुली झाली असून दि.१/१२/२०१६ ते ३१/१२/२०१६ अखेर मिळकतकरापोटी सुमारे ६१.७२ कोटी इतकी वसूली झाली असून अभय योजनेच्या कालावधी एकूण वसूली र.रु.३१४.१९ कोटी इतकी झाली आहे.

- सन २०१६-१७ मध्ये मा.मुख्यसभेने सुमारे १४४४.९१ कोटी इतके इष्टांक मिळकतकरापोटी दिलेले असून मिळकतकर विभागाने १ एप्रिल २०१६ ते १९/०३/२०१७ अखेर मिळकतकरापोटी रू.१०८६.७६ कोटी इतकी रक्कम जमा केली आहे. यासाठी मोबाईल व्हॅनव्दारे, रिक्षा,बँड पथक, वसूली पथके, विविध प्रसार माध्यमाव्दारे जाहिराती, मिळकतधारकांना नोटीस पाठवून वसूली करण्यात आलेली आहे.

- विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ कलम २५ (२) अन्वये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ज्या मिळकत धारकाकडे मोठ्या प्रमणात थकबाकी आहे ती वसूल करण्याच्या दृष्टीकोनातून खटला पूर्व प्रकरण या माध्यमातून मे. जिल्हा न्यायालय पुणे येथे दि.१२/११/२०१६ रोजी राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. सदर राष्ट्रीय लोक अदालत मध्ये सुमारे २१०० मिळकत धारकांना नोटीसा पाठवून सुमारे २१ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

- सन २०१६-१७ या वर्षामध्ये कर भरण्यासाठी, नावबदलासाठी, नाहरकतदेय प्रमाणपत्रासाठी व मिळकतकर विषयक अन्य कामासाठी येणाऱ्या मिळकतदारांकडून सुमारे ६,९५,३५३ भ्रमणध्वनी क्र.व सुमारे ३,१०,६९४ ईमेल आयडी घेवून मिळकतकराच्या डेटाबेस मध्ये समाविष्ठ केला आहे. यामुळे मिळकतदारांना कर भरणा केलेनंतर, नाव बदलानंतर, नवीन करआकारणीची नोटीस व देयकाची माहिती, चेक बाउंन्स झाल्याबाबत माहिती थकित बाकी असल्यास त्याबाबतची माहिती मिळकतधारकांना एएसएमएस व्दारे देण्यात येते.

- मिळकतकरविषयक माहिती देणेसाठी, तक्रार निवारणसाठी व करसंकलनाबाबत पाठपुरावा करणेकामी स्वतंत्र मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सदर कक्षामध्ये दररोज सरासरी ५० ते ७५ कॉल्स येत असून सुमारे १ एप्रिल २०१६पासून अंदाजे ९००० कॉल्सना माहिती दिलेली आहे. सदर कक्षामध्ये नागरीक स्वत:हून तक्रारी नोंदविले असून त्यांचे निवारण करण्यात आलेले आहे. तसेच सदर कक्षामार्फत ३५,३१४ मोबाईल मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये अद्ययावत करण्यात आलेले आहे.

- त्याचप्रमाणे propertytax@punecorporation.org या ई मेल आयडी वरील मेल्संना उत्तरे दिले असून complaint.punecorporation.org वर २६१९ आलेल्या तक्रारीचे निवारण केले. तसेच आपले सरकार वर आलेल्या ६५ इतक्या तक्रारीचे निराकरण केले आहे.

- सन २०१५-१६ मध्ये १,५६,८५२ इतक्या मिळकत धारकांनी सुमारे १६०.०४ कोटी इतकी रक्कम ऑनलाईने भरली होती. सन २०१६-१७ मध्ये माहे १९मार्च २०१७ अखेर २,१०,१६५इतक्या मिळकतधारकांनी सुमारे २००.४३ कोटी रक्कम ऑनलाइन भरलेली आहे यात एकूण ट्रॅझेक्शनमध्ये ७५ टक्के वाढ झाली असून ऑनलाईन भरणा रकमेमध्ये ८० टक्के वाढ झाली आहे.

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यानुसार मुदतीत एनओसी देणेसाठी पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम नागरीकांना ऑनलाइन एनओसी देणेबाबतची कार्यवाही पूर्ण केलेली आहे. माहे १ एप्रिल २०१६पासून १९.३.२०१७ पर्यंत ऑनलाइन एनओसीसाठी २२,०९८ एनओसी उपलब्ध करुन दिलेले आहेत.

- जीआयएस/जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणाचे काम पुणे अधिकार क्षेत्रात सुरु करण्यात आले आहे. मिळकतीचे सर्वेक्षण व जीआयएस करणेकामी मिळकतीमधील वापरातील बदल, वाढीव बांधकाम,

करआकारणी न झालेल्या मिळकती तसेच जीपीएस अक्षांश व रेखांश, मिळकतीची छायाचित्रे, इत्यादी स्वरुपाची माहिती गोळा करण्याचे दि. २० सप्टेंबर २०१६ पासूनSaar IT Resourses Pvt Ltd, Mumbai व CyberTech Systems and Software Limited, Thane या बाहेरील कंपन्यांना देण्यात आले असून माहे ऑक्टोबर ते मार्च २०१७ अखेर सदर कंपन्यांनी सुमारे १,३५,००० इतक्या मिळकतीचे सर्वेक्षण केलेले आहे.

- मिळकतकर आकारणीचे जुन्या दस्ताऐवजांचे ७० टक्के स्कॅनिंग व संगणकावर अे फॉर्म अपलोडींगचे काम मागील तीन महिन्यात पूर्ण केले आहे. उर्वरित कामकाज दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल. यामुळे मिळकतकर विभागाचे कर्मचारी यांना दस्तऐवज शोधण्यासाठी व नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी वेळ वाया जाणार नसून सर्व दस्तऐवजांचे जतन होणार आहे.

## सन २०१७-१८ (उद्दीष्ट र.रु. १३३३.६० कोटी)

- नवीन वर्षाचे मिळकतकर देयके संगणकीय प्रोग्राममधुन डेटा उपलब्ध करुन देणे तसेच बीले छपाई करणे व ती प्रत्यक्षात वाटप करणे यासाठी सुमारे १५ एप्रिलपर्यंत कालावधी लागतो. सवलतीच्या दराने मिळकतकर भरणेची प्रतीवर्षाची मुदत ही ३१ मे पर्यंत असते सदर कालावधी सन २०१७-१८ या वर्षाकरीता ही कामय ठेवण्यात आला आहे.

- जीआयएस/जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणाचे काम पुणे अधिकार क्षेत्रात सुरु करण्यात आले आहे. मिळकतीचे सर्वेक्षण व जीआयएस करणेकामी मिळकतीमधील वापरातील बदल, वाढीव बांधकाम, करआकारणी न झालेल्या मिळकती तसेच जीपीएस अक्षांश व रेखांश, मिळकतीची छायाचित्रे, इत्यादी स्वरुपाची माहिती गोळा करण्याचे दि. २० सप्टेंबर २०१६ पासून Saar IT Resourses Pvt Ltd, Mumbai व CyberTech Systems and Software Limited, Thane या बाहेरील कंपन्यांना देण्यात आले असून सन २०१७-१८ मध्ये पुणे शहरातील सर्व मिळकतीचे सर्वेक्षण करुन वापरातील बदल, वाढीव बांधकाम, करआकारणी न झालेल्या अशा सर्व मिळकतींची करआकारणी मोबाईल ॲपव्दारे पूर्ण करण्यात येणार आहे. मिळकतीचे सर्वेक्षण करतांना बारकोड च्या माध्यमातून मिळकतीला डीजीटल डोअर नंबर बसविण्यात येणार आहे त्यामुळे प्रस्तुत मिळकतीच्या मिळकतकराबाबतची संपूर्ण माहिती त्वरेने उपलब्ध होणार आहे.

- मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये सुमारे ६,५५,३५३ भ्रमणध्वनी क्रमांक व सुमारे ३,१०,६९४ ईमेल आयडी समाविष्ठ केलेले असून ज्यांचा मेल आयडी व भ्रमणध्वनी क्र. अद्याप डेटाबेसमध्ये नाही त्याची नोंद डेटाबेसमध्ये करण्यात येणार आहे. डेटाबेसमध्ये अद्ययावत असलेल्या ईमेल व भ्रमणध्वनी क्रमांकावर सन २०१७-१८ मधील मिळकतकर विषयक मागणीची रक्कम मुदतीत भरणेबाबत ईमेल व्दारे बिले पाठविण्यात येणार आहे.

- कॅशलेस प्रॉपटी टॅक्स करणेच्या माध्यमातून जास्तीत जास्त मिळकत धारकांनी ऑनलाइन कराची रक्कम भरल्यास मिळकत धारकांना सर्व साधारण करामध्ये अगर दंडाच्या रकमेमध्ये सवलत देवून योजना कार्यान्वीत करणेबाबत प्रस्तावित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये यूपीआय (unified payment interface) व ईबीपीपी (Electonic bill payment & presentation) प्रक्रिया पूर्ण झाली असून बिलडेस्क, टेक प्रोसेसर व सिट्रस मार्फत आरटीजीएस व एनएफटी व्दारे ऑनलाइन कर भरणा करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे नागरीकांनी त्यांच्या बँकेला फॉर्म भरुन दिल्यास माहे १ एप्रिल रोजी त्यांचे खात्यातून मिळकतकराची रक्कम पुणे मनपाच्या खात्यामध्ये जमा होणार आहे. यामुळे नागरीकांना कर भरण्यासाठी रांगेत उभे राहावे लागणार नसून नागरीकांचा बहुमुल्य वेळ वाचणार आहे.

- महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम, महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यानुसार ऑनलाइन एनओसी पुणे महानगरपालिकेने दिले असून सदर कायद्यानुसार मालमत्ता आकारणी उतारा व नाव हस्तांतरण ऑनलाइनव्दारे करण्याचे प्रस्तावित आहे.

- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मिळकतकराचे विविध करामध्ये (**सर्वसाधारण कर २ टक्के, अग्निशामक कर ०.५० टक्के,सफाईकर ५टक्के, जललाभ१.२५टक्के,जलनिसा:रण लाभ कर २ टक्के, पुणे मनपा शिक्षण उपकर १.२५ टक्के**) १२ टक्के दरवाढ सुचविण्यात आलेली असून त्यामुळे उत्पन्नामध्ये सुमारे ८९ कोटी वाढ होणार आहे. मा.मुख्यसभा ठ.क्र.८०९,दि.१६/२/२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन म्हणजेच सन २०१७-१८ सालासाठी मिळकत करावरील पाणीपट्टीसाठी १५% दरवाढ करणेत आली आहे.सदर करपात्र रकमेच्या प्रमाणातील दरवाढीनुसार पाणीपटटी सुमारे २९ कोटी वाढ होणार आहे.
- विविध करातील १२ टक्के दरवाढ करता तसेच मागील थकबाकीच्या (कोर्टकेसची, दुबार देयके, शून्य करावयाच्या मिळकती इ.रक्कम विचारात घेवून) २०% व सन २०१६-१७ ची मागणी विचारात घेवून त्यामध्ये २५% नवीन तयार होणारी मागणी वाढवून सदर रकमेच्या ८०% वसूली अपेक्षीत धरून तसेच पाणीपटटीचे दरातील १५ टक्के वाढीने सुमारे २९ कोटी विचारात घेता तसेच सन २०१७-२०१८ मध्ये पुणे शहरातील सर्व मिळकतीचे जीआयएस व सर्वेक्षण विचारात घेवून त्यानुसार वाढणारी रक्कम विचारात घेता सन २०१७-२०१८ या वर्षासाठी मिळकतकरापोटी सुमारे १७१६ कोटी इतकी वसूली अपेक्षीत आहे.

## (३) बांधकाम परवानगी व विकास शुल्क

### सन २०१६-१७

- **बांधकाम परवानगी व विकास शुल्क** - सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातकरीता सद्यस्थितीतील बांधकाम क्षेत्रातील कल, प्रस्ताव संमतीकरण व जमा महसूल यांचा ताळमेळ पाहता बांधकाम विकास विभागाकडील जमा महसूलचे रु.१०४५.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. बांधकाम क्षेत्रातील मंदी मुळे जमेचे उद्दीष्ट साध्य झाले नाही.फेब्रुवारी २०१७ अखेर सुमारे र.रू. ४५५ कोटी जमा झालेले आहेत.

### सन २०१७-१८(उद्दिष्ट र.रू.१०२५.०५ कोटी)

- सन २०१७-२०१८ या अंदाजपत्रकीय वर्षात जमा महसुल रक्कम १०५० कोटी अपेक्षित आहे. तसेच ऑनलाईन अॅटोडीसीआर (Auto DCR) जलद गती बांधकाम परवानगीची कार्यपध्दती अवलंबून सदरचे उद्दिष्ट पुर्ण करणे शक्य होणार आहे. पुणे मनपा हद्दीसाठी मंजूर कर यात आलेल्यसा सुधारीत विकास नियंत्रण व प्रोसाहन नियमावली २०१७ मध्ये नव्याने प्रिमियम, एफ.एस. आय. ची संकल्पना माडण्यात आली असुन या नियमावली नुसार प्रिमियम एफ.एस. आय, आय.टी. /आय.टी. एस. इ. इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस. आय. व विशेष इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस. आय.पोटी प्रिमियम जमा होणार असल्याने सदर उद्दीष्ट गाठणे शक्य होणार आहे.

## (४) पाणीपट्टी

### सन २०१६-१७

- मीटरवरील दि. १५/०३/२०१७ अखेर एकूण नळजोड संख्या ४२७०३ इतकी असून, थकबाकी सुमारे रक्कम रू. ४९४.६५ कोटी आहे. थकबाकीची प्रमुख कारणे, नळजोड बिगर घरगुती आहे. प्रत्यक्ष वापर घरगुतीसाठी होत आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर बंद असल्याने, नळजोड बंद घोषित झोपडपट्टीमधील पाणीपट्टी, रस्ता रूंदरकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. बिल दुरूस्तीची कार्यवाही खात्यामार्फत करण्यात येत असून, बिल दुरूस्ती नंतर वसूली होणारी रक्कम ही २० ते २५% इतकी असून, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

- सन २०१६-१७ करीता टप्पेनिहाय (टेलास्कोपिक)पाणीपट्टी दरास मा. मुख्य सभा ठ. क्र. ५९८, दि. १२/२/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मीटरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठयाची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे ६५ ते ६७ कोटी इतकी जमा होते. सन २०१६-१७ या अर्थिक वर्षामध्ये १५/०३/२०१७ अखेर ७२.३५ कोटी इतकी जमा झालेली आहे.

| अ. क्र. | वर्ष | वसुली (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | ६७.८७ |
| २ | २०१३-१४ | ६७.८५ |
| ३ | २०१४-१५ | ५८.०३ |
| ४ | २०१५-१६ | ७१.६७ |
| ५ | २०१६-१७ | ७२.३५ (१५.३.२०१७ पर्यत) |

- पुणे शहरात १००% मीटर पध्दतीने पाणीपुरवठा करणेकामी मा. मुख्यसभा ठराव क्रमांक ४५, दि. १८/०५/२०१२ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. सदरची योजना राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यात आलेली असून, सदरचे काम सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये सुरु करण्यात येणार आहे.

- घरगुती व बिगर घरगुतीच्या मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) दरवाढ मा.मुख्य सभा ठराव क्र. २२७७, दिनांक ५.२.२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोड धारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जादा वापर करणाऱ्या नळजोड धारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे पाणी वापरावर परिणाम होणार असून पाणी वाया जाण्याचे प्रमाणे कमी होणे अपेक्षित आहे. तसेच या वाढीव मीटर पाणीपट्टीमुळे पाणीपुरवठा करणेसाठी होणारा खर्च भरून काढणे शक्य होणार आहे.

## सन २०१७-१८(उद्दिष्ट र.रू.३१९.६७ कोटी)

- पुणे शहरात १००% मीटर पध्दतीने पाणीपुरवठा करणेकामी मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ४५, दिनांक १८.५.२०१२ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. पुणे शहरास तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करणेकामी (२४ X ७)र.रु. २८१८ कोटीची योजना मा.मुख्य सभेने ठराव क्र. ६०, दिनांक २२.५.२०१५ अन्वये मान्यता दिली आहे. सदर योजने अंतर्गत प्रत्यक्ष मिळकतदारास अे.एम.आर. मीटर पध्दतीने पाणीपुरवठा करणेकामी अे.एम.आर. मीटर बसविण्याचा अंतर्भाव आहे. यंदाचे वर्षी वरील योजना राबविण्याचे काम सुरु करण्यात येणार असून, यामध्ये प्राधान्याने मीटर पध्दतीने पाणीपुरवठा करणे अंतर्भूत आहे.

- पुणे शहरास दरडोई होणारा पाणीपुरवठा विचारात घेता यंदाचे वर्षी सन २०१६-१७ चे दरामध्ये सरसकट ५% दरवाढ करण्यात आली असून, पुढील ३० वर्षासाठी दरवर्षी ५% दरवाढ करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देण्यात आलेला आहे. पुणे शहरास 24x7 पाणीपुरवठा करणेकामी तयार करण्यात आलेली योजना राबविण्यासाठी र.रुपये २२६० कोटीचे कर्ज/ कर्जरोखे उभारण्यासाठीचा प्रस्ताव मा.मुख्य सभेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मा.मुख्य सभेची मान्यता मिळाल्यावर सदरची योजना राबविण्यास गती देणे शक्य होणार आहे. तथापि मा.मुख्य सभा ठराव क्र. २२७७, दिनांक ४.२.२०१६ अन्वये पुढील ३० वर्षाच्या कालावधीपर्यत पाणीपट्टी दरवाढीसाठी देण्यात आलेल्या मान्यतेमुळे कर्ज उभारणे, कर्ज परतफेड करणे शक्य होणार असल्याचे निदर्शनास येते.

- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यावर कारवाई करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. तसेच थकबाकीदारांकडून रक्कम वसूल करण्याबाबतची मोहिम सुध्दा राबविण्यात येणार आहे.

### वापरानुसार दर आकारणी

| सध्याचे दर | | प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०१६) | खप कि.लि./महिना | दर (सन २०१७) |
| **झोपडपट्टी** | | | |
| कच्ची झोपडी | लागू नाही | कच्ची झोपडी | ३८.३/महिना |
| पक्की झोपडी | लागू नाही | पक्की झोपडी | ६३.८/महिना |
| **घरगुती पाणी वापर दर** | | | |
| ० ते २२.५ | ४.५ | ० ते १८.६ | ५.७८ |
| २२.५ ते ३० | ७.५ | १८.६ ते ३० | ७.६६ |
| ३० ते ३७.५ | १५.० | ३० ते ३७.५ | १७.२१ |
| ३७.५ पेक्षा जास्त | २२.५ | ३७.५ पेक्षा जास्त | २८.८८ |
| **बिगर घरगुती वापर दर** | | | |
| ० ते २० | ३९ | ० ते २० | ४९.९८ |
| २० ते ४० | ४०.५ | २० ते ४० | ५१.८७ |
| ४० ते ६० | ४२.५ | ४० ते ६० | ५४.५० |
| ६० पेक्षा जास्त | ४९ | ६० पेक्षा जास्त | ६२.७९ |

**<u>सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.</u>**

**(आकडे रुपये कोटीत)**

| **जमा बाजू** | **(प्रारुप)** | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०१६-१७ साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे डिसेंबर २०१६ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरूवातीची शिल्लक | ०.०२ | ० |
| स्थानिक संस्था कर | १६५०.०० | १०५१.७४ |
| मिळकतकर | ११०६.४१ | ८९८.६० |
| पाणीपट्टी | ३९४.८२ | ३५.४९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | १०३५.१० | ४०२.०५ |
| इतर जमा | ८७५.०६ | २१७.८७ |
| जेएनएनयुआरएम अनुदान | २०२.६९ | ० |
| शासकीय अनुदान | १९४.३० | १२.४९ |
| कर्ज | २८९.६० | ० |
| **एकूण रक्कम रुपये** | **५७४८.००** | **२६१८.२४** |

## (ब) <u>दृष्टीक्षेपात सन २०१७-१८ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज-</u>

**सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येतआहे.**

**(आकडे रूपये कोटीत)**

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १६१४.०० |
| स्थानिक संस्था कर | १७३०.४० | वीज खर्च व दुरूस्ती | २२३.१४ |
| मिळकतकर | १३३३.६० | पाणी खर्च | २८.०० |
| विकास शुल्क | १०२५.०५ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ४२.८२ |
| पाणीपट्टी | ३१९.६७ | औषधे, पेट्रोल/डिझेल | १०५.८२ |
| शासकीय अुदान | ३२९.१० | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | ८७०.६९ |
| इतर जमा | ६०१.१६ | वॉर्डस्तरीय | ३४.४० |
| कर्ज/रोखे | २६१.०० | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | १०१.५३ |
| | | भांडवली व विकासाची कामे | २३३९.१८ |
| | | जेएनएनयुआरएम | २४०.४० |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकूण** | **५६००.००** | **एकूण** | **५६००.००** |

शहरातील वाढत्या समस्या विचारात घेता त्यावर मात करून उपाययोजना करण्यासाठी मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे. यादृष्टीने फक्त महानगरपालिका निधी अथवा शासकीय अनुदाने यांचा सिमीत विचार न करता पी.पी.पी., संयुक्त प्रकल्प, सी.एस.आर.इ. मार्गांचाही अवलंब करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. चालू आर्थिक वर्ष व आगामी अर्थसंकल्पीय वर्षामध्ये मोठया प्रमाणावर मोठया योजनांची कामे सुरू करावी लागणार आहेत. या विकास कामांची अंमलबजावणी करताना शहरातील सर्व घटकांचे सक्रिय, सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे.

- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी जमा-खर्चाचा एकूण अंदाज रक्कम रु.५६००कोटी असून एकूण जमा रक्कम रु. ५६०० कोटी खालील स्त्रोताद्वारे प्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | स्त्रोत | रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|
| १ | स्थानिक संस्था कर | १७३०.०० |
| २ | मालमत्ता कर | १३३३.६० |
| ३ | विकास शुल्क | १०२५.०५ |
| ४ | पाणीपटटी | ३१९.६७ |
| ५ | अनुदाने | ३२९.१० |
| ६ | इतर बाबी | ८६२.५८ |
| | **एकूण** | **५६००.००** |

| अ.क्र. | प्रस्तावित खर्च प्रामुख्याने | रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|
| १ | महसूली खर्च | ३०२०.४० |
| २ | भांडवली खर्च | २५७९.५८ |
| | **एकूण** | **५६००.००** |

अंदाजपत्रक हे प्रशासनाचा दर्जा आणि लोकांच्या जीवनमानात परिवर्तन करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावित असते, हेच लक्ष समोर ठेऊन शहराचा सर्वांगिण विकास साधण्याचा मनोदय व्यक्त करुन शहराच्या सर्व पातळींवरील विकासाच्या संकल्पनांची बांधिलकी व शहराच्या समृध्दीची दिशा निश्चित करुन अंदाजपत्रक सादर करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. अध्यक्ष स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. सर्व पक्षनेते, मा. सर्व पदाधिकारी, मा. प्रभाग समिती अध्यक्ष, मा. सर्व सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व प्रसारमाध्यमे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले, त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे !

सर्व संबंधित मा. केंद्रातील व राज्यातील माननीय मंत्रीमहोदय, मा. संसद सदस्य, मा. विधी मंडळ सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे मार्गदर्शक यांचेही बहुमूल्य सहकार्य असून, त्या सर्वांची मी कृतज्ञता व्यक्त करतो!

शहरातील विविध विकासाची कामे करताना शहराच्या वाटचालीचे फायदे सर्व स्तरातील शहरवासियांपर्यंत पोहोचविण्याचे आव्हान स्विकारुन त्यांच्या व्यक्त होणाऱ्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपणा सर्वांचे मार्गदर्शन व मते याचाही अंदाजपत्रकात सर्वांगाने विचार करण्यात आला आहे. हे अंदाजपत्रक तयार करताना ज्यांनी मुर्त-अमूर्त स्वरुपात सहकार्य केले आहे, त्या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे!

अंदाजपत्रकाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करताना सर्वांचे सहकार्य मिळेल या विश्वासासह मी आज दिनांक ३०/०३/२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेतील माझे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(कुणाल कुमार)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक : ३० मार्च, २०१७